****

SHREE DAAS BODH

(Marathi)

****

राहा देहाच्या विसरें । वर्तों नका वाईट बरें।
तेणें मुक्तीचीं द्वारें । चोजविती तुम्हांसी ॥ ४॥
रामी रामदास म्हणे । सदा स्वरूपीं अनुसंधान।
करा श्रीरामाचें ध्यान । निरंतर ॥ ५॥

अशा दासबोधाची शुद्ध, ठळक अक्षरांची, सुंदर प्रत सांप्रदायिकांना उपलब्ध व्हावी, म्हणून श्रीसमर्थांच्या चारशेव्या जयंतीवर्षात आम्ही प्रकाशित करीत आहोत. याच्या पारायणाची पद्धती ग्रंथाच्या सुरुवातीला दिली आहे. ती पाहून श्रीरामभक्तांनी याचे पठन-पारायण करून स्वत:चे जीवन धन्य करावे, ही प्रार्थना.

विनीत

प्रकाशक

विषय-सूची

विषय	पृष्ठ-संख्या
१- पहिला दशक	
समास १ : ग्रंथारंभलक्षण	१३
समास २ : गणेशस्तवन	१६
समास ३ : शारदास्तवन	१९
समास ४ : सद्गुरुस्तवन	२२
समास ५ : संतस्तवन	२५
समास ६ : श्रोतेजनस्तवन	२७
समास ७ : कवेश्वरस्तवन	२९
समास ८ : सभास्तवन	३३
समास ९ : परमार्थस्तवन	३६
समास १० : नरदेहस्तवन-निरूपण	३८
२- दुसरा दशक	
समास १ : मूर्खलक्षण	४५
समास २ : उत्तमलक्षण	५१
समास ३ : कुविद्यालक्षण	५५
समास ४ : भक्तिनिरूपण	५९
समास ५ : रजोगुणलक्षण	६१
समास ६ : तमोगुणलक्षण	६५
समास ७ : सत्त्वगुणलक्षण	६९
समास ८ : सद्विद्यानिरूपण	७६
समास ९ : विरक्तलक्षण	७९
समास १० : पढतमूर्खलक्षण	८३
३- तिसरा दशक	
समास १ : जन्मदु:खनिरूपण	८७
समास २ : स्वगुणपरीक्षा	९२
समास ३ : स्वगुणपरीक्षा	९८
समास ४ : स्वगुणपरीक्षा	१०२
समास ५ : स्वगुणपरीक्षा	१०७
समास ६ : आध्यात्मिकताप	११२
समास ७ : आधिभौतिकताप	११७
समास ८ : आदिदैविकताप	१२४
समास ९ : मृत्युनिरूपण	१२७
समास १० : वैराग्यनिरूपण	१३२
४- चौथा दशक	
समास १ : श्रवणभक्ती	१३९
समास २ : कीर्तनभक्ती	१४२
समास ३ : नामस्मरणभक्ती	१४५
समास ४ : पादसेवनभक्ती	१४७
समास ५ : अर्चनभक्ती	१५०
समास ६ : वंदनभक्ती	१५३
समास ७ : दास्यभक्ती	१५५
समास ८ : सख्यभक्ती	१५८
समास ९ : आत्मनिवेदन-भक्ती	१६१
समास १० : मुक्तिचतुष्टय	१६४
५- पाचवा दशक	
समास १ : गुरुनिश्चय	१६७
समास २ : गुरुलक्षण	१७१
समास ३ : शिष्यलक्षण	१७७
समास ४ : उपदेशलक्षण	१८६
समास ५ : बहुधाज्ञान	१९०
समास ६ : शुद्धज्ञान	१९४
समास ७ : बद्धलक्षण	२००

विषय	पृष्ठ-संख्या
समास ८ : मुमुक्षुलक्षण	२०५
समास ९ : साधकलक्षण	२०९
समास १० : सिद्धलक्षण	२१४
६- सहावा दशक	
समास १ : देवशोधन	२१९
समास २ : ब्रह्मपावननिरूपण	२२२
समास ३ : मायोद्भव	२२६
समास ४ : ब्रह्मनिरूपण	२२९
समास ५ : मायाब्रह्मनिरूपण	२३२
समास ६ : सृष्टिकथन	२३४
समास ७ : सगुणभजन	२४०
समास ८ : दृश्यनिर्शन	२४४
समास ९ : सारशोधन	२४९
समास १० : अनुर्वाच्य	२५३
७- सातवा दशक	
समास १ : मंगळाचरण	२५९
समास २ : ब्रह्मनिरूपण	२६५
समास ३ : चतुर्दशब्रह्म-निरूपण	२७०
समास ४ : विमलब्रह्म-निरूपण	२७५
समास ५ : द्वैतकल्पनानिर्शन	२७९
समास ६ : बद्धमुक्तनिरूपण	२८३
समास ७ : साधनप्रतिष्ठा-निरूपण	२९०
समास ८ : श्रवणनिरूपण	२९७
समास ९ : श्रवणनिरूपण	३०१
समास १० : देहांतनिरूपण	३०६

विषय	पृष्ठ-संख्या
८- आठवा दशक	
समास १ : देवदर्शन	३११
समास २ : सूक्ष्म आशंका	३१६
समास ३ : सूक्ष्म आशंका	३२१
समास ४ : सूक्ष्मपंचभूते-निरूपण	३२७
समास ५ : स्थूलपंचमहाभूते स्वरूपाकाशभेद	३३३
समास ६ : दुश्चीतनिरूपण	३३९
समास ७ : मोक्षलक्षण	३४४
समास ८ : आत्मदर्शन	३५०
समास ९ : सिद्धलक्षण	३५६
समास १० : सुन्यत्वनिर्शन	३६२
९- नववा दशक	
समास १ : आशंका	३६९
समास २ : ब्रह्मनिरूपण	३७२
समास ३ : निःसंदेहनिरूपण	३७५
समास ४ : जाणपणनिरूपण	३७९
समास ५ : अनुमाननिर्शन	३८३
समास ६ : गुणरूपनिरूपण	३८७
समास ७ : विकल्पनिर्शन	३९२
समास ८ : देहांतनिरूपण	३९७
समास ९ : संदेहवारण	४०१
समास १० : स्थितिनिरूपण	४०५
१०- दहावा दशक	
समास १ : अंतःकर्ण येक	४०९
समास २ : देह आशंका	४१२
समास ३ : देहआशंकाशोधन	४१४

विषय	पृष्ठ-संख्या
समास ४ : बीजलक्षण	४१६
समास ५ : पंचप्रळयनिरूपण	४२०
समास ६ : भ्रमनिरूपण	४२३
समास ७ : सगुणभजन-निरूपण	४२७
समास ८ : प्रचितनिरूपण	४३०
समास ९ : पुरुषप्रकृति	४३३
समास १० : चळाचळनिरूपण	४३६
११- अकरावा दशक	
समास १ : सिद्धांतनिरूपण	४४३
समास २ : चत्वारदेव-निरूपण	४४७
समास ३ : सिकवणनिरूपण	४५०
समास ४ : सारविवेक-निरूपण	४५३
समास ५ : राजकारणनिरूपण	४५६
समास ६ : महंतलक्षण	४५९
समास ७ : चंचळनदी-निरूपण	४६१
समास ८ : अंतरात्माविवरण	४६३
समास ९ : उपदेश	४६५
समास १० : निःस्पृह वर्तणूक	४६८
१२- बारावा दशक	
समास १ : विमळलक्षण	४७१
समास २ : प्रत्ययनिरूपण	४७३
समास ३ : भक्तनिरूपण	४७५
समास ४ : विवेकवैराग्य	४७८
समास ५ : आत्मनिवेदन	४८०
समास ६ : सृष्टिक्रमनिरूपण	४८२
समास ७ : विषयत्याग-निरूपण	४८५
समास ८ : काळरूप	४८८
समास ९ : येतसिकवण	४९१
समास १० : उत्तमपुरुष-निरूपण	४९४
१३- तेरावा दशक	
समास १ : आत्मानात्म-विवेक	४९९
समास २ : सारासारनिरूपण	५०२
समास ३ : उभारणीनिरूपण	५०४
समास ४ : प्रलय	५०७
समास ५ : कहाणीनिरूपण	५०९
समास ६ : लघुबोध	५११
समास ७ : प्रत्ययेविवरण	५१४
समास ८ : कर्तानिरूपण	५१७
समास ९ : आत्मविवरण	५२०
समास १० : सिकवणनिरूपण	५२४
१४- चौदावा दशक	
समास १ : निस्पृहलक्षण	५२७
समास २ : भिक्षानिरूपण	५३४
समास ३ : कवित्वकळा-निरूपण	५३६
समास ४ : कीर्तनलक्षण	५४१
समास ५ : हरिकथालक्षण	५४४
समास ६ : चातुर्यलक्षण	५४८
समास ७ : युगधर्मनिरूपण	५५१

विषय	पृष्ठ-संख्या
समास ८ : अखंडध्यान-निरूपण	५५५
समास ९ : शाश्वतनिरूपण	५५९
समास १० : मायानिरूपण	५६२
१५- पंधरावा दशक	
समास १ : चातुर्यलक्षण	५६५
समास २ : निःस्पृहव्याप-लक्षण	५६८
समास ३ : श्रेष्ठअंतरात्मा-निरूपण	५७१
समास ४ : शाश्वतब्रह्म-निरूपण	५७३
समास ५ : चंचळलक्षण निरूपण	५७६
समास ६ : चातुर्यविवरण	५७९
समास ७ : अधोर्धनिरूपण	५८२
समास ८ : सूक्ष्मजीव-निरूपण	५८५
समास ९ : पिंडोत्पत्ती	५८९
समास १० : सिद्धांतनिरूपण	५९२
१६- सोळावा दशक	
समास १ : वाल्मीकिस्तवन	५९५
समास २ : सूर्यस्तवन	५९७
समास ३ : पृथ्वीस्तवन	५९९
समास ४ : आपनिरूपण	६०१
समास ५ : अग्निनिरूपण	६०४
समास ६ : वायोस्तवन-निरूपण	६०७
समास ७ : महद्भूतनिरूपण	६१०
समास ८ : आत्माराम-निरूपण	६१४
समास ९ : नाना उपासना-निरूपण	६१७
समास १० : गुणभूत-निरूपण	६१९
१७- सतरावा दशक	
समास १ : देवबळात्कार	६२३
समास २ : शिवशक्ती-निरूपण	६२६
समास ३ : श्रवणनिरूपण	६२९
समास ४ : अनुमाननिर्शन	६३१
समास ५ : अजपानिरूपण	६३४
समास ६ : देहात्मनिरूपण	६३७
समास ७ : जगज्जीवन-निरूपण	६४०
समास ८ : तत्त्वनिरूपण	६४२
समास ९ : तनुचतुष्टये	६४६
समास १० : टोणपसिद्धलक्षण	६४८
१८- अठरावा दशक	
समास १ : बहुदेवस्थान	६५१
समास २ : सर्वज्ञसंग-निरूपण	६५३
समास ३ : निःस्पृहसिकवण-निरूपण	६५६
समास ४ : देहेदुल्लभ-निरूपण	६५८

विषय	पृष्ठ-संख्या
समास ५ : करंटपरीक्षा-निरूपण	६६१
समास ६ : उत्तमपुरुष-निरूपण	६६५
समास ७ : जनस्वभाव-निरूपण	६६७
समास ८ : अंतर्देवनिरूपण	६६९
समास ९ : निद्रानिरूपण	६७१
समास १० : श्रोताअवलक्षण-निरूपण	६७३
१९- एकोणिसावा दशक	
समास १ : लेखनक्रिया-निरूपण	६७९
समास २ : विवरणनिरूपण	६८१
समास ३ : करंटलक्षण-निरूपण	६८३
समास ४ : सदेवलक्षण-निरूपण	६८६
समास ५ : देहेमान्यनिरूपण	६८९
समास ६ : बुद्धिवादनिरूपण	६९१
समास ७ : येत्ननिरूपण	६९४
समास ८ : उपाधीलक्षण-निरूपण	६९७
समास ९ : राजकारण-निरूपण	७००
समास १० : विवेकलक्षण-निरूपण	७०४
२०- विसावा दशक	
समास १ : पूर्णापूर्ण-निरूपण	७०७
समास २ : सृष्टित्रिविध-लक्षणनिरूपण	७०९
समास ३ : सूक्ष्मनामाभिधान	७१२
समास ४ : आत्मानिरूपण	७१५
समास ५ : चत्वारजिनस	७१७
समास ६ : आत्मागुण-निरूपण	७२०
समास ७ : आत्मनिरूपण	७२३
समास ८ : देहक्षेत्रनिरूपण	७२६
समास ९ : सूक्ष्मनिरूपण	७२९
समास १० : विमलब्रह्म-निरूपण	७३२

❑❑❑

श्रीदासबोध-पठन-पारायण-पद्धती

सकाळी स्नान करून धुतलेले वस्त्र नेसून आसनावर बसावे. समोर व्यासपीठ ठेवून त्यावर ग्रंथ ठेवावा. आचमन, प्राणायाम करून पठनाचा किंवा पारायणाचा संकल्प करावा. नंतर ग्रंथाची अष्टगंध, फुले वाहून उदबत्ती, नीरांजन ओवाळून व प्रदक्षिणा-नमस्कार करून पूजा करावी. नंतर पुढील श्लोक म्हणावे.

गणेशः शारदा चैव सद्गुरुः सज्जनस्तथा।
आराध्यदैवतं गुह्यं सर्वं मे रघुनंदनः॥ १॥

गणेश शारदा सद्गुरू। संत सज्जन कुळेश्वरू।
सर्वहि माझा रघुवीरू। सद्गुरुरूपें ॥ २॥
माझें आराध्यदैवत। परम गुह्य गुह्यातीत।
गुह्यपणाची मात। न चले जेथें ॥ ३॥

यो जातो मरुदंशजः क्षितितले
संबोधयन् सज्जनान्
ग्रंथं यो रचयन् सुपुण्यजनकं
श्रीदासबोधाभिधम्।
यः कीर्त्या पठनेन सर्वविदुषां
स्वांतापहारी सदा
सोऽयं मुक्तिकरः क्षितौ विजयते
श्रीरामदासो गुरुः ॥ ४॥

मला वाटते अंतरीं त्वां वसावें।
तुझ्या दासबोधासि त्वां बोधवावें॥
अपत्यापरी पाववी प्रेमग्रासा।
महाराजया सद्गुरु रामदासा॥ ५॥

ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम्।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि॥ ६॥

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥ ७॥

अनेन प्रीयतां देवो भगवान् जानकीपतिः।
श्रीरामचंद्रः पूर्वेषामस्माकं कुलदैवतम्॥ ८॥

॥ श्रोता वक्ता श्रीरामसमर्थ । जय जय रघुवीर समर्थ ॥

यानंतर श्रीमनाचे श्लोक नित्य व क्रमाने १३ म्हणून श्रीमद्दासबोधाचे वाचन करावे.

श्रीमत् दासबोधाचे नित्याचे/पारायणाचे वाचन झाल्यावर त्यापुढील समासाची पहिली ओवी वाचावी.

त्यानंतर दासबोधाच्या शेवटच्या १२ ओव्या वाचाव्या. संपूर्ण पारायणानंतर ग्रंथातील पहिली ओवी वाचावी. त्यानंतर श्रीमत् दासबोधाची आरती म्हणावी. आरतीनंतर पुढील श्लोक म्हणावे.

सदा सर्वदा योग तूझा घडावा
तुझे कारणीं देह माझा पडावा।
उपेक्षूं नको गूणवंता अनंता
रघूनायका मागणें हेंचि आतां॥
सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा
उडी घालितो संकटीं स्वामि तैसा।
हरीभक्तिचा घाव गाजे निशाणीं
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी॥
मुखीं राम त्या काम बाधूं शकेना
गुणें इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना।
हरीभक्त तो शक्त कामासि मारी
जगीं धन्य तो मारुती ब्रह्मचारी॥

हनुमंत आमुची कुळवल्ली । राममंडपा वेला गेली।
श्रीरामभक्तीनें फळली । रामदास बोले या नांवें ॥१॥
आमुचे कुळीं हनुमंत । हनुमंत आमुचें मुख्य दैवत।
तयावीण आमुचा परमार्थ । सिद्धितें न पवे सर्वथा ॥२॥
साह्य आम्हांसी हनुमंत । आराध्यदैवत श्रीरघुनाथ।
श्रीगुरु श्रीरामसमर्थ । काय उणें दासासी ॥३॥
दाता येक श्रीरघुनंदन । वरकड लंडी देईल कोण।
तया सोडोन आम्ही जन । कोणाप्रति मागावें ॥४॥
म्हणोनि आम्ही रामदास । श्रीरामचरणीं आमुचा विश्वास।
कोसळोनि पडो हें आकाश । आणिकाची वास न पाहूं ॥५॥

स्वरूपसांप्रदाय अयोध्यामठ । जानकीदेवी श्रीरघुनाथदैवत।
मारुती उपासना नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासीं ॥ ६ ॥
स्वधामासि जातां महारामराजा । हनूमंत तो ठेविला याचि काजा।
सदासर्वदा रामदासांसि पावे । खळीं गांजितां ध्यान सांडोनि धावे॥ ७ ॥

आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम्।
लोकाभिरामं श्रीरामं भूयोभूयो नमाम्यहम्॥

नमो आदि बोधात्मरूपा परेशा नमो हंस नारायणा निर्जरेशा।
नमो ब्रह्मदेवा वसिष्ठा श्रीरामा नमो मारुती रामदासाभिरामा॥

ध्यान करूं जातां मन हारपलें । सगुणीं जाहलें गुणातीत॥ १ ॥
जेथें पाहे तेथें राघवाचें ठाण । करीं चापबाण शोभतसे॥ २ ॥
राम माझे मनीं राम माझे ध्यानीं । शोभे सिंहासनीं राम माझ्या॥ ३ ॥
रामदास म्हणे विश्रांति मागणें । जीवीचें सांगणें हितगुज॥ ४ ॥
शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें । वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें॥
कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा । नमस्कार माझा सद्गुरु रामदासा॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥
॥ सद्गुरु समर्थ रामदास स्वामीमहाराज की जय ॥
॥ महारुद्र हनुमान की जय ॥
॥ श्रेष्ठ गंगाधर स्वामी महाराज की जय ॥
॥ भगवान सद्गुरु श्रीधरस्वामी महाराज की जय ॥
॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

यानंतर आचमन करून ग्रंथाला साष्टांग नमस्कार घालून उठावे.

दररोज वाचनाचा नियम असल्यास किमान दोन समास वाचावे. कमी जास्त न करता समासवाचनसंख्या नियमित ठेवावी. प्रत्येक ओवी वाचून झाल्यावर 'श्रीराम' म्हणावे.

साप्ताहिक पारायण पद्धतीत पहिल्या दिवशी **तीन दशक,** दुसऱ्या दिवशी **चार ते सहा दशक,** तिसऱ्या दिवशी **सात व आठ दशक,** चौथ्यापासून सातव्या दिवसापर्यंत दररोज **तीन दशक** वाचावे. तसेच दररोज दासबोध वाचनानंतर मनाचे १३ श्लोक क्रमाने वाचून सातव्या दिवशी पूर्ण वाचावा. संपूर्ण पारायणानंतर दासबोधाची पहिली ओवी व पहिला मनाचा श्लोक वाचावा.

❑❑

॥ श्रीराम समर्थ ॥

॥ श्रीमत् दासबोध ॥

दशक पहिला : स्तवनाचा

दशक १ : समास १

ग्रंथारंभलक्षण

॥ श्रीराम ॥

श्रोते पुसती कोण ग्रंथ । काय बोलिलें जी येथ ।
श्रवण केलियानें प्राप्त । काय आहे ।। १ ।।

ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद ।
येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ।। २ ।।

नवविधा भक्ति आणि ज्ञान । बोलिलें वैराग्याचें लक्षण ।
बहुधा अध्यात्मनिरोपण । निरोपिलें ।। ३ ।।

भक्तिचेन योगें देव । निश्चयें पावती मानव ।
ऐसा आहे अभिप्राव । इये ग्रंथीं ।। ४ ।।

मुख्य भक्तीचा निश्चयो । शुद्धज्ञानाचा निश्चयो ।
आत्मस्थितीचा निश्चयो । बोलिला असे ।। ५ ।।

शुद्ध उपदेशाचा निश्चयो । सायोज्यमुक्तीचा निश्चयो ।
मोक्षप्राप्तीचा निश्चयो । बोलिला असे ।। ६ ।।

शुद्ध स्वरूपाचा निश्चयो । विदेहस्थितीचा निश्चयो ।
अलिप्तपणाचा निश्चयो । बोलिला असे ।। ७ ।।

मुख्य देवाचा निश्चयो । मुख्य भक्ताचा निश्चयो ।
जीवशिवाचा निश्चयो । बोलिला असे ।। ८ ।।

मुख्य ब्रह्माचा निश्चयो । नाना मतांचा निश्चयो ।
आपण कोण हा निश्चयो । बोलिला असे ।९।

मुख्य उपासनालक्षण । नाना कवित्वलक्षण ।
नाना चातुर्यलक्षण । बोलिलें असे ।१०।

मायोद्भवाचें लक्षण । पंचभूतांचें लक्षण ।
कर्ता कोण हें लक्षण । बोलिलें असे ।११।

नाना किंत निवारिले । नाना संशयो छेदिले ।
नाना आशंका फेडिले । नाना प्रश्न ।१२।

ऐसें बहुधा निरोपिलें । ग्रंथगर्भीं जें बोलिलें ।
तें अवघेंचि अनुवादलें । न वचे किं कदा ।१३।

तथापि अवघा दासबोध । दशक फोडून केलाविशद ।
जे जे दशकींचा अनुवाद । ते ते दशकीं बोलिला ।१४।

नाना ग्रंथांच्या संमती । उपनिषदें वेदांतश्रुती ।
आणि मुख्य आत्मप्रचीती । शास्त्रेंसहित ।१५।

नाना संमतीअन्वये । म्हणौनी मिथ्या म्हणतां न ये ।
तथापि हें अनुभवासि ये । प्रत्यक्ष आतां ।१६।

मत्सरें यासी मिथ्या म्हणती । तरी अवघेचि ग्रंथ उछेदती ।
नाना ग्रंथांच्या संमती । भगवद्वाक्यें ।१७।

शिवगीता रामगीता । गुरुगीता गर्भगीता ।
उत्तरगीता अवधूतगीता । वेद आणी वेदांत ।१८।

भगवद्गीता ब्रह्मगीता । हंसगीता पांडवगीता ।
गणेशगीता येमगीता । उपनिषदें भागवत ।१९।

इत्यादिक नाना ग्रंथ । संमतीस बोलिले येथ ।
भगवद्वाक्यें येथार्थ । निश्चयेंसीं ।२०।

भगवद्वचनी अविस्वासे । ऐसा कोण पतित असे ।
भगवद्वाक्याविरहित नसे । बोलणें येथीचें ।।२१।।

पूर्ण ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण ।
तो दुरात्मा दुराभिमान । मत्सरें करी ।।२२।।

अभिमानें उठे मत्सर । मत्सरें ये तिरस्कार ।
पुढें क्रोधाचा विकार । प्रबळे बळें ।।२३।।

ऐसा अंतरीं नासला । कामक्रोधें खवळला ।
अहंभावें पालटला । प्रत्यक्ष दिसे ।।२४।।

कामक्रोधें लिथाडिला । तो कैसा म्हणावा भला ।
अमृत सेवितांच पावला । मृत्य राहो ।।२५।।

आतां असो हें बोलणें । अधिकारासारिखें घेणें ।
परंतु अभिमान त्यागणें । हे उत्तमोत्तम ।।२६।।

मागां श्रोतीं आक्षेपिलें । जी ये ग्रंथीं काय बोलिलें ।
तें सकळहि निरोपिलें । संकळीत मार्गे ।।२७।।

आतां श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ ।
तुटे संशयाचें मूळ । येकसरां ।।२८।।

मार्ग सांपडे सुगम । न लगे साधन दुर्गम ।
सायोज्यमुक्तीचें वर्म । ठांई पडे ।।२९।।

नासे अज्ञान दुःख भ्रांती । शीघ्रचि येथें ज्ञानप्राप्ती ।
ऐसी आहे फळश्रुती । ईये ग्रंथीं ।।३०।।

योगियांचे परम भाग्य । आंगीं बाणें तें वैराग्य ।
चातुर्य कळे यथायोग्य । विवेकेंसहित ।।३१।।

भ्रांत अवगुणी अवलक्षण । तेचि होती सुलक्षण ।
धूर्त तार्किक विचक्षण । समयो जाणती ।।३२।।

आळसी तेचि साक्षपी होती । पापी तेचि प्रस्तावती ।
निंदक तेचि वंदूं लागती । भक्तिमार्गासी ।३३।

बद्धचि होती मुमुक्ष । मूर्ख होती अतिदक्ष ।
अभक्तचि पावती मोक्ष । भक्तिमार्गें ।३४।

नाना दोष ते नासती । पतित तेचि पावन होती ।
प्राणी पावे उत्तम गती । श्रवणमात्रें ।३५।

नाना धोकें देहबुद्धीचे । नाना किंत संदेहाचे ।
नाना उद्वेग संसाराचे । नासती श्रवणें ।३६।

ऐसी याची फलश्रुती । श्रवणें चुके अधोगती ।
मनास होय विश्रांति । समाधान ।३७।

जयाचा भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा ।
मत्सर धरी जो पुंसा । तयास तेंचि प्राप्त ।३८।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'ग्रंथारंभलक्षणनाम'
समास पहिला समाप्त.

❑❑

दशक १: समास २

गणेशस्तवन

॥ श्रीराम ॥

ॐ नमोजि गणनायेका । सर्वसिद्धिफळदायेका ।
अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा । १ ।

माझिये अंतरीं भरावें । सर्वकाळ वास्तव्य करावें ।
मज वाग्सूंन्यास वदवावें । कृपाकटाक्षेंकरूनी । २ ।

तुझिये कृपेचेनि बळें । वितुळती भ्रांतीचीं पडळें ।
आणि विश्वभक्षक काळें । दास्यत्व कीजे । ३ ।

येतां कृपेची निज उडी । विघ्नें कांपती बापुडीं ।
होऊनि जाती देशधडी । नाममात्रें । ४ ।

म्हणौन नामें विघ्नहर । आम्हा अनाथांचें माहेर ।
आदि करूनी हरीहर । अमर वंदिती । ५ ।

वंदूनियां मंगळनिधी । कार्य करितां सर्वसिद्धी ।
आघात अडथाळें उपाधी । बाधूं सकेना । ६ ।

जयाचें आठवितां ध्यान । वाटे परम समाधान ।
नेत्रीं रिघोनियां मन । पांगुळे सर्वांगीं । ७ ।

सगुण रूपाची टेव । माहा लावण्य लाघव ।
नृत्य करितां सकळ देव । तटस्त होती । ८ ।

सर्वकाळ मदोन्मत । सदा आनंदें डुल्लत ।
हरुषें निर्भर उद्दित । सुप्रसन्नवदनु । ९ ।

भव्यरूप वितंड । भीममूर्ति माहा प्रचंड ।
विस्तीर्ण मस्तकीं उदंड । सिंधूर चर्चिला । १० ।

नाना सुगंध परिमळें । थबथबां गळती गंडस्थळें ।
तेथें आलीं षट्पदकुळें । झुंकारशब्दें । ११ ।

मुर्डीव शुंडादंड सरळे । शोभे अभिनव आवाळें ।
लंबित अधर तिक्षण गळे । क्षणक्षणा मंदसत्वी । १२ ।

चौदा विद्यांचा गोसावी । हरस्व लोचन ते हिलावी ।
लवलवित फडकावी । फडै फडै कर्णथापा । १३ ।

रत्नखचित मुगुटीं झळाळ । नाना सुरंग फांकती कीळ ।
कुंडलें तळपती नीळ । वरि जडिले झमकती । १४ ।

दंत शुभ्र सहट । रत्नखचित हेमकट्ट ।
तया तळवटीं पत्रें नीट । तळपती लघु लघु ।१५।
लवथवित मलपे दोंद । वेष्टित कट्ट नागबंद ।
क्षुद्र घंटिका मंद मंद । वाजती झणत्कारें ।१६।
चतुर्भुज लंबोदर । कासे कासिला पीतांबर ।
फडके दोंदिचा फणीवर । धुधूकार टाकी ।१७।
डोलवी मस्तक जिव्हा लाळी । घालून बैसला वेंटाळी ।
उभारोनि नाभिकमळीं । टकमकां पाहे ।१८।
नाना याति कुशममाळा । व्याळपरियंत रुळती गळा ।
रत्नजडित हृदयकमळा । वरी पदक शोभे ।१९।
शोभे फरश आणी कमळ । अंकुश तिक्षण तेजाळ ।
येके करीं मोदकगोळ । तयावरी अति प्रीति ।२०।
नट नाट्य कळा कुसरी । नाना छंदें नृत्य करी ।
टाळ मृदांग भरोवरी । उपांग हुंकारे ।२१।
स्थिरता नाहीं येक क्षण । चपळविशईं अग्रगण ।
साजिरी मूर्ति सुलक्षण । लावण्यखाणी ।२२।
रुणझुणां वाजती नेपुरें । वांकी बोभाटती गजरें ।
घागरियांसहित मनोहरें । पाउलें दोनि ।२३।
ईश्वरसभेसी आली शोभा । दिव्यांबरांची फांकली प्रभा ।
साहित्यविशईं सुल्लभा । अष्ट नायका होती ।२४।
ऐसा सर्वांगें सुंदरु । सकळ विद्यांचा आगरू ।
त्यासी माझा नमस्कारू । साष्टांग भावें ।२५।
ध्यान गणेशांचें वर्णितां । मतिप्रकाश होये भ्रांता ।
गुणानुवाद श्रवण करितां । वोळे सरस्वती ।२६।

जयासी ब्रह्मादिक वंदिती । तेथें मानव बापुडे किती ।
असो प्राणी मंदमती । तेहीं गणेश चिंतावा ।२७।

जे मूर्ख अवलक्षण । जे कां हीणाहूनि हीण ।
ते चि होती दक्ष प्रविण । सर्वविशईं ।२८।

ऐसा जो परम समर्थ । पूर्ण करी मनोरथ ।
सप्रचीत भजनस्वार्थ । कल्लौ चंडीविनायेकौ ।२९।

ऐसा गणेश मंगळमूर्ती । तो म्यां स्तविला येथामती ।
वांछ्या धरूनि चित्तीं । परमार्थाची ।३०।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'गणेशस्तवननाम'
समास दुसरा समाप्त.

❑❑

दशक १: समास ३

शारदास्तवन

॥ श्रीराम ॥

आतां वंदीन वेदमाता । श्रीशारदा ब्रह्मसुता ।
शब्दमूळ वाग्देवता । माहं माया । १ ।

जे उठवी शब्दांकुर । वदे वैखरी अपार ।
जे शब्दाचें अभ्यांतर । उकलून दावी । २ ।

जे योगियांची समाधी । जे धारिष्टांची कृतबुद्धी ।
जे विद्या अविद्या उपाधी । तोडून टाकी । ३ ।

जे माहापुरुषाची भार्या । अति सलग्न अवस्था तुर्या ।
जयेकरितां महत्कार्या । प्रवर्तले साधु । ४ ।

जे महंतांची शांती । जे ईश्वराची निज शक्ती ।
जे ज्ञानियांची विरक्ती । नैराशशोभा । ५ ।

जे अनंत ब्रह्मांडें घडी । लीळाविनोदेचि मोडी ।
आपण आदिपुरुषीं दडी । मारून राहे । ६ ।

जे प्रत्यक्ष पाहातां आडळे । विचार घेतां तरी नाडळे ।
जयेचा पार न कळे । ब्रह्मादिकांसी । ७ ।

जे सर्व नाटकअंतर्कळा । जाणीव स्फूर्ति निर्मळा ।
जयेचेनि स्वानंदसोहळा । ज्ञानशक्ती । ८ ।

जे लावण्यस्वरूपाची शोभा । जे परब्रह्मसूर्याची प्रभा ।
जे शब्दीं वदोनि उभा । संसार नासी । ९ ।

जे मोक्षश्रिया माहामंगळा । जे सत्रावी जीवनकळा ।
जे सत्वलीळा सुसीतळा । लावण्यखाणी ।१०।

जे अवेक्त पुरुषाची वेक्ती । विस्तारें वाढली इच्छाशक्ती ।
जे कळीकाळाची नियंती । सद्गुरुकृपा ।११।

जे परमार्थमार्गींचा विचार । निवडून दावी सारासार ।
भवसिंधूचा पैलपार । पाववी शब्दबळें ।१२।

ऐसी बहुवेषें नटली । माया शारदा येकली ।
सिद्धचि अंतरीं संचली । चतुर्विधा प्रकारें ।१३।

तींहीं वाचा अंतरीं आलें । तें वैखरिया प्रगट केलें ।
म्हणौन कर्तुत्व जितुकें जालें । तें शारदागुणें ।१४।

जे ब्रह्मादिकांची जननी । हरीहर जयेपासुनी ।
सृष्टिरचना लोक तिनी । विस्तार जयेचा ।१५।

जे परमार्थाचें मूळ । नांतरी सद्विद्याचि केवळ ।
निवांत निर्मळ निश्चळ । स्वरूपस्थिती ।१६।

जे योगियांचे ध्यानीं । जे साधकांचे चिंतनीं ।
जे सिद्धांचे अंत:कर्णीं । समाधिरूपें ।१७।

जे निर्गुणाची वोळखण । जे अनुभवाची खूण ।
जे व्यापकपणें संपूर्ण । सर्वां घटीं ।१८।

शास्त्रें पुराणें वेद श्रुति । अखंड जयेचें स्तवन करिती ।
नाना रूपीं जयेसी स्तविती । प्राणिमात्र ।१९।

जे वेदशास्त्रांची महिमा । जे निरोपमाची उपमा ।
जयेकरितां परमात्मा । ऐसें बोलिजे ।२०।

नाना विद्या कळा सिद्धी । नाना निश्चयाची बुद्धी ।
जे सूक्ष्म वस्तूची शुद्धी । ज्ञेप्तीमात्र ।२१।

जे हरिभक्तांची निजभक्ती । अंतरनिष्ठांची अंतरस्थिती ।
जे जीवन्मुक्तांची मुक्ती । सायोज्यता ते ।२२।

जे अनंत माया वैष्णवी । न कळे नाटक लाघवी ।
जे थोरथोरासी गोवी । जाणपणें ।२३।

जें जें दृष्टीनें देखिलें । जें जें शब्दें वोळखिलें ।
जें जें मनास भासलें । तितुकें रूप जयेंचे ।२४।

स्तवन भजन भक्ति भाव । मायेवांचून नाहीं ठाव ।
या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती ।२५।

म्हणौनि थोराहूनि थोर । जे ईश्वराचा ईश्वर ।
तयेसी माझा नमस्कार । तदांशेंचि आतां ।२६।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'शारदास्तवननाम'
समास तिसरा समाप्त.

❑❑

दशक १: समास ४

सद्‌गुरुस्तवन

॥ श्रीराम ॥

आतां सद्‌गुरु वर्णवेना । जेथें माया स्पर्शों सकेना ।
तें स्वरूप मज अज्ञाना । काये कळे ।१।

न कळे न कळे नेति नेति । ऐसें बोलतसे श्रुती ।
तेथें मज मूर्खाची मती । पवाडेल कोठें ।२।

मज न कळे हा विचारु । दुऱ्हूनि माझा नमस्कारु ।
गुरुदेवा पैलपारू । पाववीं मज ।३।

होती स्तवनाची दुराशा । तुटला मायेचा भर्वसा ।
आतां असाल तैसे असा । सद्‌गुरु स्वामी ।४।

मायेच्या बळें करीन स्तवन । ऐसें वांछित होतें मन ।
माया जाली लज्यायमान । काय करूं ।५।

नातुडे मुख्य परमात्मा । म्हणौनि करावी लागे प्रतिमा ।
तैसा मायायोगें महिमा । वर्णीन सद्‌गुरूचा ।६।

आपल्या भावासारिखा मनीं । देव आठवावा ध्यानीं ।
तैसा सद्‌गुरु हा स्तवनीं । स्तऊं आतां ।७।

जय जयाजि सद्‌गुरुराजा । विश्वंभरा विश्वबीजा ।
परमपुरुषा मोक्षध्वजा । दीनबंधु ।८।

तुझीयेन अभयंकरें । अनावर माया हे वोसरे ।
जैसें सूर्यप्रकाशें अंधारें । पळोन जाये ।९।

आदित्यें अंधकार निवारे । परंतु मागुतें ब्रह्मांड भरे ।
नीसी जालियांनंतरें । पुन्हा काळोखें ।१०।

तैसा नव्हे स्वामीराव । करी जन्ममृत्य वाव ।
समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी ।११।
सुवर्णांचे लोहो कांहीं । सर्वथा होणार नाहीं ।
तैसा गुरुदास संदेहीं । पडोंचिं नेणे सर्वथा ।१२।
कां सरिता गंगेसी मिळाली । मिळणी होतां गंगा जाली ।
मग जरी वेगळी केली । तरी होणार नाहीं सर्वथा ।१३।
परी ते सरिता मिळणीमागें । वाहाळ मानिजेत जगें ।
तैसा नव्हे शिष्य वेगें । स्वामीच होये ।१४।
परीस आपणाऐसें करीना । सुवर्णें लोहो पालटेना ।
उपदेश करी बहुत जना । अंकित सद्गुरुचा ।१५।
शिष्यास गुरुत्व प्राप्त होये । सुवर्णे सुवर्ण करितां न ये ।
म्हणौनि उपमा न साहे । सद्गुरुसी परिसाची ।१६।
उपमे द्यावा सागर । तरी तो अत्यंतचि क्षार ।
अथवा म्हणों क्षीरसागर । तरी तो नासेल कल्पांतीं ।१७।
उपमे द्यावा जरी मेरु । तरी तो जड पाषाण कठोरु ।
तैसा नव्हे कीं सद्गुरु । कोमळ दिनाचा ।१८।
उपमे म्हणों गगन । तरी गगनापरीस तें निर्गुण ।
या कारणें दृष्टांत हीण । सद्गुरुस गगनाचा ।१९।
धीरपणें उपमूं जगती । तरी हेहि खचेल कल्पांतीं ।
म्हणौन धीरत्वास दृष्टांतीं । हीण वसुंधरा ।२०।
आता उपमावा गभस्ती । तरी गभस्तीचा प्रकाश किती ।
शास्त्रें मर्यादा बोलती । सद्गुरु अमर्याद ।२१।
म्हणौनि उपमें उणा दिनकर । सद्गुरु ज्ञानप्रकाश थोर ।
आतां उपमावा फणीवर । तरी तोही भारवाही ।२२।

आतां उपमा द्यावें जळ । तरी तें काळांतरीं आटेल सकळ ।
सद्गुरुरूप तें निश्चळ । जाणार नाहीं ।२३।
सद्गुरुसी उपमावें अमृत । तरी अमर धरिती मृत्यपंथ ।
सद्गुरुकृपा यथार्थ । अमर करी ।२४।
सद्गुरुसी म्हणावें कल्पतरु । तरी हा कल्पनेतीत विचारु ।
कल्पवृक्षाचा अंगिकारु । कोण करी ।२५।
चिंता मात्र नाहीं मनीं । कोण पुसे चिंतामणी ।
कामधेनूचीं दुभणीं । निःकामासी न लगती ।२६।
सद्गुरु म्हणों लक्ष्मीवंत । तरी ते लक्ष्मी नाशिवंत ।
ज्याचे द्वारीं असे तिष्ठत । मोक्षलक्ष्मी ।२७।
स्वर्गलोक इंद्र संपती । हे काळांतरी विटंबती ।
सद्गुरूकृपेची प्राप्ती । काळांतरीं चळेना ।२८।
हरीहर ब्रह्मादिक । नाश पावती सकळिक ।
सर्वदा अविनाश येक । सद्गुरूपद ।२९।
तयासी उपमा काय द्यावी । नाशिवंत सृष्टी आघवी ।
पंचभूतिक उठाठेवी । न चलें तेथें ।३०।
म्हणौनि सद्गुरु वर्णवेना । हे गे हेचि माझी वर्णना ।
अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती ।३१।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सद्गुरुस्तवननाम'
समास चौथा समाप्त.

❑❑

दशक १ : समास ५

संतस्तवन

॥ श्रीराम ॥

आतां वंदीन सज्जन । जे परमार्थाचें अधिष्ठान ।
जयांचेनि गुह्यज्ञान । प्रगटे जनीं ।। १ ।।

जे वस्तु परम दुल्लभ । जयेचा अलभ्य लाभ ।
तेंचि होये सुल्लभ । संतसंगें करूनी ।। २ ।।

वस्तु प्रगटचि असे । पाहातां कोणासीच न दिसे ।
नाना साधनीं सायासें । न पडे ठाईं ।। ३ ।।

जेथें परीक्षवंत ठकले । नांतरी डोळसचि अंध जाले ।
पाहात असतांचि चुकले । निजवस्तूसी ।। ४ ।।

जें दीपाचेनि दिसेना । नाना प्रकाशें गवसेना ।
नेत्रांजनेंहि वसेना । दृष्टीपुढें ।। ५ ।।

सोळां कळी पूर्ण शशी । दाखऊं शकेना वस्तूसी ।
तीव्र आदित्य कळारासी । तोहि दाखवीना ।। ६ ।।

जया सूर्याचेनि प्रकाशें । ऊर्णतंत तोहि दिसे ।
नाना सूक्ष्म पदार्थ भासे । अणुरेणादिक ।। ७ ।।

चिरलें वाळाग्र तेंहि प्रकासी । परी तो दाखवीना वस्तूसी ।
तें जयाचेनि साधकांसी । प्राप्त होये ।। ८ ।।

जेथें आक्षेप आटले । जेथें प्रेत्न प्रस्तावले ।
जेथें तर्क मंदावले । तर्कितां निजवस्तूसी ।। ९ ।।

बळे विवेकाची वेंगडी । पडे शब्दाची बोबडी ।
जेथें मनाची तांतडी । कामा नये ।। १० ।।

जो बोलकेपणें विशेष । सहस्त्र मुखांचा जो शेष ।
तोहि सिणला निःशेष । वस्तु न संगवे ।।११।
वेदें प्रकाशिलें सर्वही । वेदविरहित कांहीं नाहीं ।
तो वेद कोणासही । दाखऊं सकेना ।।१२।
तेचि वस्तु संतसंगे । स्वानुभवें कळों लागे ।
त्याचा महिमा वचनीं सांगे । ऐसा कवणु ।।१३।
विचित्र कळा ये मायेची । परी वोळखी न संगवे वस्तूची ।
मायातीता अनंताची । संत सोये सांगती ।।१४।
वस्तूसी वर्णिलें नवचे । तेंचि स्वरूप संतांचें ।
या कारणें वचनांचें । कार्य नाहीं ।।१५।
संत आनंदाचें स्थळ । संत सुखचि केवळ ।
नाना संतोषाचें मूळ । ते हे संत ।।१६।
संत विश्रांतीची विश्रांती । संत तृप्तीची निजतृप्ती ।
नातरी भक्तीची फळश्रुती । ते हे संत ।।१७।
संत धर्माचें धर्मक्षेत्र । संत स्वरूपाचें सत्पात्र ।
नातरी पुण्याची पवित्र । पुण्यभूमी ।।१८।
संत समाधीचें मंदिर । संत विवेकाचें भांडार ।
नातरी बोलिजे माहेर । सायोज्यमुक्तीचें ।।१९।
संत सत्याचा निश्चयो । संत सार्थकाचा जयो ।
संत प्राप्तीचा समयो । सिद्धरूप ।।२०।
मोक्षश्रिया आळंकृत । ऐसे हे संत श्रीमंत ।
जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले ।।२१।
जे समर्थपणें उदार । जे कां अत्यंत दानशूर ।
तयांचेनि हा ज्ञानविचार । दिधला न वचे ।।२२।

माहाराजे चक्रवर्ती । जाले आहेत पुढें होती ।
परंतु कोणी सायोज्यमुक्ती । देणार नाहीं ।२३।
जें त्रैलोकीं नाहीं दान । तें करिती संतसज्जन ।
तयां संतांचे महिमान । काय म्हणौनि वर्णावें ।२४।
जें त्रैलोक्याहून वेगळें । जें वेदश्रुतीसी नाकळें ।
तेंचि जयांचेनि वोळें । परब्रह्म अंतरीं ।२५।
ऐसी संतांची महिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा ।
जयांचेनि मुख्य परमात्मा । प्रगट होये ।२६।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'संतस्तवननाम'
समास पाचवा समाप्त.

❑❑

दशक १ : समास ६

श्रोतेजनस्तवन

॥ श्रीराम ॥

आतां वंदूं श्रोते जन । भक्त ज्ञानी संत सज्जन ।
विरक्त योगी गुणसंपन्न । सत्यवादी ।१।
येक सत्वाचे सागर । येक बुद्धीचे आगर ।
येक श्रोते वैरागर । नाना शब्दरत्नाचे ।२।
जे नाना अर्थांबृताचे भोक्ते । जे प्रसंगी वक्तयाचे वक्ते ।
नाना संशयातें छेदिते । निश्चई पुरुष ।३।
ज्यांची धारणा अपार । जे ईश्वराचे अवतार ।
नातरी प्रत्यक्ष सुरवर । बैसले जैसे ।४।

किं हे ऋषेश्वरांची मंडळी । शांतस्वरूप सत्वागळी ।
जयांचेनि सभामंडळीं । परम शोभा । ५ ।

हृदईं वेदगर्भ विलसे । मुखीं सरस्वती विळासे ।
साहित्य बोलतां जैसे । भासती देवगुरु । ६ ।

जे पवित्रपणें वैश्वानर । जे स्फूर्तिकिरणाचे दिनकर ।
ज्ञातेपणें दृष्टीसमोर । ब्रह्मांड नयें । ७ ।

जे अखंड सावधान । जयांस त्रिकाळाचें ज्ञान ।
सर्वकाळ निराभिमान । आत्मज्ञानी । ८ ।

ज्यांचें दृष्टीखालून गेलें । ऐसें कांहींच नाहीं उरलें ।
पदार्थमात्रांसी लक्षिलें । मनें जयांच्या । ९ ।

जें जें कांहीं आठवावें । तें तें तयांस पूर्वीच ठावें ।
तेथें काये अनुवादावें । ज्ञातेपणेंकरूनी ।१०।

परंतु हे गुणग्राहिक । म्हणौन बोलतों निःशंक ।
भाग्यपुरुष काये येक । सेवीत नाहीं ।११।

सदा सेविती दिव्यान्नें । पालटाकरणें आवेट अन्नें ।
तैसींच माझीं वचनें । पराकृतें ।१२।

आपुले शक्तिनुसार । भावें पुजावा परमेश्वर ।
परंतु पुजूं नये हा विचार । कोठेंच नाहीं ।१३।

तैसा मी येक वाग्दुर्बळ । श्रोते परमेश्वरचि केवळ ।
यांची पूजा वाचाबरळ । करूं पाहे ।१४।

वित्पत्ती नाहीं कळा नाहीं । चातुर्य नाहीं प्रबंद नाहीं ।
भक्ति ज्ञान वैराग्य नाहीं । गौल्यता नाहीं वचनाची ।१५।

ऐसा माझा वाग्विळास । म्हणौन बोलतों सावकाश ।
भावाचा भोक्ता जगदीश । म्हणौनियां ।१६।

तुम्ही श्रोते जगदीशमूर्ति । तेथें माझी वित्पत्ती किती ।
बुद्धिहीण अल्पमती । सलगी करितों ।१७।

समर्थाचा पुत्र मूर्ख जगीं । परी सामर्थ्य असे त्यांचे आंगीं ।
तुम्हां संतांचा सलगी । म्हणौनि करितों ।१८।

व्याघ्र सिंह भयानक । देखोनि भयचकित लोक ।
परि त्यांचीं पिलीं निःशंक । तयांपुढें खेळती ।१९।

तैसा मी संतांचा अंकित । तुम्हां संतांपासीं बोलत ।
तरी माझी चिंता तुमचें चित्त । वाहेलच कीं ।२०।

आपलेंचि बोले वाउगें । त्याची संपादणी करणें लागे ।
परंतु कांहीं सांगणें नलगे । न्यून तें पूर्ण करावें ।२१।

हें तों प्रीतीचें लक्षण । स्वभावेंचि करी मन ।
तैसे तुम्ही संतसज्जन । मायेबाप विश्वाचे ।२२।

माझा आशय जाणोनि जीवें । आतां उचित तें करावें ।
पुढें कथेसि अवधान द्यावें । म्हणे दासानुदास ।२३।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'श्रोतेजनस्तवननाम'
समास सहावा समाप्त.

❑❑

दशक १ : समास ७

कवेश्वरस्तवन

॥ श्रीराम ॥

आतां वंदूं कवेश्वर । शब्दसृष्टीचे ईश्वर ।
नातरी हे परमेश्वर । वेदावतारी ।१।

कीं हे सरस्वतीचें निजस्थान । कीं हे नाना कळांचें जीवन ।
नाना शब्दांचें भुवन । येथार्थ होये । २ ।
कीं हे पुरुषार्थाचें वैभव । कीं हे जगदेश्वराचें महत्त्व ।
नाना लाघवें सत्कीर्तीस्तव । निर्माण कवी । ३ ।
कीं हे शब्दरत्नाचे सागर । कीं हे मुक्तांचें मुक्त सरोवर ।
नाना बुद्धीचे वैरागर । निर्माण जाले । ४ ।
अध्यात्मग्रंथांची खाणी । कीं हे बोलके चिंतामणी ।
नाना कामधेनूचीं दुभणीं । वोळलीं श्रोतयांसी । ५ ।
कीं हे कल्पनेचे कल्पतरु । कीं हे मोक्षाचे मुख्य पडीभरु ।
नाना सायोज्यतेचे विस्तारु । विस्तारले । ६ ।
कीं हा परलोकींचा निजस्वार्थु । कीं हा योगियांचा गुप्त पंथु ।
नाना ज्ञानियांचा परमार्थु । रूपासि आला । ७ ।
कीं हे निरंजनाची खूण । कीं हे निर्गुणाची वोळखण ।
मायाविलक्षणाचें लक्षण । ते हे कवी । ८ ।
कीं हा श्रुतीचा भावगर्भ । कीं हा परमेश्वराचा अलभ्य लाभ ।
नातरी होये सुल्लभ । निजबोध कविरूपें । ९ ।
कवि मुमुक्षाचें अंजन । कवि साधकांचें साधन ।
कवि सिद्धांचें समाधान । निश्चयात्मक ।१०।
कवि स्वधर्माचा आश्रयो । कवि मनाचा मनोजयो ।
कवि धार्मिकाचा विनयो । विनयकर्ते ।११।
कवि वैराग्याचें संरक्षण । कवि भक्तांचें भूषण ।
नाना स्वधर्मरक्षण । ते हे कवी ।१२।
कवि प्रेमळांची प्रेमळ स्थिती । कवि ध्यानस्थांची ध्यानमूर्ती ।
कवि उपासकांची वाढ कीर्ती । विस्तारली ।१३।

नाना साधनाचें मूळ । कवि नाना प्रेत्नाचें फळ ।
नाना कार्यसिद्धी केवळ । कविचेनि प्रसादें ।।१४।।

आधीं कवीचा वाग्विळास । तरी मग श्रवणीं तुंबळे रस ।
कवीचेनि मतिप्रकाश । कवित्वास होये ।।१५।।

कवि वित्पन्नाची योग्यता । कवि सामर्थ्यवंतांची सत्ता ।
कवि विचक्षणाची कुशळता । नाना प्रकारें ।।१६।।

कवि कवित्वाचा प्रबंद । कवि नाना धाटी मुद्रा छंद ।
कवि गद्यपद्यें भेदाभेद । पदप्रासकर्ते ।।१७।।

कवि सृष्टीचा आळंकार । कवि लक्ष्मीचा शृंगार ।
सकळ सिद्धीचा निर्धार । ते हे कवी ।।१८।।

कवि सभेचें मंडण । कवि भाग्याचें भूषण ।
नाना सुखाचें संरक्षण । ते हे कवी ।।१९।।

कवि देवांचे रूपकर्ते । कवि ऋषींचें महत्त्ववर्णिते ।
नाना शास्त्रांचे सामर्थ्या ते । कवि वाखाणिती ।।२०।।

नस्ता कवीचा व्यापार । तरी कैंचा अस्ता जगोद्धार ।
म्हणौनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ।।२१।।

नाना विद्या ज्ञातृत्व कांहीं । कवेश्वरेंविण तों नाहीं ।
कविपासून सर्वहि । सर्वज्ञता ।।२२।।

मागां वाल्मीक व्यासादिक । जाले कवेश्वर अनेक ।
तयांपासून विवेक । सकळ जनासी ।।२३।।

पूर्वीं काव्यें होतीं केलीं । तरीच वित्पत्ति प्राप्त जाली ।
तेणें पंडिताआंगीं बाणली । परम योग्यता ।।२४।।

ऐसें पूर्वीं थोर थोर । जाले कवेश्वर अपार ।
आतां आहेत पुढें होणार । नमन त्यांसी ।।२५।।

नाना चातुर्याच्या मूर्ती । कीं हे साक्षात् बृहस्पती ।
वेद श्रुती बोलों म्हणती । ज्यांच्या मुखें ।२६।

परोपकाराकारणें । नाना निश्चय अनुवादणें ।
सेखीं बोलिले पूर्णपणें । संशयातीत ।२७।

कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसाचे वोघ लोटले ।
नाना सुखाचें उचंबळलें । सरोवर हे ।२८।

कीं हे विवेकनिधीचीं भांडारें । प्रगट जालीं मनुष्याकारें ।
नाना वस्तूचेनि विचारें । कोंदाटले हे ।२९।

कीं हे आदिशक्तीचें ठेवणें । नाना पदार्थास आणी उणें ।
लाधलें पूर्व संचिताच्या गुणें । विश्वजनासी ।३०।

कीं हे सुखाचीं तारुवें लोटलीं । आक्षै आनंदें उतटलीं ।
विश्वजनास उपेगा आलीं । नाना प्रयोगाकारणें ।३१।

कीं हे निरंजनाची संपत्ती । कीं हे विराटाची योगस्थिती ।
नातरी भक्तीची फळश्रुती । फळास आली ।३२।

कीं हा ईश्वराचा पवाड । पाहातां गगनाहून वाड ।
ब्रह्मांडरचनेहून जाड । कविप्रबंदरचना ।३३।

आतां असो हा विचार । जगास आधार कवेश्वर ।
तयांसी माझा नमस्कार । साष्टांग भावें ।३४।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'कवेश्वरस्तवननाम'
समास सातवा समाप्त.

❑❑

दशक १: समास ८

सभास्तवन

॥ श्रीराम ॥

आतां वंदूं सकळ सभा । जये सभेसी मुक्ती सुल्लभा ।
जेथें स्वयें जगदीश उभा । तिष्ठतु भरें । १ ।

नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ ।
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥

नाहीं वैकुंठीचा ठाईं । नाहीं योगियांचा हृदईं ।
माझे भक्त गाती ठाईं ठाईं । तेथें मी तिष्ठतु नारदा । २ ।

याकारणें सभा श्रेष्ठ । भक्त गाती तें वैकुंठ ।
नामघोषें घडघडाट । जयजयकारें गर्जती । ३ ।

प्रेमळ भक्तांचीं गायनें । भगवत्कथा हरिकीर्तनें ।
वेदव्याख्यान पुराणश्रवणें । जेथें निरंतर । ४ ।

परमेश्वराचे गुणानुवाद । नाना निरूपणाचे संवाद ।
अध्यात्मविद्या भेदाभेद । मथन जेथें । ५ ।

नाना समाधानें तृप्ती । नाना आशंकानिवृत्ती ।
चित्तीं बैसे ध्यानमूर्ति । वाग्विळासें । ६ ।

भक्त प्रेमळ भाविक । सभ्य सखोल सात्विक ।
रम्य रसाळ गायक । निष्ठावंत । ७ ।

कर्मसीळ आचारसीळ । दानसीळ धर्मसीळ ।
सुचिस्मंत पुण्यसीळ । अंतरशुद्ध कृपाळु । ८ ।

योगी वीतरागी उदास । नेमक निग्रह तापस ।
विरक्त निस्पृह बहुवस । आरण्यवासी । ९ ।

दंडधारी जटाधारी । नाथपंथी मुद्राधारी ।
येक बाळब्रह्मचारी । योगेश्वर ।१०।

पुरश्चरणी आणि तपस्वी । तीर्थवासी आणि मनस्वी ।
महायोगी आणि जनस्वी । जनासारखे ।११।

सिद्ध साधु आणी साधक । मंत्रयंत्रशोधक ।
येकनिष्ठ उपासक । गुणग्राही ।१२।

संत सज्जन विद्वज्जन । वेदज्ञ शास्त्रज्ञ माहाजन ।
प्रबुद्ध सर्वज्ञ समाधान । विमळकर्ते ।१३।

योगी वित्पन्न ऋषेश्वर । धूर्त तार्किक कवेश्वर ।
मनोजयाचे मुनेश्वर । आणी दिग्वल्की ।१४।

ब्रह्मज्ञानी आत्मज्ञानी । तत्त्वज्ञानी पिंडज्ञानी ।
योगाभ्यासी योगज्ञानी । उदासीन ।१५।

पंडित आणी पुराणिक । विद्वांस आणी वैदिक ।
भट आणी पाठक । येजुर्वेदी ।१६।

माहाभले माहाश्रोत्री । याज्ञिक आणी आग्नहोत्री ।
वैद्य आणी पंचाक्षरी । परोपकारकर्ते ।१७।

भूत भविष्य वर्तमान । जयांस त्रिकाळाचें ज्ञान ।
बहुश्रुत निराभिमान । निरापेक्षी ।१८।

शांती क्षमा दयासीळ । पवित्र आणी सत्वसीळ ।
अंतरशुद्ध ज्ञानसीळ । ईश्वरी पुरुष ।१९।

ऐसे जे कां सभानायेक । जेथे नित्यानित्यविवेक ।
त्यांचा महिमा अलोलिक । काय म्हणोनि वर्णावा ।२०।

जेथें श्रवणाचा उपाये । आणी परमार्थसमुदाये ।
तेथें जनासी तरणोपाये । सहजचि होये ।२१।

उत्तम गुणांची मंडळी । सत्त्वधीर सत्त्वागळी ।
नित्य सुखाची नव्हाळी । जेथें वसे ।२२।

विद्यापात्रें कळापात्रें । विशेष गुणांची सत्पात्रें ।
भगवंताचीं प्रीतिपात्रें । मिळालीं जेथें ।२३।

प्रवृत्ती आणी निवृत्ती । प्रपंची आणी परमार्थी ।
गृहस्थाश्रमी वानप्रहस्ती । संन्यासादिक ।२४।

वृद्ध तरुण आणी बाळ । पुरुष स्त्रियादिक सकळ ।
अखंड ध्याती तमाळनीळ । अंतर्यामीं ।२५।

ऐसे परमेश्वराचे जन । त्यांसी माझे अभिवंदन ।
जयांचेनि समाधान । अकस्मात बाणे ।२६।

ऐसिये सभेचा गजर । तेथें माझा नमस्कार ।
जेथें नित्य निरंतर । कीर्तन भगवंताचें ।२७।

जेथे भगवंताच्या मूर्ती । तेथें पाविजे उत्तम गती ।
ऐसा निश्चय बहुतां ग्रंथीं । महंत बोलिले ।२८।

कल्लौ कीर्तन वरिष्ठ । जेथें होय ते सभा श्रेष्ठ ।
कथाश्रवणें नाना नष्ट । संदेह मावळती ।२९।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सभास्तवननाम'
समास आठवा समाप्त.

❑❑

दशक १: समास ९

परमार्थस्तवन

॥ श्रीराम ॥

आतां स्तऊं हा परमार्थ । जो साधकांचा निजस्वार्थ ।
नांतरी समर्थामध्यें समर्थ । योग हा । १ ।

आहे तरी परम सुगम । परी जनासी जाला दुर्गम ।
कां जयाचें चुकलें वर्म । सत्समागमाकडे । २ ।

नाना साधनांचे उधार । हा रोकडा ब्रह्मसाक्षात्कार ।
वेदशास्त्रीं जें सार । तें अनुभवास ये । ३ ।

आहे तरी चहूंकडे । परी अणुमात्र दृष्टी न पडे ।
उदास परी येकीकडे । पाहातां दिसेना । ४ ।

आकाशमार्गीं गुप्त पंथ । जाणती योगिये समर्थ ।
इतरांस हा गुह्यार्थ । सहसा न कळे । ५ ।

साराचेंहि निजसार । अखंड अक्षै अपार ।
नेऊं न सकती तश्कर । कांहीं केल्या । ६ ।

तयास नाहीं राजभये । अथवा नाहीं अग्निभये ।
अथवा स्वापदभये । बोलोंच नये । ७ ।

परब्रह्म तें हालवेना । अथवा ठावहि चुकेना ।
काळांतरीं चळेना । जेथीचा तेथें । ८ ।

ऐसें ते निज ठेवणें । कदापि पालटों नेणें ।
अथवा नव्हे आदिक उणें । बहुतां काळें । ९ ।

अथवा तें घसवटेना । अथवा अदृश्य होयेना ।
नातरी पाहाता दिसेना । गुरुअंजनेंविण । १० ।

मागां योगिये समर्थ । त्यांचाहि निजस्वार्थ ।
यासी बोलिजे परमार्थ । परमगुह्य म्हणौनि ।।११।

जेंहीं शोधून पाहिला । त्यासी अर्थ सांपडला ।
येरां असोनि अलभ्य जाला । जन्मोजन्मीं ।।१२।

अपूर्वता या परमार्थाची । वार्ता नाहीं जन्ममृत्याची ।
आणि पदवी सायोज्यतेची । सन्निधचि लाभे ।।१३।

माया विवेकें मावळे । सारासार विचार कळें ।
परब्रह्म तेंहि निवळे । अंतर्यामीं ।।१४।

ब्रह्म भासलें उदंड । ब्रह्मीं बुडालें ब्रह्मांड ।
पंचभूतांचें थोतांड । तुछ्य वाटे ।।१५।

प्रपंच वाटे लटिका । माया वाटे लापणिका ।
शुद्ध आत्मा विवेका । अंतरीं आला ।।१६।

ब्रह्मस्थित बाणतां अंतरीं । संदेह गेला ब्रह्मांडाबाहेरी ।
दृश्याची जुनी जर्जरी । कुहिट जाली ।।१७।

ऐसा हा परमार्थ । जो करी त्याचा निजस्वार्थ ।
आतां या समर्थास समर्थ । किती म्हणौनि म्हणावें ।।१८।

या परमार्थाकरितां । ब्रह्मादिकांसि विश्रामता ।
योगी पावती तन्मयता । परब्रह्मीं ।।१९।

परमार्थ सकळांस विसांवा । सिद्ध साधु माहानुभावां ।
सेखीं सात्त्विक जड जीवां । सत्संगेंकरूनी ।।२०।

परमार्थ जन्माचें सार्थक । परमार्थ संसारीं तारक ।
परमार्थ दाखवी परलोक । धार्मिकासी ।।२१।

परमार्थ तापसांसी थार । परमार्थ साधकांसी आधार ।
परमार्थ दाखवी पार । भवसागराचा ।।२२।

परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी ।
या परमार्थाची सरी । कोणास द्यावी ।२३।
अनंत जन्मींचें पुण्य जोडे । तरीच परमार्थ घडे ।
मुख्य परमात्मा आतुडे । अनुभवासी ।२४।
जेणें परमार्थ वोळखिला । तेणें जन्म सार्थक केला ।
येर तो पापी जन्मला । कुलक्षयाकारणें ।२५।
असो भगवत्प्राप्तीविण । करी संसाराचा सीण ।
त्या मूर्खांचें मुखावलोकन । करूंच नयें ।२६।
भल्यानें परमार्थी भरावें । शरीर सार्थक करावें ।
पूर्वजांस उद्धरावें । हरिभक्ती करूनी ।२७।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'परमार्थस्तवननाम'
समास नववा समाप्त.

❑❑

दशक १: समास १०

नरदेहस्तवन

॥ श्रीराम ॥

धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो ।
जो जो कीजे परमार्थलाहो । तो तो पावे सिद्धीतें ।१।
या नरदेहाचेनि लागवेगें । येक लागले भक्तिसंगें ।
येकीं परम वीतरागें । गिरिकंदरें सेविलीं ।२।
येक फिरती तीर्थाटणें । येक करिती पुरश्चरणें ।
येक अखंड नामस्मरणें । निष्ठावंत राहिले ।३।

येक तपें करू लागले । येक योगाभ्यासी माहाभले ।
येक अभ्यासयोगें जाले । वेदशास्त्रीं वित्पन्न । ४ ।

येकीं हटनिग्रह केला । देह अत्यंत पीडिला ।
येकीं देव ठाईं पाडिला । भावार्थबळें । ५ ।

येक माहानुभाव विख्यात । येक भक्त जाले ख्यात ।
येक सिद्ध अकस्मात । गगन वोळगती । ६ ।

येक तेजीं तेजचि जाले । येक जळीं मिळोन गेले ।
येक ते दिसतचि अदृश्य जालें । वायोस्वरूपीं । ७ ।

येक येकचि बहुधा होती । येक देखतचि निघोनि जाती ।
येक बैसलें असताची भ्रमती । नाना स्थानीं समुद्रीं । ८ ।

येक भयानकावरी बैसती । येक अचेतनें चालविती ।
येक प्रेतें उठविती । तपोबळेंकरूनी । ९ ।

येक तेजें मंद करिती । येक जळें आटविती ।
येक वायो निरोधिती । विश्वजनाचा ।१०।

ऐसे हटनिग्रही कृतबुद्धी । जयांस वोळल्या नाना सिद्धि ।
ऐसे सिद्ध लक्षावधी । होऊन गेले ।११।

येक मनोसिद्ध येक वाचासिद्ध । येक अल्पसिद्ध येक सर्वसिद्ध ।
ऐसे नाना प्रकारीचे सिद्ध । विख्यात जाले ।१२।

येक नवविधाभक्तिराजपंथें । गेले तरले परलोकींच्या निजस्वार्थें ।
येक योगी गुप्तपंथे । ब्रह्मभुवना पावले ।१३।

येक वैकुंठास गेले । येक सत्यलोकीं राहिले ।
येक कैळासीं बैसले । शिवरूप होउनी ।१४।

येक इंद्रलोकीं इंद्र जाले । येक पितृलोकीं मिळाले ।
येक ते उडगणीं बैसले । येक ते क्षीरसागरीं ।१५।

सलोकता समीपता । स्वरूपता सायोज्यता ।
या चत्वार मुक्ती तत्वतां । इच्छा सेऊन राहिले ।१६।

ऐसे सिद्ध साधु संत । स्वहिता प्रवर्तले अनंत ।
ऐसा हा नरदेह विख्यात । काय म्हणौनि वर्णावा ।१७।

या नरदेहाचेनि आधारें । नाना साधनांचेनि द्वारें ।
मुख्य सारासारविचारें । बहुत सुटले ।१८।

या नरदेहाचेनि संबंधें । बहुत पावले उत्तम पदें ।
अहंता सांडून स्वानंदें । सुखी जाले ।१९।

नरदेहीं येऊन सकळ । उधरागती पावले केवळ ।
येथें संशयाचें मूळ । खंडोन गेलें ।२०।

पशुदेहीं नाहीं गती । ऐसें सर्वत्र बोलती ।
म्हणौन नरदेहींच प्राप्ती । परलोकाची ।२१।

संत महंत ऋषी मुनी । सिद्ध साधु समाधानी ।
भक्त मुक्त ब्रह्मज्ञानी । विरक्त योगी तपस्वी ।२२।

तत्त्वज्ञानी योगाभ्यासी । ब्रह्मचारी दिगंबर संन्यासी ।
शड्दर्शनी तापसी । नरदेहींच जाले ।२३।

म्हणौनि नरदेह श्रेष्ठ । नाना देहांमधें वरिष्ठ ।
जयाचेनि चुके आरिष्ट । येमयातनेचें ।२४।

नरदेह हा स्वाधेन । सहसा नव्हे पराधेन ।
परंतु हा परोपकारीं झिजऊन । कीर्तिरूपें उरवावा ।२५।

अश्व वृषभ गाई म्हैसी । नाना पशु स्त्रिया दासी ।
कृपाळूपणें सोडितां त्यांसी । कोणी तरी धरील ।२६।

तैसा नव्हे नरदेहो । इच्छा जाव अथवा राहो ।
परी यास कोणी पाहो । बंधन करूं सकेना ।२७।

नरदेह पांगुळ असता । तरी तो कार्यास न येता ।
अथवा थोंटा जरी असता । तरी परोपकारास न ये ।२८।

नरदेह अंध असिला । तरी तो निपटचि वायां गेला ।
अथवा बधिर जरी असिला । तरी निरूपण नाहीं ।२९।

नरदेह असिला मुका । तरी घेतां न ये आशंका ।
अशक्त रोगी नासका । तरी तो निःकारण ।३०।

नरदेह असिला मूर्ख । अथवा फेंपऱ्या समंधाचें दुःख ।
तरी तो जाणावा निरार्थक । निश्चयेंसीं ।३१।

इतुकें हें नस्तां वेंग । नरदेह आणी सकळ सांग ।
तेणें धरावा परमार्थमार्ग । लागेवेगें ।३२।

सांग नरदेह जोडले । आणि परमार्थबुद्धि विसरलें ।
तें मूर्ख कैसें भ्रमलें । मायाजाळीं ।३३।

मृत्तिका खाणोन घर केलें । तें माझें ऐसें दृढ कल्पिलें ।
परी तें बहुतांचें हें कळलें । नाहींच तयासी ।३४।

मूषक म्हणती घर आमुचें । पाली म्हणती घर आमुचें ।
मक्षिका म्हणती घर आमुचें । निश्चयेंसीं ।३५।

कांतण्या म्हणती घर आमुचें । मुंगळे म्हणती घर आमुचें ।
मुंग्या म्हणती घर आमुचें । निश्चयेंसीं ।३६।

विंचू म्हणती आमुचें घर । सर्प म्हणती आमुचें घर ।
झुरळें म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ।३७।

भ्रमर म्हणती आमुचें घर । भिंगोऱ्या म्हणती आमुचें घर ।
आळिका म्हणती आमुचें घर । काष्ठामध्यें ।३८।

मार्जरें म्हणती आमुचें घर । श्वानें म्हणती आमुचें घर ।
मुंगसें म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ।३९।

पुंगळ म्हणती आमुचें घर । वाळव्या म्हणती आमुचें घर ।
पिसुवा म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ।४०।

ढेंकुण म्हणती आमुचें घर । चांचण्या म्हणती आमुचें घर ।
घुंगर्डीं म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ।४१।

पिसोळे म्हणती आमुचें घर । गांधेले म्हणती आमुचें घर ।
सोट म्हणती आमुचें घर । आणी गोंबी ।४२।

बहुत किड्यांचा जोजार । किती सांगावा विस्तार ।
समस्त म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ।४३।

पशु म्हणती आमुचें घर । दासी म्हणती आमुचें घर ।
घरीचीं म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ।४४।

पाहुणे म्हणती आमुचें घर । मित्र म्हणती आमुचें घर ।
ग्रामस्थ म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ।४५।

तश्कर म्हणती आमुचें घर । राजकी म्हणती आमुचें घर ।
आग्न म्हणे आमुचें घर । भस्म करूं ।४६।

समस्त म्हणती घर माझें । हें मूर्खही म्हणे माझें माझें ।
सेवट जड जालें वोझें । टाकिला देश ।४७।

अवघीं घरें भंगलीं । गांवांची पांढरी पडिली ।
मग ते गृहीं राहिली । अरण्यश्वापदें ।४८।

किडा मुंगी वाळवी मूषक । त्यांचेंच घर हें निश्चयात्मक ।
हें प्राणी बापुडें मूर्ख । निघोन गेलें ।४९।

ऐसी गृहांची स्थिती । मिथ्या आली आत्मप्रचिती ।
जन्म दों दिसांची वस्ती । कोठे तरी करावी ।५०।

देह म्हणावें आपुलें । तरी हें बहुतांकारणें निर्मिलें ।
प्राणीयांच्या माथां घर केलें । वा मस्तकीं भक्षिती ।५१।

रोमेमुळे किडे भक्षिती । खांडुक जाल्यां किडे पडती ।
पोटामध्यें जंत होती । प्रत्यक्ष प्राणियांच्या ।५२।

कीड लागे दांतांसी । कीड लागे डोळ्यांसी ।
कीड लागे कर्णासी । आणी गोमाशा भरती ।५३।

गोंचिड अशुद्ध सेविती । चामवा मांसांत घुसती ।
पिसोळे चाऊन पळती । अकस्मात ।५४।

भोंगें गांधेलें चाविती । गोंबी जळवा अशुद्ध घेती ।
विंचू सर्प दंश करिती । कानटें फुर्सी ।५५।

जन्मून देह पाळिलें । तें अकस्मात व्याघ्रें नेलें ।
कां तें लांडगींच भक्षिलें । बळात्कारें ।५६।

मूषकें माजरि दंश करिती । स्वानें अश्वें लोले तोडिती ।
रीसें मर्कटें मारिती । कासावीस करूनी ।५७।

उष्टरें डसोन उचलिती । हस्थी चिर्डून टाकिती ।
वृषभ टोचून मारिती । अकस्मात ।५८।

तस्कर तडतडां तोडिती । भूतें झडपोन मारिती ।
असो या देहाची स्थिती । ऐसी असे ।५९।

ऐसें शरीर बहुतांचें । मूर्ख म्हणे आमुचें ।
परंतु खाजें जिवांचें । तापत्रैं बोलिलें ।६०।

देह परमार्थीं लाविलें । तरीच याचें सार्थक जालें ।
नाहीं तरी हें वेर्थचि गेलें । नाना आघातें मृत्यपंथें ।६१।

असो जे प्रापंचिक मूर्ख । ते काये जाणती परमार्थसुख ।
त्या मूर्खांचें लक्षण कांहीं येक । पुढें बोलिलें असे ।६२।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'नरदेहस्तवननिरूपणनाम'
समास दहावा समाप्त.

❑❑

दशक पहिला समाप्त

❑❑

दशक दुसरा : मूर्खलक्षणांचा

दशक २: समास १

मूर्खलक्षण

॥ श्रीराम ॥

ॐ नमोजि गजानना । येकदंता त्रिनयना ।
कृपादृष्टी भक्तजना । अवलोकावें । १ ।

तुज नमू वेदमाते । श्रीशारदे ब्रह्मसुते ।
अंतरी वसे कृपावंते । स्फूर्तिरूपें । २ ।

वंदूनी सद्गुरुचरण । करून रघुनाथस्मरण ।
त्यागार्थ मूर्खलक्षण । बोलिजेल । ३ ।

येक मूर्ख येक पढतमूर्ख । उभय लक्षणीं कौतुक ।
श्रोती सादर विवेक । केला पाहिजे । ४ ।

पढतमूर्खांचें लक्षण । पुढिले समासीं निरूपण ।
सावध होऊनि विचक्षण । परिसोत पुढें । ५ ।

आतां प्रस्तुत विचार । लक्षणें सांगतां अपार ।
परि कांहीं येक तत्पर । होऊन ऐका । ६ ।

जे प्रापंचिक जन । जयांस नाहीं आत्मज्ञान ।
जे केवळ अज्ञान । त्यांचीं लक्षणें । ७ ।

जन्मला जयांचे उदरीं । तयांसी जो विरोध करी ।
सखी मानिली अंतुरी । तो येक मूर्ख । ८ ।

सांडून सर्वहि गोत । स्त्रीआधेन जीवित ।
सांगे अंतरींची मात । तो येक मूर्ख । ९ ।

परस्त्रीसी प्रेमा धरी । श्वशुरगृहीं वास करी ।
कुळेंविण कन्या वरी । तो येक मूर्ख ।१०।

समर्थावरी अहंता । अंतरी मानी समता ।
सामर्थ्येंविण करी सत्ता । तो येक मूर्ख ।११।

आपली आपण करी स्तुती । स्वदेशीं भोगी विपत्ती ।
सांगे वडिलांची कीर्ती । तो येक मूर्ख ।१२।

अकारण हास्य करी । विवेक सांगतां न धरी ।
जो बहुतांचा वैरी । तो येक मूर्ख ।१३।

आपुली धरूनियां दुरी । पराव्यासीं करी मीत्री ।
परन्यून बोले रात्रीं । तो येक मूर्ख ।१४।

बहुत जागते जन । तयांमध्यें करी शयन ।
परस्थळीं बहुभोजन । करी, तो येक मूर्ख ।१५।

मान अथवा अपमान । स्वयें करी परिच्छिन्न ।
सप्त वेसनीं जयाचें मन । तो येक मूर्ख ।१६।

धरून परावी आस । प्रेत्न सांडी सावकास ।
निसुगाईचा संतोष । मानी, तो येक मूर्ख ।१७।

घरीं विवेक उमजे । आणि सभेमध्यें लाजे ।
शब्द बोलतां निर्बुजे । तो येक मूर्ख ।१८।

आपणाहून जो श्रेष्ठ । तयासीं अत्यंत निकट ।
सिकवणेचा मानी वीट । तो येक मूर्ख ।१९।

नायेके त्यांसी सिकवी । वडिलांसीं जाणीव दावी ।
जो आरजास गोवी । तो येक मूर्ख ।२०।

येकायेकीं येकसरा । जाला विषईं निलाजिरा ।
मर्यादा सांडून सैरा । वर्ते, तो येक मूर्ख ।२१।

औषध ने घे असोन वेथा । पथ्य न करी सर्वथा ।
न मिळे आलिया पदार्था । तो येक मूर्ख ।२२।

संगेविण विदेश करी । वोळखीविण संग धरी ।
उडी घाली माहापुरीं । तो येक मूर्ख ।२३।

आपणास जेथें मान । तेथें अखंड करी गमन ।
रक्षूं नेणें मानाभिमान । तो येक मूर्ख ।२४।

सेवक जाला लक्ष्मीवंत । तयाचा होय अंकित ।
सर्वकाळ जो दुश्चित । तो येक मूर्ख ।२५।

विचार न करितां कारण । दंड करी अपराधेंविण ।
स्वल्पासाठीं जो कृपण । तो येक मूर्ख ।२६।

देवलंड, पितृलंड । शक्तिवीण करी तोंड ।
ज्याचे मुखीं भंडउभंड । तो येक मूर्ख ।२७।

घरीच्यावरी खाय दाढा । बाहेरी दीन बापुडा ।
ऐसा जो कां वेडमूढा । तो येक मूर्ख ।२८।

नीच यातीसीं सांगात । परांगनेसीं येकांत ।
मार्गे जाय खात खात । तो येक मूर्ख ।२९।

स्वयें नेणें परोपकार । उपकाराचा अनोपकार ।
करी थोडें बोले फार । तो येक मूर्ख ।३०।

तपीळ खादाड आळसी । कुश्चीळ कुटीळ मानसीं ।
धारिष्ट नाहीं जयापासीं । तो येक मूर्ख ।३१।

विद्या वैभव ना धन । पुरुषार्थ सामर्थ्य ना मान ।
कोरडाच वाहे अभिमान । तो येक मूर्ख ।३२।

लंडी लटिका लाबाड । कुकर्मी कुटीळ निचाड ।
निद्रा जयाची वाड । तो येक मूर्ख ।३३।

उंचीं जाऊन वस्त्र नेसे । चौबारां बाहेरी बैसे ।
सर्व काळ नग्न दिसे । तो येक मूर्ख ।३४।

दंत चक्षु आणि घ्राण । पाणी वसन आणि चरण ।
सर्वकाळ जयाचे मळिण । तो येक मूर्ख ।३५।

वैधृति आणि वितिपात । नाना कुमुहूर्तें जात ।
अपशकुनें करी घात । तो येक मूर्ख ।३६।

क्रोधें अपमानें कुबुद्धि । आपणास आपण वधी ।
जयास नाही दृढ बुद्धि । तो येक मूर्ख ।३७।

जिवलगांस परम खेदी । सुखाचा शब्द तोहि नेदी ।
नीच जनास वंदी । तो येक मूर्ख ।३८।

आपणास राखे परोपरी । शरणागतांस अव्हेरी ।
लक्ष्मीचा भर्वसा धरी । तो येक मूर्ख ।३९।

पुत्र कळत्र आणी दारा । इतुकाची मानुनिया थारा ।
विसरोन गेला ईश्वरा । तो येक मूर्ख ।४०।

जैसें जैसें करावें । तैसें तैसें पावावें ।
हें जयास नेणवें । तो येक मूर्ख ।४१।

पुरुषाचेनि अष्टगुणें । स्त्रियांस ईश्वरी देणें ।
ऐशा केल्या बहुत जेणें । तो येक मूर्ख ।४२।

दुर्जनाचेनि बोलें । मर्यादा सांडून चाले ।
दिवसा झांकिले डोळे । तो येक मूर्ख ।४३।

देवद्रोही गुरुद्रोही । मातृद्रोही पितृद्रोही ।
ब्रह्मद्रोही स्वामीद्रोही । तो येक मूर्ख ।४४।

परपीडेचें मानी सुख । परसंतोषाचें मानी दुःख ।
गेले वस्तूचा करी शोक । तो येक मूर्ख ।४५।

आदरेंविण बोलणें । न पुसतां साक्ष देणें ।
निंद्य वस्तु आंगिकारणें । तो येक मूर्ख ।४६।

तुक तोडून बोले । मार्ग सांडून चाले ।
कुकर्मी मित्र केले । तो येक मूर्ख ।४७।

पत्य राखों नेणे कदा । विनोद करी सर्वदा ।
हासतां खिजे पेटे द्वंदा । तो येक मूर्ख ।४८।

होड घाली अवघड । काजेंविण करी बडबड ।
बोलोंचि नेणे मुखजड । तो येक मूर्ख ।४९।

वस्त्र शास्त्र दोनी नसे । उंचे स्थळीं जाऊन बैसे ।
जो गोत्रजांस विस्वासे । तो येक मूर्ख ।५०।

तश्करासी वोळखी सांगे । देखिली वस्तु तेचि मागे ।
आपलें आन्हीत करी रागें । तो येक मूर्ख ।५१।

हीन जनासीं बरोबरीं । बोल बोले सरोत्तरीं ।
वामहस्तें प्राशन करी । तो येक मूर्ख ।५२।

समर्थासीं मत्सर धरी । अलभ्य वस्तूचा हेवा करी ।
घरीच्या घरीं करी चोरी । तो येक मूर्ख ।५३।

सांडूनियां जगदीशा । मनुष्याचा मानी भर्वसा ।
सार्थकेंविण वेंची वयसा । तो येक मूर्ख ।५४।

संसारदुःखाचेनि गुणें । देवास गाळी देणें ।
मैत्राचें बोले उणें । तो येक मूर्ख ।५५।

अल्प अन्याय क्षमा न करी । सर्व काळ धारकीं धरी ।
जो विस्वासघात करी । तो येक मूर्ख ।५६।

समर्थाचे मनींचे तुटे । जयाचेनि सभा विटे ।
क्षणा बरा क्षणा पालटे । तो येक मूर्ख ।५७।

बहुतां दिवसांचे सेवक । त्यागून ठेवी आणिक ।
ज्याची सभा निर्नायेक । तो येक मूर्ख ।५८।

अनीतीनें द्रव्य जोडी । धर्म नीति न्याय सोडी ।
संगतीचें मनुष्य तोडी । तो येक मूर्ख ।५९।

घरीं असोन सुंदरी । जो सदांचा परद्वारी ।
बहुतांचें उचिष्ट अंगीकारी । तो येक मूर्ख ।६०।

आपुलें अर्थ दुसऱ्यापासीं । आणी दुसऱ्याचें अभिळासी ।
पर्वत करी हीनासी । तो येक मूर्ख ।६१।

अतिताचा अंत पाहे । कुग्रामामधें राहे ।
सर्वकाळ चिंता वाहे । तो येक मूर्ख ।६२।

दोघे बोलत असती जेथें । तिसरा जाऊन बैसे तेथें ।
डोई खाजवी दोहीं हातें । तो येक मूर्ख ।६३।

उदकामधें सांडी गुरळी । पायें पायें कांडोळी ।
सेवा करी हीन कुळीं । तो येक मूर्ख ।६४।

स्त्री बाळका सलगी देणें । पिशाच्यासन्निध बैसणें ।
मर्यादेविण पाळी सुणें । तो येक मूर्ख ।६५।

परस्त्रीसीं कळह करी । मुकी वस्तु निघातें मारी ।
मूर्खाची संगती धरी । तो येक मूर्ख ।६६।

कळह पाहात उभा राहे । तोडविना कौतुक पाहे ।
खरें अस्तां खोटें साहे । तो येक मूर्ख ।६७।

लक्ष्मी आलियावरी । जो मागील वोळखी न धरी ।
देवींब्राह्मणीं सत्ता करी । तो येक मूर्ख ।६८।

आपलें काज होये तंवरी । बहुसाल नम्रता धरी ।
पुढिलांचें कार्य न करी । तो येक मूर्ख ।६९।

अक्षरें गाळून वाची । कां तें घालीं पदरिचीं ।
नीघा न करी पुस्तकाची । तो येक मूर्ख ।७०।

आपण वाचीना कधीं । कोणास वाचावया नेदी ।
बांधोन ठेवी बंदीं । तो येक मूर्ख ।७१।

ऐसीं हें मूर्ख लक्षणें । श्रवणें चातुर्य बाणे ।
चित्त देउनियां शहाणे । ऐकती सदा ।७२।

लक्षणें अपार असती । परी कांहीं येक येथामती ।
त्यागार्थ बोलिलें श्रोतीं । क्ष्मा केलें पाहिजे ।७३।

उत्तम लक्षणें घ्यावीं । मूर्ख लक्षणें त्यागावीं ।
पुढिले समासीं आघवीं । निरोपिलीं ।७४।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मूर्खलक्षणनाम'
समास पहिला समाप्त.

❑❑

दशक २: समास २

उत्तमलक्षण

॥ श्रीराम ॥

श्रोतां व्हावें सावधान । आतां सांगतों उत्तम गुण ।
जेणें करिता बाणें खुण । सर्वज्ञपणाची । १ ।

वाट पुसल्याविण जाऊं नये । फळ वोळखिल्याविण खाऊं नये ।
पडिली वस्तु घेऊं नये । येकायेकीं । २ ।

अति वाद करूं नये । पोटीं कपट धरूं नये ।
शोधिल्याविण करूं नये । कुळहीन कांता । ३ ।

विचारेंविण बोलों नये । विवंचनेविण चालों नये ।
मर्यादेविण हालों नये । कांहीं येक । ४ ।

प्रीतीविण रुसों नये । चोरास वोळखी पुसों नये ।
रात्रीं पंथ क्रमूं नये । येकायेकीं । ५ ।

जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये ।
पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं । ६ ।

निंदा द्वेष करूं नये । असत्संग धरूं नये ।
द्रव्यदारा हरूं नये । बळात्कारें । ७ ।

वक्तयास खोदूं नये । ऐक्यतेसी फोडूं नये ।
विद्याभ्यास सोडूं नये । कांहीं केल्या । ८ ।

तोंडाळासीं भांडों नयें । वाचाळासीं तंडों नये ।
संतसंग खंडूं नये । अंतर्यामीं । ९ ।

अतिक्रोध करूं नये । जिवलगांस खेदूं नये ।
मनीं वीट मानूं नये । सिकवणेचा ।१०।

क्षणक्षणां रुसों नये । लटिका पुरुषार्थ बोलों नये ।
केल्याविण सांगों नये । आपला पराक्रमु ।११।

बोलिला बोल विसरों नये । प्रसंगीं सामर्थ्य चुकों नये ।
केल्याविण निखंदूं नये । पुढिलांसि कदा ।१२।

आळसें सुख मानूं नये । चाहाडी मनास आणूं नये ।
शोधल्याविण करूं नये । कार्य कांहीं ।१३।

सुखा आंग देऊं नये । प्रेत्न पुरुषें सांडूं नये ।
कष्ट करितां त्रासों नये । निरंतर ।१४।

सभेमध्ये लाजों नये । बाष्कळपणें बोलों नये ।
पैज होड घालूं नये । कांहीं केल्यां ।१५।

बहुत चिंता करूं नये । निसुगपणें राहों नये ।
परस्त्रीतें पाहों नये । पापबुद्धी ।१६।

कोणाचा उपकार घेऊं नये । घेतलातरी राखों नये ।
परपीडा करूं नये । विश्वासघात ।१७।

शोच्येंविण असों नये । मळिण वस्त्र नेसों नये ।
जाणारास पुसों नये । कोठें जातोस म्हणौनी ।१८।

व्यापकपण सांडूं नये । पराधेन होऊं नये ।
आपलें वोझें घालूं नये । कोणीयेकासी ।१९।

पत्रेंविण पर्वत करूं नये । हीनाचें रुण घेऊं नये ।
गोहीविण जाऊं नये । राजद्वारा ।२०।

लटिकी जाजू घेऊं नये । सभेस लटिकें करूं नये ।
आदर नस्तां बोलों नये । स्वभाविक ।२१।

आदखणेपण करूं नये । अन्यायेंविण गांजूं नये ।
अवनीतीनें वर्तों नये । आंगबळें ।२२।

बहुत अन्न खाऊं नये । बहुत निद्रा करूं नये ।
बहुत दिवस राहों नये । पिसुणाचेथें ।२३।

आपल्याची गोही देऊं नये । आपली कीर्ती वर्णूं नये ।
आपलें आपण हासों नये । गोष्टी सांगोनी ।२४।

धूम्रपान घेऊं नये । उन्मत्त द्रव्य सेऊं नये ।
बहुचकांसीं करूं नये । मैत्री कदा ।२५।

कामेंविण राहों नये । नीच उत्तर साहों नये ।
आसुदें अन्न सेऊं नये । वडिलांचेंहि ।२६।

तोंडीं सीवी असों नये । दुसऱ्यास देखोन हांसों नये ।
उणें अंगीं संचारों नये । कुळवंताचे ।२७।

देखिली वस्तु चोरूं नये । बहुत कृपण होऊं नये ।
जिवलगांसी करूं नये । कळह कदा ।२८।

येकाचा घात करूं नये । लटिकी गोही देऊं नये ।
अप्रमाण वर्तों नये । कदाकाळीं ।२९।

चाहाडी चोरी धरूं नये । परद्वार करूं नये ।
मागें उणें बोलों नये । कोणीयेकाचें ।३०।

समईं यावा चुकों नये । सत्वगुण सांडूं नये ।
वैरियांस दंडूं नये । शरण आलियां ।३१।

अल्पधनें माजों नये । हरिभक्तीस लाजों नये ।
मर्यादेविण चालों नये । पवित्र जनीं ।३२।

मूर्खासीं संमंध पडो नये । अंधारीं हात घालू नये ।
दुश्चितपणें विसरों नये । वस्तु आपुली ।३३।

स्नानसंध्या सांडूं नये । कुळाचार खंडूं नये ।
अनाचार मांडूं नये । चुकुरपणें ।३४।

हरिकथा सांडूं नये । निरूपण तोडूं नये ।
परमार्थास मोडूं नये । प्रपंचबळें ।३५।

देवाचा नवस बुडऊं नये । आपला धर्म उडऊं नये ।
भलतें भरीं भरों नये । विचारेंविण ।३६।

निष्ठुरपण धरूं नये । जीवहत्या करूं नये ।
पाऊस देखोन जाऊं नये । अथवा अवकाळीं ।३७।

सभा देखोन गळों नये । समईं उत्तर टळों नये ।
धि:कारितां चळों नये । धारिष्ट आपुलें ।३८।

गुरुविरहित असों नये । नीच यातीचा गुरु करूं नये ।
जिणें शाश्वत मानूं नये । वैभवेंसीं ।३९।

सत्य मार्ग सांडूं नये । असत्य पंथें जाऊं नये ।
कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा ।४०।

अपकीर्ति ते सांडावी । सद्कीर्ति वाढवावी ।
विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ।४१।
नेघतां हे उत्तम गुण । तें मनुष्य अवलक्षण ।
ऐक तयांचें लक्षण । पुढिलीये समासीं ।४२।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'उत्तमलक्षणनाम'
समास दुसरा समाप्त.

❑❑

दशक २: समास ३

कुविद्यालक्षण

॥ श्रीराम ॥

ऐका कुविद्येचीं लक्षणें । अति हीनें कुलक्षणें ।
त्यागार्थ बोलिलीं ते श्रवणें । त्याग घडे । १ ।
ऐका कुविद्येचा प्राणी । जन्मां येऊन केली हानी ।
सांगिजेल येहीं लक्षणीं । वोळखावा । २ ।
कुविद्येचा प्राणी असे । तो कठिण निरूपणें त्रासे ।
अवगुणाची समृद्धि असे । म्हणौनियां । ३ ।

दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥

काम क्रोध मद मत्सर । लोभ दंभ तिरस्कार ।
गर्व ताठा अहंकार । द्वेष विषाद विकल्पी । ४ ।
आशा ममता तृष्णा कल्पना । चिंता अहंता कामना भावना ।
असूया अविद्या ईषणा वासना । अतृप्ती लोलंगता । ५ ।
इछ्या वांछ्या चिकित्सा निंदा । आनित्य ग्रामणी मस्ती सदा ।
जाणीव अवज्ञा विपत्ती आपदा । दुर्वृत्ती दुर्वासना । ६ ।

स्पर्धा खटपट आणी चटपट । तऱ्हे झटपट आणी वटवट ।
सदा खटखट आणी लटपट । परम वेथा कुविद्या ।७।

कुरूप आणी कुलक्षण । अशक्त आणी दुर्जन ।
दरिद्री आणी कृपण । आतिशयेंसीं ।८।

आळसी आणी खादाड । दुर्बळ आणी लाताड ।
तुटक आणी लाबाड । आतिशयेंसीं ।९।

मूर्ख आणी तपीळ । वेडें आणी वाचाळ ।
लटिकें आणी तोंडाळ । आतिशयेंसीं ।१०।

नेणे आणी नायके । न ये आणी न सीके ।
न करी आणी न देखे । अभ्यासदृष्टी ।११।

अज्ञान आणी अविस्वासी । छळवादी आणी दोषी ।
अभक्त आणी भक्तांसी । देखों सकेना ।१२।

पापी आणी निंदक । कष्टी आणी घातक ।
दुःखी आणी हिंसक । आतिशयेंसीं ।१३।

हीन आणी कृत्रिमी । रोगी आणी कुकर्मी ।
आचंगुल आणी अधर्मी । वासना रमे ।१४।

हीन देह आणी ताठा । अप्रमाण आणी फांटा ।
बाष्कळ आणी करंटा । विवेक सांगे ।१५।

लंडी आणी उन्मत्त । निकामी आणी डुल्लत ।
भ्याड आणी बोलत । पराक्रमु ।१६।

कनिष्ठ आणी गर्विष्ठ । नुपरतें आणी नष्ट ।
द्वेषी आणी भ्रष्ट । आतिशयेंसीं ।१७।

अभिमानी आणी निसंगळ । वोडगस्त आणी खळ ।
दंभिक आणी अनर्गळ । आतिशयेंसीं ।१८।

वोखटे आणी विकारी । खोटें आणी अनोपकारी ।
अवलक्षण आणी धि:कारी । प्राणिमात्रांसी ।१९।

अल्पमती आणी वादक । दीनरूप आणी भेदक ।
सूक्ष्म आणी त्रासक । कुशब्दें करूनि ।२०।

कठिणवचनी कर्कशवचनी । कापट्यवचनी संदेहवचनी ।
दु:खवचनी तीव्रवचनी । क्रूर निष्ठुर दुरात्मा ।२१।

न्यूनवचनी पैशून्यवचनी । अशुभवचनी अनित्यवचनी ।
द्वेषवचनी अनृत्यवचनी । बाष्कळवचनी धि:कारु ।२२।

कपटी कुटिळ गाठ्याळ । कुर्टे कुचर नट्याळ ।
कोपी कुधन टवाळ । आतिशयेंसीं ।२३।

तपीळ तामस अविचार । पापी अनर्थी अपस्मार ।
भूत समंधी संचार । आंगीं वसे ।२४।

आत्महत्यारा स्त्रीहत्यारा । गोहत्यारा ब्रह्महत्यारा ।
मातृहत्यारा पितृहत्यारा । महापापी पतित ।२५।

उणें कुपात्र कुतर्की । मित्रद्रोही विस्वासघातकी ।
कृतघ्न तल्पकी नारकी । आतित्याई जल्पक ।२६।

किंत भांडण झगडा कळ्हो । अधर्म अनराहाटी शोकसंग्रहो ।
चाहाड वेसनी विग्रहो । निग्रहकर्ता ।२७।

द्वाड आपेसी वोंगळ । चाळक चुंबक लच्याळ ।
स्वार्थी अभिळासी वोढाळ । आदत्त झोड आदखणा ।२८।

शठ शुंभ कातरु । लंड तर्मुंड सिंतरु ।
बंड पाषांड तश्करु । अपहारकर्ता ।२९।

धीट सैराट मोकाट । चाट चावट वाजट ।
थोट उद्धट लंपट । बटवाल कुबुद्धी ।३०।

मारेकरी वरपेकरी । दरवडेकरी खाणोरी ।
मैंद भोंदु परद्वारी । भुररेकरी चेटकी ।३१।

निशंक निलाजिरा कळभंट । टोणपा लौंद धट उद्धट ।
ठस ठोंबस खट नट । जगभांड विकारी ।३२।

अधीर आळिका अनाचारी । अंध पंगु खोंकलेकरी ।
थोटा बधिर दमेकरी । तऱ्ही ताठा न संडी ।३३।

विद्याहीन वैभवहीन । कुळहीन लक्ष्मीहीन ।
शक्तिहीन सामर्थ्यहीन । अदृष्टहीन भिकारी ।३४।

बळहीन कळाहीन । मुद्राहीन दीक्षाहीन ।
लक्षणहीन लावण्यहीन । आंगहीन विपारा ।३५।

युक्तिहीन बुद्धिहीन । आचारहीन विचारहीन ।
क्रियाहीन सत्वहीन । विवेकहीन संशई ।३६।

भक्तिहीन भावहीन । ज्ञानहीन वैराग्यहीन ।
शांतिहीन क्षमाहीन । सर्वहीन क्षुल्लकु ।३७।

समयो नेणे प्रसंग नेणे । प्रेत्न नेणे अभ्यास नेणे ।
आर्जव नेणे मैत्री नेणे । कांहींच नेणे अभागी ।३८।

असो ऐसे नाना विकार । कुलक्षणाचें कोठार ।
ऐसा कुविद्येचा नर । श्रोतीं वोळखावा ।३९।

ऐसीं कुविद्येचीं लक्षणें । ऐकोनि त्यागचि करणें ।
अभिमानें तऱ्हें भरणें । हें विहित नव्हे ।४०।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'कुविद्यालक्षणनाम'
समास तिसरा समाप्त.

❑❑

दशक २: समास ४

भक्तिनिरूपण

॥ श्रीराम ॥

नाना सुकृताचें फळ । तो हा नरदेह केवळ ।
त्याहिमधें भाग्य सफळ । तरीच सन्मार्ग लागे । १ ।

नरदेहीं विशेष ब्राह्मण । त्याहीवरी संध्यास्नान ।
सद्वासना भगवद्भजन । घडे पूर्वपुण्यें । २ ।

भगवद्भक्ति हे उत्तम । त्याहीवरी सत्समागम ।
काळ सार्थक हाचि परम । लाभ जाणावा । ३ ।

प्रेमप्रीतीचा सद्भाव । आणि भक्तांचा समुदाव ।
हरिकथा मोहोत्साव । तेणें प्रेमा दुणावे । ४ ।

नरदेहीं आलियां येक । कांहीं करावें सार्थक ।
जेणें पाविजे परलोक । परम दुल्लभ जो । ५ ।

विधियुक्त ब्रह्मकर्म । अथवा दया दान धर्म ।
अथवा करणें सुगम । भजन भगवंताचें । ६ ।

अनुतापें करावा त्याग । अथवा करणें भक्तियोग ।
नाहीं तरी धरणें संग । साधुजनाचा । ७ ।

नाना शास्त्रें धांडोळावीं । अथवा तीर्थें तरी करावीं ।
अथवा पुरश्चरणें बरवीं । पापक्षयाकारणें । ८ ।

अथवा कीजे परोपकार । अथवा ज्ञानाचा विचार ।
निरूपणीं सारासार । विवेक करणें । ९ ।

पाळावी वेदांची आज्ञा । कर्मकांड उपासना ।
जेणें होईजे ज्ञाना । अधिकारपात्र । १० ।

काया वाचा आणि मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें ।
कांही तरी येका भजनें । सार्थक करावें ।११।

जन्मा आलियाचें फळ । कांहीं करावें सफळ ।
ऐसें न करितां निर्फळ । भूमिभार होये ।१२।

नरदेहाचें उचित । कांहीं करावें आत्महित ।
यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं लावावें ।१३।

हें कांहींच न धरी जो मनीं । तो मृत्यप्राय वर्ते जनीं ।
जन्मा येऊन तेणें जननी । वायांच कष्टविली ।१४।

नाहीं संध्या नाहीं स्नान । नाहीं भजन देवतार्चन ।
नाहीं मंत्र जप ध्यान । मानसपूजा ।१५।

नाहीं भक्ति नाहीं प्रेम । नाहीं निष्ठा नाहीं नेम ।
नाहीं देव नाहीं धर्म । अतीत अभ्यागत ।१६।

नाहीं सद्बुद्धि नाहीं गुण । नाहीं कथा नाहीं श्रवण ।
नाहीं अध्यात्मनिरूपण । ऐकिलें कदां ।१७।

नाहीं भल्यांची संगती । नाहीं शुद्ध चित्तवृत्ती ।
नाहीं कैवल्याची प्राप्ती । मिथ्यामदें ।१८।

नाहीं नीति नाहीं न्याये । नाहीं पुण्याचा उपाये ।
नाहीं परत्रीची सोये । युक्तायुक्त क्रिया ।१९।

नाहीं विद्या नाहीं वैभव । नाहीं चातुर्याचा भाव ।
नाहीं कळा नाहीं लाघव । रम्यसरस्वतीचें ।२०।

शांती नाहीं क्षमा नाहीं । दीक्षा नाहीं मैत्री नाहीं ।
शुभाशुभ कांहींच नाहीं । साधनादिक ।२१।

सुचि नाहीं स्वधर्म नाहीं । आचार नाहीं विचार नाहीं ।
आरत्र नाहीं परत्र नाहीं । मुक्त क्रिया मनाची ।२२।

कर्म नाहीं उपासना नाहीं । ज्ञान नाहीं वैराग्य नाहीं ।
योग नाहीं धारिष्ट नाहीं । कांहींच नाहीं पाहातां ।२३।

उपरती नाहीं त्याग नाहीं । समता नाहीं लक्षण नाहीं ।
आदर नाहीं प्रीति नाहीं । परमेश्वराची ।२४।

परगुणाचा संतोष नाहीं । परोपकारें सुख नाहीं ।
हरिभक्तीचा लेश नाहीं । अंतर्यामीं ।२५।

ऐसे प्रकारीचे पाहातां जन । ते जीतचि प्रेतासमान ।
त्यांसीं न करावें भाषण । पवित्र जनीं ।२६।

पुण्यसामग्री पुरती । तयासीच घडे भगवद्भक्ती ।
जे जे जैसें करिती । ते पावती तैसेंचि ।२७।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'भक्तिनिरूपणनाम'
समास चौथा समाप्त.

❑❑

दशक २: समास ५

रजोगुणलक्षण

॥ श्रीराम ॥

मुळीं देह त्रिगुणाचा । सत्त्वरजतमाचा ।
त्यामध्यें सत्त्वाचा । उत्तम गुण ।१।

सत्त्वगुणें भगवद्भक्ती । रजोगुणें पुनरावृत्ती ।
तमोगुणें अधोगती । पावति प्राणी ।२।

ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः ।
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥

त्यांतहि शुद्ध आणी सबळ । तेहि बोलिजेति सकळ ।
शुद्ध तेंचि जें निर्मळ । सबळ बाधक जाणावें । ३ ।

शुद्धसबळाचें लक्षण । सावध परिसा विचक्षण ।
शुद्ध तो परमार्थी जाण । सबळ तो संसारिक । ४ ।

तया संसारिकाची स्थिती । देहीं त्रिगुण वर्तती ।
येक येतां दोनी जाती । निघोनियां । ५ ।

रज तम आणी सत्त्व । येणेंचि चालें जीवित्व ।
रजोगुणाचें कर्तुत्व । दाखऊं आतां । ६ ।

रजोगुण येतां शरीरीं । वर्तणुक कैसी करी ।
सावध होऊनी चतुरीं । परिसावें । ७ ।

माझें घर माझा संसार । देव कैंचा आणिला थोर ।
ऐसा करी जो निर्धार । तो रजोगुण । ८ ।

माता पिता आणि कांता । पुत्र सुना आणि दुहिता ।
इतुकियांची वाहे चिंता । तो रजोगुण । ९ ।

बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें ।
दुसऱ्याचें अभिळाषावें । तो रजोगुण ।१०।

कैंचा धर्म कैंचें दान । कैंचा जप कैंचें ध्यान ।
विचारीना पापपुण्य । तो रजोगुण ।११।

नेणे तीर्थ नेणे व्रत । नेणे अतीत अभ्यागत ।
अनाचारी मनोगत । तो रजोगुण ।१२।

धनधान्यांचे संचित । मन होये द्रव्यासक्त ।
अत्यंत कृपण जीवित्व । तो रजोगुण ।१३।

मी तरुण मी सुंदर । मी बळाढ्य मी चतुर ।
मी सकळांमध्ये थोर । म्हणे तो रजोगुण ।१४।

माझा देश माझा गांव । माझा वाडा माझा ठाव ।
ऐसी मनीं धरी हांव । तो रजोगुण ।१५।

दुसऱ्याचे सर्व जावें । माझेंचि बरें असावें ।
ऐसें आठवे स्वभावें । तो रजोगुण ।१६।

कपट आणी मत्सर । उठे देहीं तिरस्कार ।
अथवा कामाचा विकार । तो रजोगुण ।१७।

बाळकावरी ममता । प्रीतीनें आवडे कांता ।
लोभ वाटे समस्तां । तो रजोगुण ।१८।

जिवलगांची खंती । जेणें काळें वाटे चित्तीं ।
तेणें काळें सीघ्रगती । रजोगुण आला ।१९।

संसाराचे बहुत कष्ट । कैसा होईल सेवट ।
मनास आठवे संकट । तो रजोगुण ।२०।

कां मागें जें जें भोगिलें । तें तें मनी आठवलें ।
दुःख अत्यंत वाटलें । तो रजोगुण ।२१।

वैभव देखोनी दृष्टी । आवडी उपजली पोटीं ।
आशागुणें हिंपुटी- । करी, तो रजोगुण ।२२।

जें जें दृष्टी पडिलें । तें तें मने मागितलें ।
लभ्य नस्तां दुःख जालें । तो रजोगुण ।२३।

विनोदार्थीं भरें मन । शृंधारिक करी गायेन ।
राग रंग तान मान । तो रजोगुण ।२४।

टवाळी ढवाळी निंदा । सांगणे घडे वेवादा ।
हास्य विनोद करी सर्वदा । तो रजोगुण ।२५।

आळस उठे प्रबळ । कर्मणुकेचा नाना खेळ ।
कां उपभोगाचे गोंधळ । तो रजोगुण ।२६।

कळावंत बहुरूपी । नटावलोकी साक्षेपी ।
नाना खेळीं दान अर्पी । तो रजोगुण ।२७।

उन्मत्त द्रव्यावरी अति प्रीती । ग्रामज्य आठवे चित्तीं ।
आवडे नीचाची संगती । तो रजोगुण ।२८।

तश्करविद्या जीवीं उठे । परन्यून बोलावें वाटे ।
नित्यनेमास मन विटें । तो रजोगुण ।२९।

देवकारणीं लाजाळु । उदरालागीं कष्टाळु ।
प्रपंची जो स्नेहाळु । तो रजोगुण ।३०।

गोडग्रासी आळकेपण । अत्यादरें पिंडपोषण ।
रजोगुणें उपोषण । केलें न वचे ।३१।

शृंगारिक तें आवडे । भक्ती वैराग्य नावडे ।
कळालाघवीं पवाडे । तो रजोगुण ।३२।

नेणोनियां परमात्मा । सकळ पदार्थीं प्रेमा ।
बळात्कारें घाली जन्मा । तो रजोगुण ।३३।

असो ऐसा रजोगुण । लोभें दावी जन्ममरण ।
प्रपंचीं तो सबळ जाण । दारुण दुःख भोगवी ।३४।

आतां रजोगुण हा सुटेना । संसारिक हें तुटेना ।
प्रपंचीं गुंतली वासना । यास उपाय कोण ।३५।

उपाये येक भगवद्भक्ती । जरी ठाकेना विरक्ती ।
तरी येथानुशक्ती । भजन करावें ।३६।

काया वाचा आणि मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें ।
ईश्वरीं अर्पूनिया मनें । सार्थक करावें ।३७।

येथानुशक्ती दानपुण्य । परी भगवंती अनन्य ।
सुखदुःखें परी चिंतन । देवाचेंचि करावें ।३८।

आदिअंती येक देव । मध्येंचि लाविली माव ।
म्हणोनियां पूर्ण भाव । भगवंतीं असावा ।३९।
ऐसा सबळ रजोगुण । संक्षेपें केलें कथन ।
आतां शुद्ध तो तूं जाण । परमार्थिक ।४०।
त्याचे वोळखीचें चिन्ह । सत्त्वगुणीं असे जाण ।
तो रजोगुण परिपूर्ण । भजनमूळ ।४१।
ऐसा रजोगुण बोलिला । श्रोतीं मनें अनुमानिला ।
आतां पुढें परिसला । पाहिजे तमोगुण ।४२।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'रजोगुणलक्षणनाम'
समास पाचवा समाप्त.

❑❑

दशक २: समास ६

तमोगुणलक्षण

॥ श्रीराम ॥

मागां बोलिला रजोगुण । क्रियेसहित लक्षण ।
आतां ऐका तमोगुण । तोहि सांगिजेल । १ ।
संसारी दुःखसंमंध । प्राप्त होतां उठे खेद ।
कां अद्भुत आला क्रोध । तो तमोगुण । २ ।
शेरीरीं क्रोध भरतां । नोळखे माता पिता ।
बंधु बहिण कांता । ताडी, तो तमोगुण । ३ ।
दुसऱ्याचा प्राण घ्यावा । आपला आपण स्वयें द्यावा ।
विसरवी जीवभावा । तो तमोगुण । ४ ।

भरलें क्रोधाचें कावि‍रें । पिश्याच्यापरी वावरे ।
नाना उपायें नावरे । तो तमोगुण । ५ ।

आपला आपण शस्त्रपात । पराचा करी घात ।
ऐसा समय वर्तत । तो तमोगुण । ६ ।

डोळां युध्यचि पाहावें । रण पडिलें तेथें जावें ।
ऐसें घेतलें जीवें । तो तमोगुण । ७ ।

अखंड भ्रांती पडे । केला निश्चय विघडे ।
अत्यंत निद्रा आवडे । तो तमोगुण । ८ ।

क्षुधा जयाची वाड । नेणे कडु अथवा गोड ।
अत्यंत जो कां मूढ । तो तमोगुण । ९ ।

प्रीतिपात्र गेलें मरणें । तया लागीं जीव देणें ।
स्वयें आत्महत्या करणें । तो तमोगुण ।१०।

किडा मुंगी आणी स्वापद । यांचा करूं आवडे वध ।
अत्यंत जो कृपामंद । तो तमोगुण ।११।

स्त्रीहत्या बाळहत्या । द्रव्यालागीं ब्रह्महत्या ।
करूं आवडे गोहत्या । तो तमोगुण ।१२।

विसाळाचेनि नेटें । वीष घ्यावेंसें वाटे ।
परवध मनीं उठे । तो तमोगुण ।१३।

अंतरीं धरूनि कपट । पराचें करी तळपट ।
सदा मस्त सदा उद्धट । तो तमोगुण ।१४।

कळहो व्हावा ऐसें वाटे । झोंबी घ्यावी ऐसें उठे ।
अंतरीं द्वेष प्रगटे । तो तमोगुण ।१५।

युध्य देखावें ऐकावें । स्वयें युध्यचि करावें ।
मारावें कीं मरावें । तो तमोगुण ।१६।

मत्सरें भक्ति मोडावी । देवाळयें विघडावीं ।
फळतीं झाडें तोडावीं । तो तमोगुण ।१७।

सत्कर्मे ते नावडती । नाना दोष ते आवडती ।
पापभय नाहीं चित्तीं । तो तमोगुण ।१८।

ब्रह्मवृत्तीचा उछेद । जीवमात्रास देणें खेद ।
करूं आवडे अप्रमाद । तो तमोगुण ।१९।

आग्नप्रळये शस्त्रप्रळये । भूतप्रळये वीषप्रळये ।
मत्सरें करी जीवक्षये । तो तमोगुण ।२०।

परपीडेचा संतोष । निष्ठुरपणाचा हव्यास ।
संसाराचा नये त्रास । तो तमोगुण ।२१।

भांडण लाऊन द्यावें । स्वयें कौतुक पाहावें ।
कुबुद्धि घेतली जीवें । तो तमोगुण ।२२।

प्राप्त जालियां संपत्ति । जीवांस करी यातायाती ।
कळवळा नये चित्तीं । तो तमोगुण ।२३।

नावडे भक्ति नावडे भाव । नावडे तीर्थ नावडे देव ।
वेदशास्त्र नलगे सर्व । तो तमोगुण ।२४।

स्नानसंध्या नेम नसे । स्वधर्मीं भ्रष्टला दिसे ।
अकर्तव्य करीतसे । तो तमोगुण ।२५।

जेष्ठ बंधु बाप माये । त्यांचीं वचनें न साहे ।
सीघ्रकोपी निघोन जाये । तो तमोगुण ।२६।

उगेंचि खावें उगेंचि असावें । स्तब्ध होऊन बैसावें ।
कांहींच स्मरेना स्वभावें । तो तमोगुण ।२७।

चेटकविद्येचा अभ्यास । शस्त्रविद्येचा हव्यास ।
मल्लविद्या व्हावी ज्यास । तो तमोगुण ।२८।

केले गळाचे नवस । राडिबेडीचे सायास ।
काष्ठयंत्र छेदी जिव्हेस । तो तमोगुण ।२९।

मस्तकीं भदें जाळावें । पोतें आंग हुरपळावें ।
स्वयें शस्त्र टोंचून घ्यावें । तो तमोगुण ।३०।

देवास सिर वाहावें । कां तें आंग समर्पावें ।
पडणीवरून घालून घ्यावें । तो तमोगुण ।३१।
निग्रह करून धरणें । कां तें टांगून घेणें ।
देवद्वारी जीव देणें । तो तमोगुण ।३२।
निराहार उपोषण । पंचाग्नी धूम्रपान ।
आपणास घ्यावें पुरून । तो तमोगुण ।३३।
सकाम जें कां अनुष्ठान । कां तें वायोनिरोधन ।
अथवा राहावें पडोन । तो तमोगुण ।३४।
नखें केश वाढवावे । हस्तचि वर्ते करावे ।
अथवा वाग्सुंन्य व्हावें । तो तमोगुण ।३५।
नाना निग्रहें पिडावें । देहदुःखें चर्फडावें ।
क्रोधें देवास फोडावें । तो तमोगुण ।३६।
देवाची जो निंदा करी । तो आशाबद्धि अघोरी ।
जो संतसंग न धरी । तो तमोगुण ।३७।
ऐसा हा तमोगुण । सांगतां तो असाधारण ।
परी त्यागार्थ निरूपण । कांहीं येक ।३८।
ऐसें वर्ते तो तमोगुण । परी हा पतनास कारण ।
मोक्षप्राप्तीचें लक्षण । नव्हे येणें ।३९।
केल्या कर्माचें फळ । प्राप्त होईल सकळ ।
जन्म दुःखाचें मूळ । तुटेना कीं ।४०।
व्हावया जन्माचें खंडण । पाहिजे तो सत्त्वगुण ।
तेंचि असे निरूपण । पुढिलिये समासीं ।४१।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'तमोगुणलक्षणनाम'
समास सहावा समाप्त.

❑❑

दशक २: समास ७

सत्त्वगुणलक्षण

॥ श्रीराम ॥

मागां बोलिला तमोगुण । जो दुःखदायक दारुण ।
आतां ऐका सत्त्वगुण । परम दुल्लभ । १ ।

जो भजनाचा आधार । जो योगियांची थार ।
जो निरसी संसार । दुःखमूळ जो । २ ।

जेणें होये उत्तम गती । मार्ग फुटे भगवंती ।
जेणें पाविजे मुक्ती । सायोज्यता ते । ३ ।

जो भक्तांचा कोंवसा । जो भवार्णवींचा भर्वसा ।
मोक्षलक्ष्मीची दशा । तो सत्त्वगुण । ४ ।

जो परमार्थाचें मंडण । जो महंतांचें भूषण ।
रजतमाचें निर्शन । जयाचेनि । ५ ।

जो परम सुखकारी । जो आनंदाची लहरी ।
देऊनियां, निवारी– । जन्ममृत्य । ६ ।

जो अज्ञानाचा सेवट । जो पुण्याचें मूळपीठ ।
जयाचेनि सांपडे वाट । परलोकाची । ७ ।

ऐसा हा सत्त्वगुण । देहीं उमटतां आपण ।
तये क्रियेचें लक्षण । ऐसें असे । ८ ।

ईश्वरीं प्रेमा अधिक । प्रपंच संपादणें लोकिक ।
सदा सन्निध विवेक । तो सत्त्वगुण । ९ ।

संसारदुःख विसरवी । भक्तिमार्ग विमळ दावी ।
भजनक्रिया उपजवी । तो सत्त्वगुण । १० ।

परमार्थाची आवडी । उठे भावार्थाची गोडी ।
परोपकारीं तांतडी । तो सत्त्वगुण ।११।
स्नानसंध्या पुण्यसीळ । अभ्यांतरींचा निर्मळ ।
शरीर वस्त्रें सोज्वळ । तो सत्त्वगुण ।१२।
येजन आणी याजन । अध्ययन आणी अध्यापन ।
स्वयें करी दानपुण्य । तो सत्त्वगुण ।१३।
निरूपणाची आवडी । जया हरिकथेची गोडी ।
क्रिया पालटे रोकडी । तो सत्त्वगुण ।१४।
अश्वदानें गजदानें । गोदानें भूमिदानें ।
नाना रत्नांचीं दानें । करी, तो सत्त्वगुण ।१५।
धनदान वस्त्रदान । अन्नदान उदकदान ।
करी ब्राह्मणसंतर्पण । तो सत्त्वगुण ।१६।
कार्तिकस्नानें माघस्नानें । व्रतें उद्यापनें दानें ।
निःकाम तीर्थें उपोषणें । तो सत्त्वगुण ।१७।
सहस्रभोजनें लक्षभोजनें । विविध प्रकारींचीं दानें ।
निःकाम करी सत्त्वगुणें । कामना रजोगुण ।१८।
तीर्थीं अर्पी जो अग्रारें । बांधे वापी सरोवरें ।
बांधे देवाळयें सिखरें । तो सत्त्वगुण ।१९।
देवद्वारीं पडशाळा । पाईरीया दीपमाळा ।
वृंदावनें पार पिंपळा । बांधे, तो सत्त्वगुण ।२०।
लावी वनें उपवनें । पुष्पवाटिका जीवनें ।
निववी तापस्यांचीं मनें । तो सत्त्वगुण ।२१।
संध्यामठ आणि भुयेरीं । पाईरीया नदीतीरीं ।
भांडारगृहें देवद्वारीं । बांधे, तो सत्त्वगुण ।२२।
नाना देवांची जी स्थानें । तेथें नंदादीप घालणें ।
वाहे अळंकार भूषणें । तो सत्त्वगुण ।२३।

जेंगट मृदांग टाळ । दमामे नगारे काहळ ।
नाना वाद्यांचे कल्लोळ । सुस्वरादिक ।२४।
नाना सामग्री सुंदर । देवाळईं घाली नर ।
हरिभजनीं जो तत्पर । तो सत्त्वगुण ।२५।
छेत्रें आणि सुखासनें । दिंड्या पताका निशाणें ।
वाहे चामरें सूर्यापानें । तो सत्त्वगुण ।२६।
वृंदावनें तुळसीवने । रंगमाळा संमार्जनें ।
ऐसी प्रीती घेतली मनें । तो सत्त्वगुण ।२७।
सुंदरें नाना उपकर्णे । मंडप चांदवे आसनें ।
देवाळईं समर्पणें । हा सत्त्वगुण ।२८।
देवाकारणें खाद्य । नाना प्रकारीं नैवेद्य ।
अपूर्व फळें अर्पी सद्य । तो सत्त्वगुण ।२९।
ऐसी भक्तीची आवडी । नीच दास्यत्वाची गोडी ।
स्वयें देवद्वार झाडी । तो सत्त्वगुण ।३०।
तिथी पर्व मोहोत्साव । तेथें ज्याचा अंतर्भाव ।
काया वाचा मनें सर्व । अर्पी, तो सत्त्वगुण ।३१।
हरिकथेसी तत्पर । गंधें माळा आणी धुशर ।
घेऊन उभीं निरंतर । तो सत्त्वगुण ।३२।
नर अथवा नारी । येथानुशक्ति सामग्री ।
घेऊन उभीं देवद्वारीं । तो सत्त्वगुण ।३३।
महत्कृत्य सांडून मागें । देवास ये लागवेगें ।
भक्ति निकट आंतरंगें । तो सत्त्वगुण ।३४।
थोरपणा सांडून दुरी । नीच कृत्य आंगीकारी ।
तिष्ठत उभीं देवद्वारीं । तो सत्त्वगुण ।३५।
देवालागीं उपोषण । वर्जी तांबोल भोजन ।
नित्य नेम जप ध्यान । करी, तो सत्त्वगुण ।३६।

शब्द कठीण न बोले । अतिनेमेंसी चाले ।
योगी जेणें तोषविले । तो सत्त्वगुण ।३७।

सांडूनिया अभिमान । निःकाम करी कीर्तन ।
श्वेद रोमांच स्फुरण । तो सत्त्वगुण ।३८।

अंतरीं देवाचें ध्यान । तेणें निडारले नयन ।
पडे देहाचें विस्मरण । तो सत्त्वगुण ।३९।

हरिकथेची अति प्रीती । सर्वथा नये विकृती ।
आदिक प्रेमा आदिअंती । तो सत्त्वगुण ।४०।

मुखीं नाम हातीं टाळी । नाचत बोले ब्रीदावळी ।
घेऊन लावी पायधुळी । तो सत्त्वगुण ।४१।

देहाभिमान गळे । विषईं वैराग्य प्रबळे ।
मिथ्या माया ऐसें कळे । तो सत्त्वगुण ।४२।

कांहीं करावा उपाये । संसारीं गुंतोन काये ।
उकलवी ऐसें हृदये । तो सत्त्वगुण ।४३।

संसारासी त्रासे मन । कांहीं करावें भजन ।
ऐसें मनीं उठे ज्ञान । तो सत्त्वगुण ।४४।

असतां आपुले आश्रमीं । अत्यादरें नित्यनेमीं ।
सदा प्रीती लागे रामीं । तो सत्त्वगुण ।४५।

सकळांचा आला वीट । परमार्थी जो निकट ।
आघातीं उपजे धारिष्ट । तो सत्त्वगुण ।४६।

सर्वकाळ उदासीन । नाना भोगीं विटे मन ।
आठवे भगवद्भजन । तो सत्त्वगुण ।४७।

पदार्थीं न बैसे चित्त । मनीं आठवे भगवंत ।
ऐसा दृढ भावार्थ । तो सत्त्वगुण ।४८।

लोक बोलती विकारी । तरी आदिक प्रेमा धरी ।
निश्चय बाणे अंतरी । तो सत्त्वगुण ।४९।

अंतरी स्फूर्ती स्फुरे । सस्वरूपीं तर्क भरे ।
नष्ट संदेह निवारे । तो सत्त्वगुण ।५०।

शरीर लावावें कारणीं । साक्षेप उठे अंत:कर्णीं ।
सत्त्वगुणाची करणी । ऐसी असे ।५१।

शांति क्ष्मा आणि दया । निश्चय उपजे जया ।
सत्त्वगुण जाणावा तया । अंतरीं आला ।५२।

आले अतीत अभ्यागत । जाऊं नेदी जो भुकिस्त ।
येथानशक्ती दान देत । तो सत्त्वगुण ।५३।

तडितापडी दैन्यवाणें । आलें आश्रमाचेनि गुणें ।
तयालागीं स्थळ देणें । तो सत्त्वगुण ।५४।

आश्रमीं अन्नाची आपदा । परी विमुख नव्हे कदा ।
शक्तिनुसार दे सर्वदा । तो सत्त्वगुण ।५५।

जेणें जिंकिली रसना । तृप्त जयाची वासना ।
जयास नाहीं कामना । तो सत्त्वगुण ।५६।

होणार तैसें होत जात । प्रपंचीं जाला आघात ।
डळमळिना ज्याचें चित्त । तो सत्त्वगुण ।५७।

येका भगवंताकारणें । सर्व सुख सोडिलें जेणें ।
केलें देहाचें सांडणें । तो सत्त्वगुण ।५८।

विषईं धांवे वासना । परी तो कदा डळमळिना ।
ज्याचे धारिष्ट चळेना । तो सत्त्वगुण ।५९।

देह आपदेनें पीडला । क्षुधे तृषेनें वोसावला ।
तरी निश्चयो राहिला । तो सत्त्वगुण ।६०।

श्रवण आणी मनन । निजध्यासें समाधान ।
शुद्ध जालें आत्मज्ञान । तो सत्त्वगुण ।६१।

जयास अहंकार नसे । नैराशता विलसे ।
जयापासीं कृपा वसे । तो सत्त्वगुण ।६२।

सकळांसी नम्र बोले । मर्यादा धरून चाले ।
सर्व जन तोषविले । तो सत्त्वगुण ।६३।

सकळ जनासी आर्जव । नाहीं विरोधास ठाव ।
परोपराकारीं वेची जीव । तो सत्त्वगुण ।६४।

आपकार्याहून जीवीं । परकार्यसिद्धी करावी ।
मरोन कीर्ती उरवावी । तो सत्त्वगुण ।६५।

पराव्याचे दोषगुण । दृष्टीस देखे आपण ।
समुद्राऐंसी सांठवण । तो सत्त्वगुण ।६६।

नीच उत्तर साहाणें । प्रत्योत्तर न देणें ।
आला क्रोध सावरणें । तो सत्त्वगुण ।६७।

अन्यायेंवीण गांजिती । नानापरी पीडा करिती ।
तितुकेंहि साठवी चित्तीं । तो सत्त्वगुण ।६८।

शरीरें घीस साहाणें । दुर्जनासीं मिळोन जाणें ।
निंदकास उपकार करणें । हा सत्त्वगुण ।६९।

मन भलतीकडे धावें । तें विवेकें आवरावें ।
इंद्रियें दमन करावें । तो सत्त्वगुण ।७०।

सत्क्रिया आचरावी । असत्क्रिया त्यागावी ।
वाट भक्तीची धरावी । तो सत्त्वगुण ।७१।

जया आवडे प्रातः स्नान । आवडे पुराणश्रवण ।
नाना मंत्रीं देवतार्चन । करी, तो सत्त्वगुण ।७२।

पर्वकाळीं अतिसादर । वसंतपूजेस तत्पर ।
जयंत्याची प्रीती थोर । तो सत्त्वगुण ।७३।

विदेशीं मेलें मरणें । तयास संस्कार देणें ।
अथवा सादर होणें । तो सत्त्वगुण ।७४।

कोणी येकास मारी । तयास जाऊन वारी ।
जीव बंधनमुक्त करी । तो सत्त्वगुण ।७५।

लिंगें लाखोलीं अभिशेष । नामस्मरणीं विस्वास ।
देवदर्शनीं अवकाश । तो सत्त्वगुण ।७६।

संत देखोनि धावें । परमसुखे हेलावे ।
नमस्कारी सर्वभावें । तो सत्त्वगुण ।७७।

संतकृपा होय जयास । तेणें उद्धरिला वंश ।
तो ईश्वराचा अंश । सत्त्वगुणें ।७८।

सन्मार्ग दाखवी जनां । जो लावी हरिभजना ।
ज्ञान सिकवी अज्ञाना । तो सत्त्वगुण ।७९।

आवडे पुण्य संस्कार । प्रदक्षणा नमस्कार ।
जया राहे पाठांतर । तो सत्त्वगुण ।८०।

भक्तीचा हव्यास भारी । ग्रंथसामग्री जो करी ।
धातुमूर्ति नानापरी । पूजी तो सत्त्वगुण ।८१।

झळफळित उपकर्णे । माळा गवाळी आसनें ।
पवित्रें सोज्वळें वसनें । तो सत्त्वगुण ।८२।

परपीडेचें वाहे दुःख । परसंतोषाचें सुख ।
वैराग्य देखोन हरिख । मानी, तो सत्त्वगुण ।८३।

परभूषणें भूषण । परदूषणें दूषण ।
परदुःखे सिणे जाण । तो सत्त्वगुण ।८४।

आतां असो हें बहुत । देवीं धर्मीं ज्यांचें चित्त ।
भजे कामनारहित । तो सत्त्वगुण ।८५।

ऐसा हा सत्त्वगुण सात्त्विक । संसारसागरीं तारक ।
येणें उपजे विवेक । ज्ञानमार्गाचा ।८६।

सत्त्वगुणें भगवद्भक्ती । सत्त्वगुणें ज्ञानप्राप्ती ।
सत्त्वगुणें सायोज्यमुक्ती । पाविजेते ।८७।
ऐसी सत्त्वगुणाची स्थिती । स्वल्प बोलिलें येथामती ।
सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ।८८।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सत्त्वगुणलक्षणनाम'
समास सातवा समाप्त.

❑❑

दशक २: समास ८

सद्विद्यानिरूपण

॥ श्रीराम ॥

ऐका सद्विद्येचीं लक्षणें । परम शुद्ध सुलक्षणें ।
विचार घेतां बळेंचि बाणें । सद्विद्या आंगी ।१।
सद्विद्येचा जो पुरुष । तो उत्तमलक्षणीं विशेष ।
त्याचे गुण ऐकतां संतोष । परम वाटे ।२।
भाविक सात्त्विक प्रेमळ । शांती क्ष्मा दयासीळ ।
लीन तत्पर केवळ । अमृतवचनी ।३।
परम सुंदर आणि चतुर । परम सबळ आणि धीर ।
परम संपन्न आणि उदार । आतिशयेंसीं ।४।
परम ज्ञाता आणी भक्त । महापंडित आणी विरक्त ।
महातपस्वी आणी शांत । आतिशयेंसीं ।५।
वक्ता आणी नैराशता । सर्वज्ञ आणी सादरता ।
श्रेष्ठ आणी नम्रता । सर्वत्रांसीं ।६।
राजा आणी धार्मिक । शूर आणी विवेक ।
तारुण्य आणी नेमक । आतिशयेंसीं ।७।

वृद्धाचारी कुळाचारी । युक्ताहारी निर्विकारी ।
धन्वंतरी परोपकारी । पद्महस्ती ।८।

कार्यकर्ता निराभिमानी । गायक आणी वैष्णव जनी ।
वैभव आणी भगवद्भजनी । अत्यादरें ।९।

तत्त्वज्ञ आणी उदासीन । बहुश्रुत आणी सज्जन ।
मंत्री आणी सगुण । नीतिवंत ।१०।

साधु पवित्र पुण्यसीळ । अंतरशुद्ध धर्मात्मा कृपाळ ।
कर्मनिष्ठ स्वधर्मे निर्मळ । निर्लोभ अनुतापी ।११।

गोडी आवडी परमार्थप्रीती । सन्मार्ग सत्क्रिया धारणा धृती ।
श्रुति स्मृती लीळा युक्ति । स्तुती मती परीक्षा ।१२।

दक्ष धूर्त योग्य तार्किक । सत्य साहित्य नेमक भेदक ।
कुशळ चपळ चमत्कारिक । नाना प्रकारें ।१३।

आदर सन्मान तार्तम्य जाणे । प्रयोग समयो प्रसंग जाणे ।
कार्याकारण चिन्हें जाणें । विचक्षण बोलिका ।१४।

सावध साक्षेपी साधक । आगमनिगमशोधक ।
ज्ञानविज्ञानबोधक । निश्चयात्मक ।१५।

पुरश्चरणी तीर्थवासी । दृढव्रती कायाक्लेसी ।
उपासक निग्रहासी । करूं जाणे ।१६।

सत्यवचनी शुभवचनी । कोमळवचनी येकवचनी ।
निश्चयवचनी सौख्यवचनी । सर्वकाळ ।१७।

वासनातृप्त सखोल योगी । भव्य सुप्रसन्न वीतरागी ।
सौम्य सात्विक शुद्धमार्गी । निःकपट निर्वेसनी ।१८।

सुगड संगीत गुणग्राही । अनापेक्षी लोकसंग्रही ।
आर्जव सख्य सर्वहि । प्राणीमात्रासी ।१९।

द्रव्यसुची दारासुची । न्यायसुची अंतरसुची ।
प्रवृत्तिसुची निवृत्तिसुची । सर्वसुची निःसंगपणें ।२०।
मित्रपणें परहितकारी । वाग्माधुर्य परशोकहारी ।
सामर्थ्यपणें वेत्रधारी । पुरुषार्थें जगमित्र ।२१।
संशयछेदक विशाळ वक्ता । सकळ क्लृप्त असोनि श्रोता ।
कथानिरूपणीं शब्दार्था । जाऊंच नेदी ।२२।
वेवादरहित संवादी । संगरहित निरोपाधी ।
दुराशारहित अक्रोधी । निर्दोष निर्मत्सरी ।२३।
विमळज्ञानी निश्चयात्मक । समाधानी आणि भजक ।
सिद्ध असोनी साधक । साधन रक्षी ।२४।
सुखरूप संतोषरूप । आनंदरूप हास्यरूप ।
ऐक्यरूप आत्मरूप । सर्वत्रांसी ।२५।
भाग्यवंत जयवंत । रूपवंत गुणवंत ।
आचारवंत क्रियावंत । विचारवंत स्थिती ।२६।
येशवंत कीर्तिवंत । शक्तिवंत सामर्थ्यवंत ।
वीर्यवंत वरदवंत । सत्यवंत सुकृती ।२७।
विद्यावंत कळावंत । लक्ष्मीवंत लक्षणवंत ।
कुळवंत सुचिष्मंत । बळवंत दयाळु ।२८।
युक्तिवंत गुणवंत वरिष्ठ । बुद्धिवंत बहुधारिष्ट ।
दीक्षावंत सदा संतुष्ट । निस्पृह वीतरागी ।२९।
असो ऐसे उत्तम गुण । हें सद्विद्येचें लक्षण ।
अभ्यासाया निरूपण । अल्पमात्र बोलिलें ।३०।
रूप लावण्य अभ्यासितां न ये । सहज गुणास न चले उपाये ।
कांहीं तरी धरावी सोये । अगांतुक गुणाची ।३१।

ऐसी हे सद्विद्या बरवी । सर्वत्रांपासी असावी ।
परी विरक्तपुरुषें अभ्यासावी । अगत्यरूप ।३२।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सद्विद्यानिरूपणनाम'
समास आठवा समाप्त.

❑❑

दशक २: समास ९

विरक्तलक्षण

॥ श्रीराम ॥

ऐका विरक्तांची लक्षणें । विरक्तें असावें कोण्या गुणें ।
जेणें आंगीं सामर्थ्यें बाणें । योगियाचें ।१।

जेणें सदकीर्ति वाढे । जेणें सार्थकता घडे ।
जेणेंकरिता महिमा चढे । विरक्तांसी ।२।

जेणें परमार्थ फावे । जेणें आनंद हेलावे ।
जेणें विरक्ति दुणावे । विवेकेंसहित ।३।

जेणें सुख उचंबळे । जेणें सद्विद्या वोळे ।
जेणें भाग्यश्री प्रबळे । मोक्षेंसहित ।४।

मनोरथ पूर्ण होती । सकळ कामना पुरती ।
मुखीं राहे सरस्वती । मधुर बोलावया ।५।

हे लक्षणें श्रवण कीजे । आणि सदृढ जीवीं धरिजे ।
तरी मग विख्यात होईजे । भूमंडळीं ।६।

विरक्तें विवेकें असावें । विरक्तें अध्यात्म वाढवावें ।
विरक्तें धारिष्ट धरावें । दमनविषईं ।७।

विरक्तें राखावें साधन । विरक्तें लावावें भजन ।
विरक्तें विशेष ब्रह्मज्ञान । प्रगटवावें ।८।

विरक्तें भक्ति वाढवावी । विरक्तें शांती दाखवावी ।
विरक्तें येत्नें करावी । विरक्ती आपुली । ९ ।
विरक्तें सत्क्रिया प्रतिष्ठावी । विरक्तें निवृत्ति विस्तारावी ।
विरक्तें नैराशता धरावी । सदृढ जिवेंसी । १० ।
विरक्तें धर्मस्थापना करावी । विरक्तें नीति आवलंबावी ।
विरक्तें क्षमा सांभाळावी । अत्यादरेंसी । ११ ।
विरक्तें परमार्थ उजळावा । विरक्तें विचार शोधावा ।
विरक्तें सन्निध ठेवावा । सन्मार्ग सत्वगुण । १२ ।
विरक्तें भाविकें सांभाळावी । विरक्तें प्रेमळें निववावीं ।
विरक्तें साबडीं नुपेक्षावीं । शरणागतें । १३ ।
विरक्तें असावें परम दक्ष । विरक्तें असावें अंतरसाक्ष ।
विरक्तें वोढावा कैपक्ष । परमार्थाचा । १४ ।
विरक्तें अभ्यास करावा । विरक्तें साक्षेप धरावा ।
विरक्तें वगत्रृत्वें उभारावा । मोडला परमार्थ । १५ ।
विरक्तें विमळज्ञान बोलावें । विरक्तें वैराग्य स्तवीत जावें ।
विरक्तें निश्चयाचें करावें । समाधान । १६ ।
पर्वे करावी अचाटें । चालवावीं भक्तांची थाटे ।
नाना वैभवें कचाटें । उपासनामार्ग । १७ ।
हरिकीर्तनें करावीं । निरूपणें माजवावीं ।
भक्तिमार्गें लाजवावीं । निंदक दुर्जनें । १८ ।
बहुतांस करावें परोपकार । भलेपणाचा जीर्णोद्धार ।
पुण्यमार्गाचा विस्तार । बळेंचि करावा । १९ ।
स्नानसंध्या जप ध्यान । तीर्थयात्रा भगवद्भजन ।
नित्यनेम पवित्रपण । अंतरशुद्ध असावें । २० ।
दृढनिश्चयो धरावा । संसार सुखाचा करावा ।
विश्व जन उद्धरावा । संसर्गमात्रें । २१ ।

विरक्तें असावें धीर । विरक्तें असावें उदार ।
विरक्तें असावें तत्पर । निरूपणविषईं ।२२।

विरक्तें सावध असावें । विरक्तें शुद्ध मार्गें जावे ।
विरक्तें झिजोन उरवावें । सदकीर्तीसी ।२३।

विरक्तें विरक्त धुंडावें । विरक्तें साधु वोळखावें ।
विरक्तें मित्र करावें । संत योगी सज्जन ।२४।

विरक्तें करावीं पुरश्चरणें । विरक्तें फिरावीं तीर्थाटणें ।
विरक्तें करावीं नानास्थानें । परम रमणीय ।२५।

विरक्तें उपाधी करावीं । आणी उदासवृत्ति न सांडावी ।
दुराशा जडों नेदावी । कोणयेकविषईं ।२६।

विरक्तें असावें अंतरनिष्ठ । विरक्तें नसावे क्रियाभ्रष्ट ।
विरक्तें न व्हावें कनिष्ठ । पराधेनपणें ।२७।

विरक्तें समय जाणावा । विरक्तें प्रसंग वोळखावा ।
विरक्त चतुर असावा । सर्वप्रकारें ।२८।

विरक्तें येकदेसी नसावें । विरक्तें सर्व अभ्यासावें ।
विरक्तें अवघें जाणावें । ज्याचें त्यापरी ।२९।

हरिकथा निरूपण । सगुण भजन ब्रह्मज्ञान ।
पिंडज्ञान तत्त्वज्ञान । सर्व जाणावें ।३०।

कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग ।
प्रवृत्तिमार्ग निवृत्तिमार्ग । सकळ जाणावें ।३१।

प्रेमळ स्थिती उदास स्थिती । योगस्थिती ध्यानस्थिती ।
विदेह स्थिती सहज स्थिती । सकळ जाणावें ।३२।

ध्वनी लक्ष मुद्रा आसनें । मंत्र यंत्र विधी विधानें ।
नाना मतांचें देखणें । पाहोन सांडावें ।३३।

विरक्तें असावें जगमित्र । विरक्तें असावें स्वतंत्र ।
विरक्तें असावें विचित्र । बहुगुणी ।३४।

विरक्तें असावें विरक्त । विरक्तें असावें हरिभक्त ।
विरक्तें असावें नित्यमुक्त । अलिप्तपणें ।३५।

विरक्तें शास्त्रें धांडोळावीं । विरक्तें मतें विभांडावीं ।
विरक्तें मुमुक्षें लावावीं । शुद्धमार्गें ।३६।

विरक्तें शुद्धमार्ग सांगावा । विरक्तें संशय छेदावा ।
विरक्तें आपला म्हणावा । विश्वजन ।३७।

विरक्तें निंदक वंदावें । विरक्तें साधक बोधावें ।
विरक्तें बद्ध चेववावे । मुमुक्षनिरूपणें ।३८।

विरक्तें उत्तम गुण घ्यावे । विरक्तें अवगुण त्यागावे ।
नाना अपाय भंगावे । विवेकबळें ।३९।

ऐसीं हें उत्तम लक्षणें । ऐकावीं येकाग्र मनें ।
याचा अव्हेर न करणें । विरक्तपुरुषें ।४०।

इतुकें बोलिलें स्वभावें । त्यात मानेल तितुकें घ्यावें ।
श्रोतीं उदास न करावें । बहु बोलिलें म्हणौनी ।४१।

परंतु लक्षणें न घेतां । अवलक्षणें बाष्कळता ।
तेणें त्यास पढतमूर्खता । येवों पाहे ।४२।

त्या पढतमूर्खाचें लक्षण । पुढिलिये समासीं निरूपण ।
बोलिलें असे सावधान । होऊन, ऐका ।४३।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'विरक्तलक्षणनाम'
समास नववा समाप्त.

❑❑❑

दशक २: समास १०

पढतमूर्खलक्षण

॥ श्रीराम ॥

मागां सांगितलीं लक्षणें । मूर्खाआंगीं चातुर्य बाणे ।
आतां ऐका शाहाणे । असोनि मूर्ख । १ ।

तया नाव पढतमूर्ख । श्रोतीं न मनावें दुःख ।
अवगुण त्यागितां सुख । प्राप्त होये । २ ।

बहुश्रुत आणी वित्पन्न । प्रांजळ बोले ब्रह्मज्ञान ।
दुराशा आणी अभिमान । धरी तो येक पढतमूर्ख । ३ ।

मुक्त क्रिया प्रतिपादी । सगुण भक्ति उछेदी ।
स्वधर्म आणी साधन निंदी । तो येक पढतमूर्ख । ४ ।

आपलेन ज्ञातेपणें । सकळांस शब्द ठेवणें ।
प्राणीमात्रांचें पाहे उणें । तो येक पढतमूर्ख । ५ ।

शिष्यास अवज्ञा घडे । कां तो संकटी पडे ।
जयाचेनि शब्दें मन मोडे । तो येक पढतमूर्ख । ६ ।

रजोगुणी तमोगुणी । कपटी कुटिळ अंतःकर्णी ।
वैभव देखोन वाखाणी । तो येक पढतमूर्ख । ७ ।

समूळ ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवि जो दूषण ।
गुण सांगतां अवगुण । पाहे तो येक पढतमूर्ख । ८ ।

लक्षणें ऐकोन मानी वीट । मत्सरें करी खटपट ।
नीतिन्याय उद्धट । तो येक पढतमूर्ख । ९ ।

जाणपणें भरीं भरे । आला क्रोध नावरे ।
क्रिया शब्दास अंतरे । तो येक पढतमूर्ख । १० ।

वक्ता अधिकारेंवीण । वगत्रृत्वाचा करी सीण ।
वचन जयाचें कठीण । तो येक पढतमूर्ख ।११।

श्रोता बहुश्रुतपणें । वक्तयास आणी उणें ।
वाचाळपणाचेनि गुणें । तो येक पढतमूर्ख ।१२।

दोष ठेवी पुढिलांसी । तेंचि स्वयें आपणापासी ।
ऐसें कळेना जयासी । तो येक पढतमूर्ख ।१३।

अभ्यासाचेनि गुणें । सकळ विद्या जाणे ।
जनास निवऊं नेणें । तो येक पढतमूर्ख ।१४।

हस्त बांधीजे ऊर्णतंतें । लोभें मृत्य भ्रमरातें ।
ऐसा जो प्रपंचीं गुंते । तो येक पढतमूर्ख ।१५।

स्त्रियांचा संग धरी । स्त्रियांसी निरूपण करी ।
निंद्य वस्तु आंगिकारी । तो येक पढतमूर्ख ।१६।

जेणें उणीव ये आंगासी । तेंचि दृढ धरी मानसीं ।
देहबुद्धि जयापासीं । तो येक पढतमूर्ख ।१७।

सांडूनियां श्रीपती । जो करी नरस्तुती ।
कां दृष्टीं पडिल्यांची कीर्ती । वर्णी तो येक पढतमूर्ख ।१८।

वर्णी स्त्रियांचे आवेव । नाना नाटकें हावभाव ।
देवा विसरे जो मानव । तो येक पढतमूर्ख ।१९।

भरोन वैभवाचे भरीं । जीवमात्रास तुच्छ करी ।
पाषांडमत थावरी । तो येक पढतमूर्ख ।२०।

वित्पन्न आणी वीतरागी । ब्रह्मज्ञानी माहायोगी ।
भविष्य सांगों लागे जगीं । तो येक पढतमूर्ख ।२१।

श्रवण होतां अभ्यांतरी । गुणदोषाची चाळणा करी ।
परभूषणें मत्सरी । तो येक पढतमूर्ख ।२२।

नाहीं भक्तीचें साधन । नाहीं वैराग्य ना भजन ।
क्रियेविण ब्रह्मज्ञान । बोले तो येक पढतमूर्ख ।२३।

न मनी तीर्थ न मनी क्षेत्र । न मनी वेद न मनी शास्त्र ।
पवित्र कुळीं जो अपवित्र । तो येक पढतमूर्ख ।२४।

आदर देखोनि मन धरी । कीर्तीविण स्तुती करी ।
सर्वेंचि निंदी अनादरी । तो येक पढतमूर्ख ।२५।

मागें येक पुढें येक । ऐसा जयाचा दंडक ।
बोले येक करी येक । तो येक पढतमूर्ख ।२६।

प्रपंचविशीं सादर । परमार्थी ज्याचा अनादर ।
जाणपणें घे अधार । तो येक पढतमूर्ख ।२७।

येथार्थ सांडून वचन । जो रक्षून बोले मन ।
ज्याचें जिणें पराधेन । तो येक पढतमूर्ख ।२८।

सोंग संपाधी वरीवरी । करूं नये तेंचि करी ।
मार्ग चुकोन भरे भरीं । तो येक पढतमूर्ख ।२९।

रात्रंदिवस करी श्रवण । न संडी आपले अवगुण ।
स्वहित आपलें आपण । नेणे तो येक पढतमूर्ख ।३०।

निरूपणीं भले भले । श्रोते येऊन बैसले ।
क्षुद्रें लक्षुनी बोले । तो येक पढतमूर्ख ।३१।

शिष्य जाला अनाधिकारी । आपली अवज्ञा करी ।
पुन्हा त्याची आशा धरी । तो येक पढतमूर्ख ।३२।

होत असतां श्रवण । देहांस आले उणेपण ।
क्रोधें करी चिणचिण । तो येक पढतमूर्ख ।३३।

भरोन वैभवाचे भरीं । सद्गुरुची उपेक्षा करी ।
गुरुपरंपरा चोरी । तो येक पढतमूर्ख ।३४।

ज्ञान बोलोन करी स्वार्थ । कृपणा ऐसा सांची अर्थ ।
अर्थासाठी लावी परमार्थ । तो येक पढतमूर्ख ।३५।

वर्तल्यावीण सिकवी । ब्रह्मज्ञान लावणी लावी ।
पराधेन गोसावी । तो येक पढतमूर्ख ।३६।

भक्तिमार्ग अवघा मोडे । आपणामध्यें उपंढर पडे ।
ऐसिये कर्मीं पवाडे । तो येक पढतमूर्ख ।३७।

प्रपंच गेला हातीचा । लेश नाहीं परमार्थाचा ।
द्वेषी देवां ब्राह्मणांचा । तो येक पढतमूर्ख ।३८।

त्यागावया अवगुण । बोलिलें पढतमूर्खाचें लक्षण ।
विचक्षणें नीउन पूर्ण । क्ष्मा केलें पाहिजे ।३९।

परममूर्खामाजी मूर्ख । जो संसारीं मानी सुख ।
या संसारदुःखाऐसें दुःख । आणीक नाहीं ।४०।

तेंचि पुढें निरूपण । जन्मदुःखाचें लक्षण ।
गर्भवास हा दारुण । पुढें निरोपिला ।४१।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'पढतमूर्खलक्षणनाम'
समास दहावा समाप्त.

❑❑

दशक दुसरा समाप्त

❑❑

दशक तिसरा : स्वगुण परीक्षा

दशक ३ : समास १

जन्मदुःखनिरूपण

॥ श्रीराम ॥

जन्म दुःखाचा अंकुर । जन्म शोकाचा सागर ।
जन्म भयाचा डोंगर । चळेना ऐसा ॥ १ ॥

जन्म कर्माची आटणी । जन्म पातकाची खाणी ।
जन्म काळाची जाचणी । निच नवी ॥ २ ॥

जन्म कुविद्येचें फळ । जन्म लोभाचें कमळ ।
जन्म भ्रांतीचें पडळ । ज्ञानहीन ॥ ३ ॥

जन्म जिवासी बंधन । जन्म मृत्यासी कारण ।
जन्म हेंचि अकारण । गथागोवी ॥ ४ ॥

जन्म सुखाचा विसर । जन्म चिंतेचा आगर ।
जन्म वासनाविस्तार । विस्तारला ॥ ५ ॥

जन्म जिवाची आवदसा । जन्म कल्पनेचा ठसा ।
जन्म लांवेचा वळसा । ममतारूप ॥ ६ ॥

जन्म मायेचें मैंदावें । जन्म क्रोधाचें विरावें ।
जन्म मोक्षास आडवें । विघ्न आहे ॥ ७ ॥

जन्म जिवाचे मीपण । जन्म अहंतेचा गुण ।
जन्म हेंचि विस्मरण । ईश्वराचें ॥ ८ ॥

जन्म विषयांची आवडी । जन्म दुराशेची बेडी ।
जन्म काळाची कांकडी । भक्षिताहे ॥ ९ ॥

जन्म हाचि विषमकाळ । जन्म हेंचि वोखटी वेळ ।
जन्म हा अति कुश्चीळ । नर्कपतन ।१०।

पाहातां शरीराचें मूळ । या ऐसें नाहीं अमंगळ ।
रजस्वलेचा जो विटाळ । त्यामध्यें जन्म यासी ।११।

अत्यंत दोष ज्या विटाळा । त्या विटाळाचाचि पुतळा ।
तेथें निर्मळपणाचा सोहळा । केवी घडे ।१२।

रजस्वलेचा जो विटाळ । त्याचा आळोन जाला गाळ ।
त्या गाळाचेंच केवळ । शरीर हें ।१३।

वरि वरि दिसे वैभवाचें । अंतरी पोतडें नर्काचें ।
जैसें झांकणें चर्मकुंडाचे । उघडितांच नये ।१४।

कुंड धुतां शुद्ध होतें । यास प्रत्यई धुईजेतें ।
तरी दुर्गंधी देहातें । शुद्धता न ये ।१५।

अस्तीपंजर उभविला । सीरानाडीं गुंडाळिला ।
मेदमांसें सरसाविला । सांदोसांदीं भरूनी ।१६।

अशुद्ध शब्दें शुद्ध नाहीं । तेंहि भरलें असे देहीं ।
नाना व्याधी दु:खें तेंहि । अभ्यांतरीं वसती ।१७।

नर्काचें कोठार भरलें । आंतबाहेरी लिडीबिडिलें ।
मूत्रपोतडें जमलें । दुर्गंधीचें ।१८।

जंत किडे आणी आंतडी । नाना दुर्गंधीची पोतडी ।
अमुप लवथविती कातडी । कांटाळवाणी ।१९।

सर्वांगास सिर प्रमाण । तेथें बळसें वाहे घ्राण ।
उठे घाणी फुटतां श्रवण । ते दुर्गंधी नेघवे ।२०।

डोळां निघती चिपडें । नाकीं दाटतीं मेकडें ।
प्रात:काळीं घाणी पडे । मुखीं मळासारिखी ।२१।

लाळ थुंका आणी मळ । पीत श्लेष्मा प्रबळ ।
तयास म्हणती मुखकमळ । चंद्रासारिखें ।२२।

मुख ऐसें कुश्रीळ दिसे । पोटीं विष्ठा भरली असे ।
प्रत्यक्षास प्रमाण नसे । भूमंडळी ।२३।

पोटीं घालितां दिव्यान्न । कांहीं विष्ठा कांहीं वमन ।
भागीरथीचें घेतां जीवन । त्याची होये लघुशंका ।२४।

एवं मळ मूत्र आणी वमन । हेंचि देहाचें जीवन ।
येणेंचि देह वाढे जाण । यदर्थीं संशय नाहीं ।२५।

पोटीं नस्तां मळ मूत्र वोक । मरोन जाती सकळ लोक ।
जाला राव अथवा रंक । पोटीं विष्ठा चुकेना ।२६।

निर्मळपणें काढूं जातां । तरी देह पडेल तत्त्वतां ।
एवं देहाची वेवस्ता । ऐसी असे ।२७।

ऐसा हा धड असतां । येथाभूत पाहों जातां ।
मग ते दुर्दशा सांगतां । शंका बाधी ।२८

ऐसिये कारागृहीं वस्ती । नवमास बहु विपत्ती ।
नवहि द्वारें निरोधती । वायो कैंचा तेथें ।२९।

वोका नरकाचे रस झिरपती । ते जठराग्नीस्तव तापती ।
तेणें सर्वहि उकडती । अस्थिमांस ।३०।

त्वचेविण गर्भ खोळे । तंव मातेसी होती डोहळे ।
कटवतिक्षणें सर्वांग पोळे । तया बाळकाचें ।३१।

बांधलें चर्माचें मोटाळें । तेथें विष्ठेचें पेटाळें ।
रसउपाय वंकनाळें । होत असे ।३२।

विष्ठा मूत्र वांती पीत । नाकीं तोंडीं निघती जंत ।
तेणे निर्बुजलें चित्त । आतिशयेंसीं ।३३।

ऐसिये कारागृहीं प्राणी । पडिला अत्यंत दाटणीं ।
कळवळोन म्हणे चक्रपाणी । सोडवीं येथून आतां ।३४।

देवा सोडविसी येथून । तरी मी स्वहित करीन ।
गर्भवास हा चुकवीन । पुन्हां न ये येथें ।३५।

ऐसी दुखवोन प्रतिज्ञा केली । तंव जन्मवेळ पुढें आली ।
माता आक्रंदों लागली । प्रसूतकाळीं ।३६।

नाकीं तोंडीं बैसलें मांस । मस्तकद्वारें सांडी स्वास ।
तेंहि बुजलें निशेष । जन्मकाळीं ।३७।

मस्तकद्वार तें बुजलें । तेणें चित्त निर्बुजलें ।
प्राणी तळमळूं लागलें । चहूंकडे ।३८।

स्वास उस्वास कोंडला । तेणें प्राणी जाजावला ।
मार्ग दिसेनासा जाला । कासावीस ।३९।

चित्त बहु निर्बुजलें । तेणें आडभरीं भरलें ।
लोक म्हणती आडवें आलें । खांडून काढा ।४०।

मग ते खांडून काढिती । हस्तपाद छेदून घेती ।
हातां पडिलें तेंचि कापिती । मुख नासिक उदर ।४१।

ऐसे टवके तोडिले । बाळकें प्राण सोडिले ।
मातेनेंहि सांडिलें । कळिवर ।४२।

मृत्य पावला आपण । मातेचा घेतला प्राण ।
दुःख भोगिलें दारुण । गर्भवासीं ।४३।

तथापी सुकृतेंकरूनी । मार्ग सांपडला योनी ।
तऱ्हीं आडकला जाउनी । कंठ स्कंदीं मागुता ।४४।

तये संकोचित पंथीं । बळेंचि वोढून काढिती ।
तेणें गुणें प्राण जाती । बाळकाचे ।४५।

बाळकाचे जातां प्राण । अंतीं होये विस्मरण ।
तेणें पूर्वील स्मरण । विसरोन गेला ।४६।

गर्भीं म्हणे सोहं सोहं । बाहेरी पडतां म्हणे कोहं ।
ऐसा कष्टी जाला बहु । गर्भवासीं ।४७।

दुःखा वरपडा होता जाला । थोरा कष्टीं बाहेरी आला ।
सवेंच कष्ट विसरला । गर्भवासाचे ।४८।

सुंन्याकार जाली वृत्ती । कांहीं आठवेना चित्तीं ।
अज्ञानें पडिली भ्रांती । तेणें सुखचि मानिलें ।४९।

देह विकार पावलें । सुखदुःखें झळंबलें ।
असो ऐसें गुंडाळलें । मायाजाळीं ।५०।

ऐसें दुःख गर्भवासीं । होतें प्राणीमात्रांसीं ।
म्हणोनियां भगवंतासी । शरण जावें ।५१।

जो भगवंताचा भक्त । तो जन्मापासून मुक्त ।
ज्ञानबळें विरक्त । सर्वकाळ ।५२।

ऐशा गर्भवासीं विपत्ती । निरोपिल्या येथामती ।
सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ।५३।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'जन्मदुःखनिरूपणनाम'
समास पहिला समाप्त.

❑❑

दशक ३: समास २

स्वगुणपरीक्षा

॥ श्रीराम ॥

संसार हाचि दुःखमूळ । लागती दुःखाचे इंगळ ।
मागां बोलिली तळमळ । गर्भवासाची । १ ।

गर्भवासीं दुःख जालें । तें बाळक विसरलें ।
पुढें वाढों लागलें । दिवसेंदिवस । २ ।

बाळपणीं त्वचा कोंवळी । दुःख होतांचि तळमळी ।
वाचा नाहीं तये काळीं । सुखदुःख सांगावया । ३ ।

देहास कांहीं दुःख जालें । अथवा क्षुधेनें पीडलें ।
तरी तें परम आक्रंदलें । परी अंतर नेणवे । ४ ।

माता कुरवाळी वरी । परी जे पीडा जाली अंतरीं ।
ते मायेसी न कळे अभ्यांतरीं । दुःख होये बाळकासीं । ५ ।

मागुतें मागुतें फुंजे रडे । माता बुझावी घेऊन कडे ।
वेथा नेणती बापुडें । तळमळी जीवीं । ६ ।

नाना व्याधीचे उमाळे । तेणें दुःखें आंदोळे ।
रडे पडे कां पोळे । अग्निसंगें । ७ ।

शरीर रक्षितां नये । घडती नाना अपाये ।
खोडी अधांतरीं होये । आवेवहीन बाळक । ८ ।

अथवा अपाय चुकले । पूर्व पुण्य पुढें ठाकलें ।
मातेस वोळखों लागलें । दिवसेंदिवस । ९ ।

क्षणभरी मातेस न देखे । तरी आक्रंदे रुदन करी दुःखें ।
ते समई मातेसारिखें । आणीक कांहींच नाहीं ।१०।

आस करून वास पाहे । मातेविण कदा न राहे ।
वियोग पळमात्र न साहे । स्मरण जालियां नंतरें ।११।

जरी ब्रह्मादिक देव आले । अथवा लक्ष्मीनें अवलोकिलें ।
तरी नवचे बुझाविलें । आपले मातेवांचूनी ।१२।

कुरूप अथवा कुलक्षण । सकळांहूनि करंटेपण ।
तरी नाहीं तीसमान । भूमंडळीं कोणी ।१३।

ऐसें तें केविलवाणें । मातेविण दिसे उणें ।
रागें परतें केलें तिनें । तरी आक्रंदोनी मिठी घाली ।१४।

सुख पावे मातेजवळी । दुरी करितांचि तळमळी ।
अति प्रीति तयेकाळीं । मातेवरी लागली ।१५।

तंव ते मातेस मरण आलें । प्राणी पोरटें जालें ।
दुःखें झुर्णीं लागलें । आई आई म्हणोनी ।१६।

आई पाहातां दिसेना । दीनरूप पाहे जना ।
आस लागलिसे मना । आई येईल म्हणोनी ।१७।

माता म्हणौन मुख पाहे । तंव ते आपुली माता नव्हे ।
मग हिंवासलें राहे । दैन्यवाणें ।१८।

मातावियोगें कष्टलें । तेणें मानसीं दुःख जालें ।
देहहि क्षीणत्व पावलें । आतिशयेंसीं ।१९।

अथवा माताही वांचली । मायलेंकुरा भेटी जाली ।
बाळदशा ते राहिली । दिवसेंदिवस ।२०।

बाळपण जालें उणें । दिवसेंदिवस होये शाहाणें ।
मग ते मायेचें अत्यंत पेरुणें । होतें तें राहिलें ।२१।

पुढें लो लागला खेळाचा । कळप मेळविला पोरांचा ।
आल्यागेल्या डावाचा । आनंद शोक वाहे ।२२।

मायबापें सिकविती पोटें । तयाचें परम दुःख वाटे ।
चट लागली न सुटे । संगती लेंकुरांची ।२३।

लेंकुरांमध्यें खेळतां । नाठवे माता आणि पिता ।
तंव तेथेंहि अवचिता । दुःख पावला ।२४।

पडिले दांत फुटला डोळा । मोडले पाय जाला खुळा ।
गेला माज अवकळा । ठाकून आली ।२५।

निघाल्या देवी आणी गोवर । उठलें कपाळ लागला ज्वर ।
पोटसुळीं निरंतर । वायगोळा ।२६।

लागलीं भूतें जाली झडपणी । जळीच्या मेसको मायेराणी ।
मुंज्या झोटिंग करणी । म्हैसोबाची ।२७।

वेताळ खंकाळ लागला । ब्रह्मगिऱ्हो संचरला ।
नेणों चेडा वोलांडिला । कांहीं कळेना ।२८।

येक म्हणती बीरेदेव । येक म्हणती खंडेराव ।
येक म्हणती सकळ वाव । हा ब्राह्मणसमंध ।२९।

येक म्हणती कोणें केलें । आंगीं देवत घातलें ।
येक म्हणती चुकलें । सटवाईचें ।३०।

येक म्हणती कर्मभोग । आंगीं जडले नाना रोग ।
वैद्य पंचाक्षरी चांग । बोलाऊन आणिले ।३१।

येक म्हणती हा वांचेना । येक म्हणती हा मरेना ।
भोग भोगितो यातना । पापास्तव ।३२।

गर्भदुःख विसरला । तो त्रिविधतापें पोळला ।
प्राणी बहुत कष्टी जाला । संसारदुःखें ।३३।

इतुकेंहि चुकोन वांचला । तरी मारमारूं शहाणा केला ।
लोकिकीं नेटका जाला । नांव राखे ऐसा ।३४।

पुढें मायेबापीं लोभास्तव । संभ्रमें मांडिला विव्हाव ।
दाऊनियां सकळ वैभव । नोवरी पाहिली ।३५।

वऱ्हाडीवैभव दाटलें । देखोन परमसुख वाटलें ।
मन हें रंगोन गेलें । सासुरवाडीकडे ।३६।

मायबापीं भलतैसें असावें । परी सासुरवाडीस नेटकें जावें ।
द्रव्य नसेल तरी घ्यावें । रुण कळांतरें ।३७।

आंतर्भाव ते सासुरवाडीं । मायेबापें राहिलीं बापुडीं ।
होताती सर्वस्वें कुडकुडीं । तितुकेंच कार्य त्यांचें ।३८।

नोवरी आलियां घरा । अती हव्यास वाटे वरा ।
म्हणे मजसारिखा दुसरा । कोणीच नाहीं ।३९।

मायबाप बंधु बहिणी । नोवरी न दिसतां वाटे काणी ।
अत्यंत लोधला पापिणीं । अविद्येनें भुलविला ।४०।

संभोग नस्तां इतुका प्रेमा । योग्य जालिया उलंघी सीमा ।
प्रीती वाढविती कामा । करितां प्राणी गुंतला ।४१।

जरी न देखे क्षण येक डोळां । तरी जीव होय उताविळा ।
प्रीतीपात्र अंतर्कळा । घेऊन गेली ।४२।

कोवळे कोवळे शब्द मंजुळ । मर्यादा लज्या मुखकमळ ।
वक्त्रलोकनें केवळ । ग्रामज्याचे मैंदावें ।४३।

कळवळा येतां सांवरेना । शरीर विकळ आवरेना ।
अनेत्र वेवसाई क्रमेना । हुरहुर वाटे ।४४।

वेवसाय करितां बाहेरी । मन लागलेंसे घरीं ।
क्षणाक्षणां अभ्यांतरीं । स्मरण होये कामिनीचें ।४५।

तुम्हीं माझिया जिवांतील जीव । म्हणौनि अत्यंत लाघव ।
दाऊनियां चित्त सर्व । हिरोन घेतलें ।४६।

मैंद सोइरीक काढिती । फांसे घालून प्राण घेती ।
तैसें आयुष्य गेलियां अंतीं । प्राणीयांस होये ।४७।

प्रीति कामिनीसीं लागली । जरी तयेसी कोणी रागेजलीं ।
तरी परम क्षिती वाटली । मानसीं गुप्तरूपें ।४८।

तये भार्येचेनि कैवारें । मायेबापासीं नीच उत्तरें ।
बोलोनियां तिरस्कारें । वेगळा निघे ।४९।

स्त्रीकारणें लाज सांडिली । स्त्रीकारणें सखीं सोडिलीं ।
स्त्रीकारणें विघडिलीं । सकळहि जिवलगें ।५०।

स्त्रीकारणें देह विकिला । स्त्रीकारणें सेवक जाला ।
स्त्रीकारणें सांडवला । विवेकासी ।५१।

स्त्रीकारणें लोलंगता । स्त्रीकारणें अतिनम्रता ।
स्त्रीकारणें पराधेनता । अंगिकारिली ।५२।

स्त्रीकारणें लोभी जाला । स्त्रीकारणें धर्म सांडिला ।
स्त्रीकारणें अंतरला । तीर्थयात्रा स्वधर्म ।५३।

स्त्रीकारणें सर्वथा कांहीं । शुभाशुभ विचारिलें नाहीं ।
तनु मनु धनु सर्वही । अनन्यभावें अर्पिलें ।५४।

स्त्रीकारणें परमार्थ बुडविला । प्राणी स्वहितास नाडला।
ईश्वरीं कानकोंडा जाला । स्त्रीकारणें कामबुद्धी ।५५।

स्त्रीकारणें सोडिली भक्ती । स्त्रीकारणें सोडिली विरक्ती ।
स्त्रीकारणें सायोज्यमुक्ती । तेहि तुछ्य मानिली ।५६।

येके स्त्रियेचेनि गुणें । ब्रह्मांड मानिलें ठेंगणें ।
जिवलगे तीं पिसुणें । ऐसें वाटलीं ।५७।

ऐसी अंतरप्रीति जडली । सर्वस्वाची सांडी केली ।
तंव ते मरोन गेली । अकस्मात भार्या ।५८।

तेणें मनीं शोक वाढला । म्हणे थोर घात जाला ।
आतां कैंचा बुडाला । संसार माझा ।५९।

जिवलगांचा सोडिला संग । अवचिता जाला घरभंग ।
आतां करू मायात्याग । म्हणे दुःखें ।६०।

स्त्री घेऊन आडवी । ऊर बडवी पोट बडवी ।
लाज सांडून गौरवी । लोकांदेखतां ।६१।

म्हणे माझें बुडालें घर । आतां न करी हा संसार ।
दुःखें आक्रंदला थोर । घोर घोषें ।६२।

तेणें जीव वारयावेघला । सर्वस्वाचा उबग आला ।
तेणें दुःखें जाला । जोगी कां महात्मा ।६३।

कां तें निघोन जाणें चुकलें । पुन्हां मागुतें लग्न केलें ।
तेणें अत्यंतचि मग्न जालें । मन द्वितीय संमंधीं ।६४।

जाला द्वितीय संमंध । सवेंचि मांडिला आनंद ।
श्रोतीं व्हावें सावध । पुढिले समासीं ।६५।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'स्वगुणपरीक्षानाम'
समास दुसरा समाप्त.

❑❑

दशक ३: समास ३

स्वगुणपरीक्षा

॥ श्रीराम ॥

द्वितीय संमंध जाला । दुःख मागील विसरला ।
सुख मानून राहिला । संसाराचें । १ ।

जाला अत्यंत कृपण । पोटें न खाय अन्न ।
रुक्याकारणें सांडी प्राण । येकसरा । २ ।

कदा कल्पांतीं न वेची । सांचिलेंचि पुन्हा सांची ।
अंतरीं असेल कैंची । सद्वासना । ३ ।

स्वयें धर्म न करी । धर्मकर्त्यासहि वारी ।
सर्वकाळ निंदा करी । साधुजनाची । ४ ।

नेणे तीर्थ नेणे व्रत । नेणे अतित अभ्यागत ।
मुंगीमुखींचें जें सीत । तेंहि वेंचून सांची । ५ ।

स्वयें पुण्य करवेना । केलें तरी देखवेना ।
उपहास्य करी मना । नये म्हणौनी । ६ ।

देवां भक्तांस उछेदी । आंगबळें सकळांस खेदी ।
निष्ठुर शब्दें अंतर भेदी । प्राणीमात्राचें । ७ ।

नीति सांडून मागें । अनीतीनें वर्तों लागे ।
गर्व धरून फुगे । सर्वकाळ । ८ ।

पूर्वजांस सिंतरिलें । पक्षश्राद्धहि नाहीं केलें ।
कुळदैवत ठकिलें । कोणेपरी । ९ ।

आक्षत भरिली भाणा । दुजा ब्राह्मण मेहुणा ।
आला होता पाहुणा । स्त्रियेस मूळ । १० ।

कदा नावडे हरिकथा । देव नलगे सर्वथा ।
स्नानसंध्या म्हणे वृथा । कासया करावी ।११।
अभिळाषें सांची वित्त । स्वयें करी विस्वासघात ।
मदें मातला उन्मत्त । तारुण्यपणें ।१२।
तारुण्य आंगी भरलें । धारिष्ट नवचे धरिलें ।
करूं नये तेंचि केलें । माहापाप ।१३।
स्त्री केली परी धाकुटी । धीर न धरवेचि पोटीं ।
विषयलोभें सेवटीं । वोळखी सांडिली ।१४।
माये बहिण न विचारी । जाला पापी परद्वारी ।
दंड पावला राजद्वारीं । तऱ्हीं पालटेना ।१५।
परस्त्री देखोनि दृष्टीं । अभिळाष उठे पोटीं ।
अकर्तव्यें हिंपुटी । पुन्हा होये ।१६।
ऐसें पाप उदंड केलें । शुभाशुभ नाहीं उरलें ।
तेणें दोषें दुःख भरलें । अकस्मात आंगीं ।१७।
व्याधी भरली सर्वांगीं । प्राणी जाला क्षयरोगी ।
केले दोष आपुले भोगी । सीघ्र काळें ।१८।
दुःखें सर्वांग फुटलें । नासिक अवघेंचि बैसलें ।
लक्षण जाऊन जालें । कुलक्षण ।१९।
देहास क्षीणता आली । नाना वेथा उद्भवली ।
तारुण्यशक्ती राहिली । खंगला प्राणी ।२०।
सर्वांगीं लागल्या कळा । देहास आली अवकळा ।
प्राणी कांपे चळचळां । शक्ति नाहीं ।२१।
हस्तपादादिक झडले । सर्वांगीं किडे पडिले ।
देखोन थुंकों लागले । लाहानथोर ।२२।

जाली विष्टेची सारणी । भोवती उठली वर्ढाणी ।
अत्यंत खंगला प्राणी । जीव न वचे ।।२३।।

आतां मरण देगा देवा । बहुत कष्ट जाले जीवा ।
जाला नाहीं नेणों ठेवा । पातकाचा ।।२४।।

दुःखें घळघळां रडे । जों जों पाहे आंगाकडे ।
तों तों दैन्यवाणें बापुडें । तळमळी जीवीं ।।२५।।

ऐसे कष्ट जाले बहुत । सकळ जालें वाताहात ।
दरवडा घालून वित्त । चोरटीं नेलें ।।२६।।

जालें आरत्र ना परत्र । प्रारब्ध ठाकलें विचित्र ।
आपला आपण मळमूत्र । सेविला दुःखें ।।२७।।

पापसामग्री सरली । दिवसेंदिवस वेथा हरली ।
वैद्यें औषधें दिधलीं । उपचार जाला ।।२८।।

मरत मरत वांचला । यास पुन्हां जन्म जाला ।
लोक म्हणती पडिला । माणसांमधें ।।२९।।

येरें स्त्री आणिली । बरवी घरवात मांडिली ।
अति स्वार्थबुद्धी धरिली । पुन्हां मागुती ।।३०।।

कांहीं वैभव मेळविलें । पुन्हा सर्वहि संचिलें ।
परंतु गृह बुडालें । संतान नाहीं ।।३१।।

पुत्रसंतान नस्तां दुःखी । वांज नांव पडिलें लोकिकीं ।
तें न फिटे म्हणौनी लेंकी । तरी हो आतां ।।३२।।

म्हणोन नाना सायास । बहुत देवास केले नवस ।
तीर्थें व्रतें उपवास । धरणें पारणें मांडिलें ।।३३।।

विषयसुख तें राहिलें । वांजपणें दुःखी केलें ।
तंव तें कुळदैवत पावलें । जाली वृद्धी ।।३४।।

त्या लेंकुरावरी अति प्रीति । दोघेहि क्षण येक न विशंभती ।
कांहीं जाल्या आक्रंदती । दीर्घस्वरें ।३५।

ऐसी ते दुःखिस्ते । पूजीत होती नाना दैवतें ।
तंव तेंहि मेलें अवचितें । पूर्वपापेंकरूनी ।३६।

तेणें बहुत दुःख जालें । घरीं आरंथें पडिलें ।
म्हणती आम्हांस कां ठेविलें । देवें वांज करूनी ।३७।

आम्हांस द्रव्य काये करावें । तें जावें परी अपत्य व्हावें ।
अपत्यालागीं त्यजावें । लागेल सर्व ।३८।

वांजपण संदिसें गेलें । तों मरतवांज नांव पडिलें ।
तें न फिटे कांहीं केलें । तेणें दुःखें आक्रंदती ।३९।

आमुची वेली कां खुंटिली । हा हा देवा वृत्ती बुडाली ।
कुळस्वामीण कां क्षोभली । विझाला कुळदीप ।४०।

आतां लेंकुराचें मुख देखेन । तरी आनंदें राडी चालेन ।
आणी गळहि टोंचीन । कुळस्वामिणीपासीं ।४१।

आई भुता करीन तुझा । नांव ठेवीन केरपुंजा ।
वेसणी घालीन माझा । मनोरथ पुरवी ।४२।

बहुत देवांस नवस केले । बहुत गोसावी धुंडिले ।
गटगटां गिळिले । सगळे विंचु ।४३।

केले संमंधाचे सायास । राहाणें घातलें बहुवस ।
केळें नारिकेळें ब्राह्मणास । अंब्रदानें दिधलीं ।४४।

केलीं नाना कवटालें । पुत्रलोभें केलीं ढालें ।
तरी अदृष्ट फिरलें । पुत्र नाहीं ।४५।

वृक्षाखालें जाऊन नाहाती । फळतीं झाडें करपती ।
ऐसे नाना दोष करिती । पुत्रलोभाकारणें ।४६।

सोडून सकळ वैभव । त्यांचा वारयावेघला जीव ।
तंव तो पावला खंडेराव । आणी कुळस्वामिणी ।४७।
आतां मनोरथ पुरती । स्त्रीपुरुषें आनंदती ।
सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ।४८।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'स्वगुणपरीक्षानाम'
समास तिसरा समाप्त.

❑❑

दशक ३: समास ४

स्वगुणपरीक्षा

॥ श्रीराम ॥

लेंकुरें उदंड जालीं । तों ते लक्ष्मी निघोन गेली ।
बापडीं भिकेसी लागलीं । कांहीं खाया मिळेना । १ ।
लेंकुरें खेळती धाकुटीं । येकें रांगती येकें पोटीं ।
ऐसी घरभरी जाली दाटी । कन्या आणी पुत्रांची । २ ।
दिवसेंदिवस खर्च वाढला । यावा होता तो खुंटोन गेला ।
कन्या उपवरी जाल्या त्यांला । उजवावया द्रव्य नाहीं । ३ ।
मायेबापें होतीं संपन्न । त्यांचें उदंड होतें धन ।
तेणेंकरितां प्रतिष्ठा मान । जनीं जाला होता । ४ ।
भरम आहे लोकाचारीं । पहिली नांदणूक नाहीं घरीं ।
दिवसेंदिवस अभ्यांतरीं । दरिद्र आलें । ५ ।
ऐसी घरवात वाढली । खातीं तोंडें मिळालीं ।
तेणें प्राणीयांस लागली । काळजी उद्वेगाची । ६ ।
कन्या उपवरी जाल्या । पुत्रांस नोवऱ्या आल्या ।
आतां उजवणी केल्या । पाहिजेत कीं । ७ ।

जरी मुलें तैसींच राहिलीं । तरी पुन्हां लोकलाज जाली ।
म्हणती कासया व्यालीं । जन्मदारिद्र्यें ।८।

ऐसी लोकलाज होईल । वडिलांचें नांव जाईल ।
आतां रुण कोण देईल । लग्नापुरतें ।९।

मागें रुण ज्याचें घेतलें । त्याचें परतोन नाहीं दिल्हें ।
ऐसे आभाळ कोंसळलें । उद्वेगाचें ।१०।

आपण खातों अन्नासी । अन्न खातें आपणासीं ।
सर्वकाळ मानसीं । चिंतातुर ।११।

पती अवघीच मोडली । वस्तभाव गाहाण पडिली।
अहा देवा वेळ आली । आंता डिवाळ्याची ।१२।

कांहीं केला ताडामोडा । विकिला घरींचा पाडारेडा ।
कांहीं पैका रोकडा । कळांतरें कर्तला ।१३।

ऐसें रुण घेतलें । लोकिकीं दंभ केलें ।
सकळ म्हणती नांव राखिलें । वडिलांचें ।१४।

ऐसें रुण उदंड जालें । रिणाइतीं वेढून घेतलें ।
मग प्रयाण आरंभिलें । विदेशाप्रती ।१५।

दोनी वरुषें बुडी मारिली । नीच सेवा अंगीकारिली ।
शरीरें आपदा भोगिली । आतिशयेंसीं ।१६।

कांहीं मेळविलें विदेशीं । जीव लागला मनुष्यांपासीं ।
मग पुसोनियां स्वामीसी । मुरडता जाला ।१७।

तंव तें अत्यंत पीडावलीं । वाट पाहात बैसलीं ।
म्हणती दिवसगती कां लागली । काये कारणें देवा ।१८।

आतां आम्ही काये खावें । किती उपवासीं मरावें ।
ऐसियाचे संगतीस देवें । कां पां घातलें आम्हांसी ।१९।

ऐसें आपुलें सुख पाहाती । परी त्याचें दुःख नेणती ।
आणी शक्ति गेलियां अंतीं । कोणीच कामा न येती ।।२०।।

असो ऐसी वाट पाहतां । दृष्टीं देखिला अवचिता ।
मुलें धांवती ताता । भागलास म्हणौनी ।।२१।।

स्त्री देखोन आनंदली । म्हणे आमुची दैन्यें फिटलीं ।
तंव येरें दिधली । गांठोडी हातीं ।।२२।।

सकळांस आनंद जाला । म्हणती आमुचा वडील आला ।
तेणें तरी आम्हांला । आंग्या टोप्या आणिल्या ।।२३।।

ऐसा आनंद च्यारी दिवस । सवेंच मांडिली कुसमुस ।
म्हणती हें गेलियां आम्हांस । पुन्हा आपदा लागती ।।२४।।

म्हणौनी आणिलें तें असावें । येणें मागुतें विदेशास जावें ।
आम्ही हें खाऊं न तों यावें । द्रव्य मेळऊन ।।२५।।

ऐसी वासना सकळांची । अवघीं सोइरीं सुखाचीं ।
स्त्री अत्यंत प्रीतीची । तेहि सुखाच लागली ।।२६।।

विदेसीं बहु दगदला । विश्रांती घ्यावया आला ।
स्वासहि नाहीं टाकिला । तों जाणें वोढवलें ।।२७।।

पुढें अपेक्षा जोसियांची । केली विवंचना मुहूर्ताची ।
वृत्ति गुंतली तयाची । जातां प्रशस्त न वाटे ।।२८।।

माया मात्रा सिद्ध केली । कांहीं सामग्री बांधली ।
लेंकुरें दृष्टीस पाहिलीं । मार्गस्त जाला ।।२९।।

स्त्रियेस अवलोकिलें । वियोगें दुःख बहुत वाटलें ।
प्रारब्धसूत्र तुकलें । रुणानबंधाचें ।।३०।।

कंठ सद्गदित जाला । न संवरेच गहिवरला ।
लेंकुरा आणि पित्याला । तडातोडी जाली ।।३१।।

जरी रुणानबंध असेल । तरी मागुती भेटी होईल ।
नाहीं तरी संगती पुरेल । येचि भेटीनें तुमची ।३२।

ऐसें बोलोन स्वार होये । मागुता फीरफिरों पाहे ।
वियोगदुःख न साहे । परंतु कांहीं न चले ।३३।

आपुला गांव राहिला मागें । चित्त भ्रमलें संसारउद्वेगें ।
दुःखवला प्रपंचसंगें । अभिमानास्तव ।३४।

ते समईं माता आठवली । म्हणे धन्य धन्य ते माउली ।
मजकारणें बहुत कष्टली । परी मी नेणोंचि मूर्ख ।३५।

आजी जरी ते असती । तरी मजला कदा न विशंभती ।
वियोग होतां आक्रंदती । ते पोटागि वेगळीच ।३६।

पुत्र वैभवहीन भिकारी । माता तैसाचि अंगिकारी ।
दगदला देखोनि अंतरीं । त्याच्या दुःखें दुःखवे ।३७।

प्रपंच विचारें पाहातां । हें सकळ जोडे न जोडे माता ।
हें शरीर जयेकरितां । निर्माण जालें ।३८।

लांव तरी ते माया । काय करावया सहस्र जाया ।
परी भुलोन गेलों वायां । मकरध्वजाचेनी ।३९।

या येका कामाकारणें । जिवलगांसिं द्वंद्व घेणें ।
सखीं तींच पिसुणें । ऐसीं वाटतीं ।४०।

म्हणौन धन्य धन्य ते प्रपंची जन । जे मायेबापाचें भजन ।
करिती न करिती मन । निष्ठुर जिवलगांसीं ।४१।

संगती स्त्रीबाळकाची । आहे साठी जन्माची ।
परी मायेबापें कैंचीं । मिळतील पुढें ।४२।

ऐसें पूर्वीं होतें ऐकिलें । परी ते समईं नाहीं कळलें ।
मन हें बुडोन गेलें । रतिसुखाचा डोहीं ।४३।

हे सखीं वाटती परी पिसुणें । मिळालीं वैभवाकारणें ।
रितें जातां लाजिरवाणें । अत्यंत वाटे ।४४।

आतां भलतैसें करावें । परि द्रव्य मेळऊन न्यावें ।
रितें जातां स्वभावें । दुःख आहे ।४५।

ऐसी वेवर्धना करी । दुःख वाटलें अंतरीं ।
चिंतेचिये माहापुरीं । बुडोन गेला ।४६।

ऐसा हा देह आपुला । असतांच पराधेन केला ।
ईश्वरीं कानकोंडा जाला । कुटुंबकाबाडी ।४७।

या येका कामासाठीं । जन्म गेला आटाटी ।
वय वेचल्या सेवटीं । येकलेंचि जावें ।४८।

ऐसा मनीं प्रस्तावला । क्षण येक उदास जाला ।
सर्वेंचि प्राणी झळंबला । मायाजाळें ।४९।

कन्यापुत्रें आठवलीं । मनींहुनि क्षिती वाटली ।
म्हणे लेंकुरें अंतरलीं । माझीं मज ।५०।

मागील दुःख आठवलें । जें जें होतें प्राप्त जालें ।
मग रुदन आरंभिलें । दीर्घ स्वरें ।५१।

आरण्यरुदन करितां । कोणी नाहीं बुझाविता ।
मग होये विचारिता । आपुले मनीं ।५२।

आतां कासया रडावें । प्राप्त होतें तें भोगावें ।
ऐसें बोलोनिया जीवें । धारिष्ट केलें ।५३।

ऐसा दुःखें दगदला । मग विदेशाप्रती गेला ।
पुढें प्रसंग वर्तला । तो सावध ऐका ।५४।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'स्वगुणपरीक्षानाम'
समास चौथा समाप्त.

❑❑

दशक ३: समास ५

स्वगुणपरीक्षा

॥ श्रीराम ॥

पुढें गेला विदेशासी । प्राणी लागला व्यासंगासी ।
आपल्या जिवेसीं सोसी । नाना श्रम ।१।

ऐसा दुस्तर संसार । करितां कष्टला थोर ।
पुढें दोनी च्यारी संवत्सर । द्रव्य मेळविलें ।२।

सर्वेंचि आला देशासी । तों आवर्षण पडिलें देसीं ।
तेणें गुणें मनुष्यांसी । बहुत कष्ट जाले ।३।

येकांच्या बैसल्या अमृतकळा । येकांस चंद्री लागली डोळां ।
येकें कांपती चळचळां । दैन्यवाणीं ।४।

येकें दीनरूप बैसलीं । येकें सुजलीं येकें मेलीं ।
ऐसीं कन्यापुत्रें देखिलीं । अकस्मात डोळां ।५।

तेणें बहुत दुःखी जाला । देखोनियां उभड आला ।
प्राणी आक्रंदों लागला । दैन्यवाणा ।६।

तंव तीं अवघीं सावध जालीं । म्हणती बाबा बाबा जेऊं घालीं ।
अन्नालागीं मिडकलीं । झडा घालिती ।७।

गांठोडें सोडून पाहाती । हातां पडिलें तेंचि खाती ।
कांहीं तोंडीं कांहीं हातीं । प्राण जाती निघोनी ।८।

तांतडी तांतडी जेऊं घाली । तों तें जेवितां जेवितां कांहीं मेलीं ।
कांहीं होतीं धादावलीं । तेंहि मेलीं अजीर्णें ।९।

ऐसीं बहुतेकें मेलीं । येक दोनी मुलें उरलीं ।
तेंहि दैन्यवाणी जालीं । आपले मातेवांचुनी ।१०।

ऐसें आवर्षण आलें । तेणें घरचि बुडालें ।
पुढें देसीं सुभिक्ष जालें । आतिशयेंसी ।११।

लेकुरां नाही वाढविते । अन्न करावें लागे आपुलेन हातें ।
बहु त्रास घेतला चित्तें । स्वयंपाकाचा ।१२।

लोकीं भरीस घातलें । पुन्हां मागुतें लग्न केलें ।
द्रव्य होतें तें वेचलें । लग्नाकारणें ।१३।

पुन्हा विदेशासी गेला । द्रव्य मेळऊन आला ।
तंव घरीं कळहो लागला । सावत्र पुत्रांसी ।१४।

स्त्री जाली न्हातीधुती । पुत्र देखों न सकती ।
भ्रताराची गेली शक्ति । वृद्ध जाला ।१५।

सदा भांडण पुत्रांचें । कोणी नायकती कोणाचें ।
वनिता अति प्रीतीचें । प्रीतिपात्र ।१६।

किंत बैसला मना । येके ठाईं पडेना ।
म्हणोनियां पांचा जणा । मेळविलें ।१७।

पांच जण वांटे करिती । तों ते पुत्र नायेकती ।
निवाडा नव्हेचि अंतीं । भांडण लागलें ।१८।

बापलेकां भांडण जालें । लेकीं बापास मारिलें ।
तंव ते मातेनें घेतलें । शंखतीर्थ ।१९।

ऐकोनि मिळाले लोक । उभे पाहती कौतुक ।
म्हणती बापास लेक । कामा आले ।२०।

ज्या कारणें केले नवस । ज्या कारणें केले सायास ।
ते पुत्र पितीयास । मारिती पहा ।२१।

ऐसी आली पापकळी । आश्चिर्य मानिलें सकळीं ।
उभे तोडिती कळी । नगरलोक ।२२।

पुढें बैसोन पांच जण । वांटे केले तत्समान ।
बापलेकांचें भांडण । तोडिलें तेहीं ।।२३।।

बापास वेगळें घातलें । कोंपट बांधोन दिधलें ।
मन कांतेचें लागलें । स्वार्थबुद्धी ।।२४।।

कांता तरुण पुरुष वृद्ध । दोघांस पडिला संमंध ।
खेद सांडून आनंद । मानिला तेहीं ।।२५।।

स्त्री सांपडली सुंदर । गुणवंत आणी चतुर ।
म्हणे माझें भाग्य थोर । वृद्धपणीं ।।२६।।

ऐसा आनंद मानिला । दुःख सर्वहि विसरला ।
तंव तो गल्बला जाला । परचक्र आलें ।।२७।।

अकस्मात धाडी आली । कांता बंदी धरून नेली ।
वस्तभावहि गेली । प्राणीयाची ।।२८।।

तेणें दुःख जालें भारी । दीर्घ स्वरें रुदन करी ।
मनीं आठवे सुंदरी । गुणवंत ।।२९।।

तंव तिची वार्ता आली । तुमची कांता भ्रष्टली ।
ऐकोनियां आंग घाली । पृथ्वीवरी ।।३०।।

सव्य अपसव्य लोळे । जळें पाझरती डोळे ।
आठवितां चित्त पोळे । दुःखानळें ।।३१।।

द्रव्य होतें मेळविलें । तेंहि लग्नास वेचलें ।
कांतेसिहि धरून नेलें । दुराचारीं ।।३२।।

मजहि वृद्धाप्य आलें । लेकीं वेगळें घातलें ।
अहा देवा वोढवलें । अदृष्ट माझें ।।३३।।

द्रव्य नाहीं कांता नाहीं । ठाव नाहीं शक्ति नाहीं ।
देवा मज कोणीच नाहीं । तुजवेगळें ।।३४।।

पूर्वीं देव नाहीं पुजिला । वैभव देखोन भुलला ।
सेखीं प्राणी प्रस्तावला । वृद्धपणीं ।३५।

देह अत्यंत खंगलें । सर्वांग वाळोन गेलें ।
वातपीत उसळलें । कंठ दाटला कफें ।३६।

वळे जिव्हेचि बोबडी । कफें कंठ घडघडी ।
दुर्गंधी सुटली तोंडीं । नाकीं स्लेष्मा वाहे ।३७।

मान कांपे चळचळां । डोळे गळतीं भळभळां ।
वृद्धपणीं अवकळा । ठाकून आली ।३८।

दंतपाटी उखळली । तेणें बोचरखिंडी पडिली ।
मुखीं लाळ गळों लागली । दुर्गंधीची ।३९।

डोळां पाहतां दिसेना । कानीं शब्द ऐकेना ।
दीर्घ स्वरें बोलवेना । दमा दाटे ।४०।

शक्ती पायांची राहिली । बैसवेना मुरुकुंडी घाली ।
बृहती वाजों लागली । तोंडाच ऐसी ।४१।

क्षुधा लागतां आवरेना । अन्न समई मिळेना ।
मिळालें तरी चावेना । दांत गेले ।४२।

पित्तें जिरेना अन्न । भक्षीतांच होये वमन ।
तैसेंचि जाये निघोन । अपानद्वारें ।४३।

विष्टा मूत्र आणी बळस । भोवता वमनें केला नास ।
दुरून जातां कोंडे स्वास । विश्वजनाचा ।४४।

नाना दुःखें नाना व्याधी । वृद्धपणीं चळे बुद्धी ।
तऱ्हीं पुरेना आवधी । आयुष्याची ।४५।

पापण्या भवयाचे केश । पिकोन झडले निःशेष ।
सर्वांगीं लोंबलें मांस । चिरकुटासारिखें ।४६।

देह सर्व पारिखें जालें । सवंगडे नि:शेष राहिले ।
सकळ प्राणीमात्र बोले । मरेना कां ।४७।

जें जन्मून पोसलीं । तेंचि फिरोन पडिलीं ।
अंतीं विषम वेळ आली । प्राणीयांसी ।४८।

गेलें तारुण्य गेलें बळ । गेलें संसारीचें सळ ।
वाताहात जालें सकळ । शरीर आणि संपत्ती ।४९।

जन्मवरी स्वार्थ केला । तितुकाहि वेर्थ गेला ।
कैसा विषम काळ आला । अंतकाळीं ।५०।

सुखाकारणें झुरला । सेखीं दु:खें कष्टी जाला ।
पुढें मागुता धोका आला । येमयातनेचा ।५१।

जन्म अवघा दु:खमूळ । लागती दु:खाचे इंगळ ।
म्हणोनियां तत्काळ । स्वहित करावें ।५२।

असो ऐसें वृद्धपण । सकळांस आहे दारुण ।
म्हणोनियां शरण । भगवंतास जावें ।५३।

पुढें वृद्धीस तत्त्वतां । गर्भीं प्रस्तावा होता ।
तोचि आला मागुता । अंतकाळीं ।५४।

म्हणौनि मागुतें जन्मांतर । प्राप्त मातेचें उदर ।
संसार हा अति दुस्तर । तोचि ठाकून आला ।५५।

भगवद्भजनावांचुनी । चुकेना हे जन्मयोनी ।
तापत्रयांची जाचणी । सांगिजेल पुढें ।५६।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'स्वगुणपरीक्षानाम'
समास पाचवा समाप्त.

❑❑

दशक ३: समास ६

आध्यात्मिकताप

॥ श्रीराम ॥

तापत्रयाचें लक्षण । आतां सांगिजेल निरूपण ।
श्रोतीं करावें श्रवण । येकाग्र होऊनी । १ ।

जो तापत्रैं पोळला । तो संतसंगें निवाला ।
आर्तभूत तोषला । पदार्थ जेवी । २ ।

क्षुधाक्रांतास मिळे अन्न । तृषाक्रांतास जीवन ।
बंदी पडिल्याचें बंधन । तोडितां सुख । ३ ।

माहापुरें जाजावला । तो पैलतीरास नेला ।
कां तो स्वप्नींचा चेइला । स्वप्नदुःखी । ४ ।

कोणी येकासी मरण । येतां दिलें जीवदान ।
संकटास निवारण । तोडितां सुख । ५ ।

रोगियास औषध । सप्रचित आणी शुद्ध ।
तयासी होये आनंद । आरोग्य होता । ६ ।

तैसा संसारें दुःखवला । त्रिविधतापें पोळला ।
तोचि येक अधिकारी जाला । परमार्थासी । ७ ।

ते त्रिविध ताप ते कैसे । आतां बोलिजेत तैसे ।
येविषईं येक असे । वाक्याधार । ८ ।

देहेंद्रियप्राणेन सुखं दुःखं च प्राप्यते ।
इममाध्यात्मिकं तापं जायते दुःखं देहिनाम् ॥
सर्वभूतेन संयोगात् सुखं दुःखं च जायते ।
द्वितीयतापसंतापः सत्यं चैवाधिभौतिकः ॥

शुभाशुभेन कर्मणा देहान्ते यमयातना।
स्वर्गनरकादि भोक्तव्यमिदं चैवाधिदैविकम्॥

येक ताप आध्यात्मिक। दुजा तो आदिभूतिक।
तिसरा आदिदैविक। ताप जाणावा ।९।

आध्यात्मिक तो कोण। कैसी त्याची वोळखण।
आदिभूतिकांचें लक्षण। जाणिजे कैसें ।१०।

आदिदैविक तो कैसा। कवण तयाची दशा।
हेंहि विशद कळे ऐसा। विस्तार कीजे ।११।

हां जी म्हणोनि वक्ता। जाला कथा विस्तारिता।
आध्यात्मिक ताप आतां। सावध ऐका ।१२।

देह इंद्रिय आणी प्राण। यांचेनि योगें आपण।
सुखदुःखें सिणे जाण। या नांव आध्यात्मिक ।१३।

देहामधून जें आलें। इंद्रियें प्राणें दुःख जालें।
तें आध्यात्मिक बोलिलें। तापत्रई ।१४।

देहामधून काये आलें। प्राणें कोण दुःख जालें।
आतां हें विशद केलें। पाहिजे कीं ।१५।

खरुज खवडे पुळिया नारु। नखरुडें मांजऱ्या देवि गोवरु।
देहामधील विकारु। या नांव आध्यात्मिक ।१६।

काखमांजरी केशतोड। वोखटें वर्ण काळफोड।
व्याधी मूळव्याधी माहाजड। या नांव आध्यात्मिक ।१७।

अंगुळवेडे गालफुगी। कंड लागे जे वाउगी।
हिरडी सुजे भरे बलंगी। या नांव आध्यात्मिक ।१८।

वाउगे फोड उठती। कां ते सुजे आंगकांती।
वात आणि तिडका लागती। या नांव आध्यात्मिक ।१९।

नाइटे अंदु गजकर्ण । पेहाचें पोट विस्तीर्ण ।
बैसलें टाळें फुटती कर्ण । या नांव आध्यात्मिक ।२०।

कुष्ट आणी वोला कुष्ट । पंड्यारोग अतिश्रेष्ठ ।
क्षयरोगाचे कष्ट । या नांव आध्यात्मिक ।२१।

वाटी वटक वायेगोळा । हातीं पाईं लागती कळा ।
भोवंडी लागे वेळोवेळां । या नांव आध्यात्मिक ।२२।

वोलांडा आणि वळ । पोटसुळाची तळमळ ।
आर्धशिसी उठे कपाळ । या नांव आध्यात्मिक ।२३।

दुःखे माज आणि मान । पुष्ठी ग्रीवा आणि वदन ।
अस्तिसांदे दुःखती जाण । या नांव आध्यात्मिक ।२४।

कुळिक तरळ कामिणी । मुरमा सुंठरें माळिणी ।
विदेसीं लागलें पाणी । या नांव आध्यात्मिक ।२५।

जळसोस आणि हिवारें । गिरीविरी आणि अंधारे ।
ज्वर पाचाव आणि शारें । या नांव आध्यात्मिक ।२६।

शैत्य उष्ण आणि तृष्णा । क्षुधा निद्रा आणी दिशा ।
विषयतृष्णेची दुर्दशा । या नांव आध्यात्मिक ।२७।

आळसी मूर्ख आणी अपेसी । भय उद्भवे मानसीं ।
विसराळु दुश्चित्त आहिर्निशी । या नांव आध्यात्मिक ।२८।

मूत्रकोड आणी परमें । रक्तपिती रक्तपरमें ।
खडाचढाचेनि श्रमे । या नांव आध्यात्मिक ।२९।

मुरडा हागवण उन्हाळे । दिशा कोंडतां आंदोळे ।
येक वेथा असोन न कळे । या नांव आध्यात्मिक ।३०।

गांठी ढळली जाले जंत । पडे आंव आणी रक्त ।
अन्न तैसेंचि पडत । या नांव आध्यात्मिक ।३१।

पोटफुगी आणि तडस । भरला हिर लागला घांस ।
फोडी लागतां कासावीस । या नांव आध्यात्मिक ।३२।

उचकी लागली उसित गेला । पीत उसळलें उलाट जाला ।
खरे पडसा आणि खोंकला । या नांव आध्यात्मिक ।३३।

उसळला दमा आणी धाप । पडजिभ ढासि आणी कफ ।
मोवाज्वर आणी संताप । या नांव आध्यात्मिक ।३४।

कोणी सेंदुर घातला । तेणें प्राणी निर्बुजला ।
घशामध्यें फोड जाला । या नांव आध्यात्मिक ।३५।

गळसोट्या आणी जीभ झडे । सदा मुखीं दुर्गंधी पडे ।
दंतहीन लागती किडे । या नांव आध्यात्मिक ।३६।

जरंडी घोलाणा गंडमाळा । अवचिता स्वयें फुटे डोळा ।
आपणचि कापी अंगुळा । या नांव आध्यात्मिक ।३७।

कळा तिडका लागती । कां तें दंत उन्मळती ।
अधर जिव्हा रगडती । या नांव आध्यात्मिक ।३८।

कर्णदुःख नेत्रदुःख । नाना दुःखें घडे शोक ।
गर्भांध आणि नपुश्यक । या नांव आध्यात्मिक ।३९।

फुलें वडस आणी पडळें । कीड गर्ता रातांधळें ।
दुश्चित्त भ्रमिष्ट आणी खुळें । या नांव आध्यात्मिक ।४०।

मुकें बधीर राखोंडें । थोटें चळलें आणी वेडें ।
पांगुळ कुऱ्हें आणी पावडें । या नांव आध्यात्मिक ।४१।

तारसें घुलें काणें कैरें । गारोळें जामुन टाफरें ।
शडांगुळें गेंगाणें विदरें । या नांव आध्यात्मिक ।४२।

दांतिरें बोचिरें घानाळ । घ्राणहीन श्रोत्रहीन बरळ ।
अतिकृश अतिस्थूळ । या नांव आध्यात्मिक ।४३।

तोंतरें बोंबडें निर्बळ । रोगी कुरूप कुटीळ ।
मत्सरी खादाड तपीळ । या नांव आध्यात्मिक ।४४।

संतापी अनुतापी मत्सरी । कामिक हेवा तिरस्कारी ।
पापी अवगुणी विकारी । या नांव आध्यात्मिक ।४५।

उठवणें ताठा करक । आवटळे आणी लचक ।
सुजी आणी चालक । या नांव आध्यात्मिक ।४६।

सल आडवें गर्भपात । स्तनगुंते सनपात ।
संसारकोंडे आपमृत्य । या नांव आध्यात्मिक ।४७।

नखविख आणी हिंगुर्डे । बाष्ट आणि वावडें ।
उगीच दांतखिळ पडे । या नांव आध्यात्मिक ।४८।

झडती पातीं सुजती भवया । नेत्रीं होती राझणवडीया ।
चाळसी लागे प्राणियां । या नांव आध्यात्मिक ।४९।

वांग तिळ सुरमें लांसे । चामखिळ गलंडें मसें ।
चुकुर होईजे मानसें । या नांव आध्यात्मिक ।५०।

नाना फुग आणी आवाळें । आंगी दुर्गंधी प्रबळे ।
चाईचाटी लाळ गळे । या नांव आध्यात्मिक ।५१।

नाना चिंतेची काजळी । नाना दुःखें चित्त पोळी ।
व्याधीवांचून तळमळी । या नांव आध्यात्मिक ।५२।

वृद्धपणीच्या आपदा । नाना रोग होती सदा ।
देह क्षीण सर्वदा । या नांव आध्यात्मिक ।५३।

नाना व्याधी नाना दुःखें । नाना भोग नाना खांडकें ।
प्राणी तळमळी शोकें । या नांव आध्यात्मिक ।५४।

ऐसा आध्यात्मिक ताप । पूर्वपापाचा संताप ।
सांगतां सरेना अमूप । दुःखसागर ।५५।

बहुत काय बोलावें । श्रोतीं संकेतें जाणावें ।
पुढें बोलिजे स्वभावें । आदिभूतिक ।५६।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आध्यात्मिकतापनाम'
समास सहावा समाप्त.

❑❑

दशक ३ : समास ७
आधिभौतिकताप

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । आध्यात्मिकाचें लक्षण ।
आतां आदिभूतिक तो कोण । सांगिजेल । १ ।

सर्वभूतेन संयोगात् सुखं दुःखं च जायते ।
द्वितीयतापसंतापः सत्यं चैवाधिभौतिकः ॥

सर्व भूतांचेनि संयोगें । सुख दुःख उपजों लागे ।
ताप होतां मन भंगे । या नांव आदिभूतिक । २ ।

तरी या आदिभूतिकाचें लक्षण । प्रांजळ करूं निरूपण ।
जेणें अनुभवास ये पूर्ण । वोळखी तापत्रयाची । ३ ।

ठेंचा लागती मोडती कांटे । विझती शस्त्रांचे घायटे ।
सल सिलका आणी सरांटे । या नांव आदिभूतिक । ४ ।

अंग्या आणि काचकुहिरी । आवचटा लागे शरीरीं ।
गांधील येऊन दंश करी । या नांव आदिभूतिक । ५ ।

मासी गोमासी मोहळमासी । मुंगी तेलमुंगी डांस दसी ।
सोट जळु लागे यासी । आदिभूतिक बोलिजे । ६ ।

पिसा पिसोळे चांचण । कुसळें मुंगळे ढेंकुण ।
विसीफ भोवर गोंचिड जाण । या नांव आदिभूतिक । ७ ।

गोंबी विंचु आणी विखार । व्याघ्र लांडिगे आणी शूकर ।
गौसायळ सामर । या नांव आदिभूतिक । ८ ।

रानगाई रानम्हैसे । रानशकट्ट आणी रींसें ।
रानहाती लावपिसें । या नांव आदिभूतिक । ९ ।

सुसरीनें वोढून नेलें । कां तें आवचितें बुडालें ।
अथवा खळाळीं पडिलें । या नाव आदिभूतिक ।१०।

नाना विखारें आजगर । नाना मगरें जळचर ।
नाना वनचरें अपार । या नांव आदिभूतिक ।११।

अश्व वृषभ आणी खर । स्वान शूकर जंबुक मार्जर ।
ऐसीं बहुविध क्रूर । या नांव आदिभूतिक ।१२।

ऐसीं कर्कशें भयानकें । बहुविध दुःखदायकें ।
दुःखें दारुणें अनेकें । या नांव आदिभूतिक ।१३।

भिंती माळवदें पडती । कडे भुयेरीं कोंसळती ।
वृक्ष आंगावरी मोडती । या नांव आदिभूतिक ।१४।

कोणी येकाचा श्राप जडे । कोणी येकें केलें चेडें ।
आधांतरी होती वेडे । या नांव आदिभूतिक ।१५।

कोणी येकें चाळविलें । कोणी येंके भ्रष्टविलें ।
कोणी येकें धरून नेलें । या नांव आदिभूतिक ।१६।

कोणी येकें दिलें वीष । कोणी येंके लाविले दोष ।
कोणी येकें घातले पाश । या नांव आदिभूतिक ।१७।

अवचिता सेर लागला । नेणो बिबवा चिडला ।
प्राणी धुरें जाजावला । या नांव आदिभूतिक ।१८।

इंगळावरी पाय पडे । शिळेखालें हात सांपडे ।
धावतां आडखुळे पडे । या नांव आदिभूतिक ।१९।

वापी कूप सरोवर । गर्ता कडा नदीतीर ।
आवचितें पडे शरीर । या नांव आदिभूतिक ।२०।

दुर्गाखाले कोंसळती । झाडावरून पडती ।
तेणें दुःखें आक्रंदती । या नांव आदिभूतिक ।२१।

सीतें वोठ तरकती । हात पाव टांका फुटती ।
चिखल्या जिव्हाळ्या लागती । या नांव आदिभूतिक ।२२।

अशनपानाचिये वेळे । उष्ण रसें जिव्हा पोळे ।
दांत कस्करे आणि हरळे । या नांव आदिभूतिक ।२३।

पराधेन बाळपणीं । कुशब्दमारजाचणी ।
अन्नवस्त्रेंवीण आळणी । या नांव आदिभूतिक ।२४।

सासुरवास गालोरे । ठुणके लासणें चिमोरे ।
आलें रुदन न धरे । या नांव आदिभूतिक ।२५।

चुकतां कान पिळिती । कां तो डोळां हिंग घालिती ।
सर्वकाळ धारकीं धरिती । या नांव आदिभूतिक ।२६।

नाना प्रकारीचे मार । दुर्जन मारिती अपार ।
दुरी अंतरे माहेर । या नांव आदिभूतिक ।२७।

कर्ण नासिक विंधिलें । बळेंचि धरून गोंधिले ।
खोडी जालिया पोळविलें । या नांव आदिभूतिक ।२८।

परचक्रीं धरून नेलें । नीच यातीस दिधलें ।
दुर्दशा होऊन मेलें । या नांव आदिभूतिक ।२९।

नाना रोग उद्भवले । जे आध्यात्मिकीं बोलिले ।
वैद्य पंचाक्षरी आणिले । या नांव आदिभूतिक ।३०।

नाना वेथेचें निर्शन । व्हावया औषध दारुण ।
बळात्कारें देती जाण । या नांव आदिभूतिक ।३१।

नाना वल्लीचे रस । काडे गर्गोंड कर्कश ।
घेतां होये कासावीस । या नांव आदिभूतिक ।३२।

ढाळ आणी उखाळ देती । पथ्य कठीण सांगती ।
अनुपान चुकतां विपत्ती । या नांव आदिभूतिक ।३३।

फाड रक्त फांसणी । गुल्लडागांची जाचणी ।
तेणें दुःखें दुखवे प्राणी । या नांव आदिभूतिक ।३४।

रुचिक बिबवे घालिती । नाना दुःखें दडपे देती ।
सिरा तोडिती जळवा लाविती । या नांव आदिभूतिक ।३५।

बहु रोग बहु औषधें । सांगतां अपारें अगाधें ।
प्राणी दुखवे तेणें खेदें । या नांव आदिभूतिक ।३६।

बोलाविला पंचाक्षरी । धूरमार पीडा करी ।
नाना यातना चतुरीं । आदिभूतिक जाणिजे ।३७।

दरवडे घालूनियां जना । तश्कर करिती यातना ।
तेणें दुःख होये मना । या नांव आदिभूतिक ।३८।

अग्नीचेनि ज्वाळें पोळे । तेणे दुःखें प्राणी हरंबळे ।
हानी जालियां विवळे । या नांव आदिभूतिक ।३९।

नाना मंदिरें सुंदरें । नाना रत्नांचीं भांडारें ।
दिव्यांबरें मनोहरें । दग्ध होती ।४०।

नाना धान्यें नाना पदार्थ । नाना पशु नाना स्वार्थ ।
नाना पात्रें नाना अर्थ । मनुष्यें भस्म होती ।४१।

आग्न लागला सेती । धान्यें बणव्या आणि खडकुती ।
युक्षदंड जळोन जाती । अकस्मात ।४२।

ऐसा आग्न लागला । अथवा कोणीं लाविला ।
हानी जाली कां पोळला । या नांव आदिभूतिक ।४३।

ऐसे सांगतां बहुत । होती वन्हीचे आघात ।
तेणें दुःखें दुःखवें चित्त । या नांव आदिभूतिक ।४४।

हारपे विसरे आणि सांडे । नासे गाहाळे फुटे पडे ।
असाध्य होये कोणीकडे । या नांव आदिभूतिक ।४५।

प्राणी स्थानभ्रष्ट जालें । नाना पशूतें चुकलें ।
कन्यापुत्र गाहाळले । या नांव आदिभूतिक ।४६।

तश्कर अथवा दावेदार । आवचिता करिती संव्हार ।
लुटिती घरें नेती खिल्लार । या नांव आदिभूतिक ।४७।

नाना धान्यें केळी कापिती । पानमळां मीठ घालिती ।
ऐसे नाना आघात करिती । या नांव आदिभूतिक ।४८।

मैंद उचले खाणोरी । सुवर्णपंथी भुररेकरी ।
ठकु सिंतरु वरपेकरी । वरपा घालिती ।४९।

गठीछोडे द्रव्य सोडिती । नाना आळंकार काढिती ।
नाना वस्तू मूषक नेती । या नांव आदिभूतिक ।५०।

वीज पडे हिंव पडे । प्राणी प्रजंनीं सांपडे ।
कां तो माहापुरीं बुडे । या नांव आदिभूतिक ।५१।

भोंवरे वळणें आणी धार । वोसाणें लाटा अपार ।
वृश्चिक गोंबी आजगर । वाहोन जाती ।५२।

तयांमधें प्राणी सांपडला । खडकीं बेटीं आडकला ।
बुडत बुडत वांचला । या नांव आदिभूतिक ।५३।

मनासारिखा नसे संसार । कुरूप कर्कश स्त्री क्रूर ।
विधवा कन्या मूर्ख पुत्र । या नांव आदिभूतिक ।५४।

भूत पिशाच्च लागलें । आंगावरून वारें गेलें ।
अबद्ध मंत्रें प्राणी चळलें । या नांव आदिभूतिक ।५५।

ब्राह्मणसमंध शरीरीं । बहुसाल पीडा करी ।
शनेश्वराचा धोका धरी । या नांव आदिभूतिक ।५६।

नाना ग्रहे काळवार । काळतिथी घातचंद्र ।
काळवेळ घातनक्षत्र । या नांव आदिभूतिक ।५७।

सिंक पिंगळा आणी पाली । वोखटें होला काक कलाली ।
चिंता काजळी लागली । या नांव आदिभूतिक ।५८।

दिवटा सरवदा भाकून गेला । अंतरीं धोका लागला ।
दुःस्वप्नें जाजावला । या नांव आदिभूतिक ।५९।

भालु भुंके स्वान रडे । पाली आंगावरी पडे ।
नाना चिन्हें चिंता पवाडे । या नांव आदिभूतिक ।६०।

बाहेरी निघतां अपशकुन । नाना प्रकारें विच्छिन्न ।
तेणें गुणें भंगे मन । या नांव आदिभूतिक ।६१।

प्राणीं बंदीं सांपडला । यातने वरपडा जाला ।
नाना दुःखें दुःखवला । या नांव आदिभूतिक ।६२।

प्राणी राजदंड पावत । जेरबंद चाबुक वेत ।
दरेमार तळवेमार होत । या नांव आदिभूतिक ।६३।

कोरडे पारंब्या फोक । बहुप्रकारें अनेक ।
बहु ताडिती आदिभूतिक । या नांव बोलिजे ।६४।

मोघरीमार बुधलेमार । चौखुरून डंगारणेमार ।
बुक्या गचांड्या गुडघेमार । या नांव आदिभूतिक ।६५।

लाता चपराखा सेणमार । कानखडे दगडमार ।
नाना प्रकारींचे मार । या नांव आदिभूतिक ।६६।

टांगणें टिपऱ्या पिछोडे । बेडी बुधनाल कोलदंडे ।
रक्षणनिग्रह चहूंकडे । या नांव आदिभूतिक ।६७।

नाकवणी चुनवणी । मीठवणी रायवणी ।
गुळवण्याची जाचणी । या नांव आदिभूतिक ।६८।

जळामध्यें बुचकुळिती । हस्तीपुढें बांधोन टाकिती ।
हाकिती छळिती यातायाती । या नांव आदिभूतिक ।६९।

कर्णछेद घ्राणछेद । हस्तछेद पादछेद ।
जिव्हाछेद अधरछेद । या नांव आदिभूतिक ।७०।

तीरमार सुळीं देती । नेत्र वृषण काढिती ।
नखोनखीं सुया मारिती । या नांव आदिभूतिक ।७१।

पारड्यामध्यें घालणें । कां कडेलोट करणें ।
कां भांड्यामुखें उडवणें । या नांव आदिभूतिक ।७२।

कानीं खुंट्या आदळिती । अपानीं मेखा मारिती ।
खाल काढून टाकिती । या नांव आदिभूतिक ।७३।

भोत आणी बोटबोटी । अथवा गळ घालणें कंठीं ।
सांडस लावून आटाटी । या नांव आदिभूतिक ।७४।

सिसें पाजणें वीष देणें । अथवा सिरछेद करणें ।
कां पायातळीं घालणें । या नांव आदिभूतिक ।७५।

सरडे मांजरें भरिती । अथवा फांशी नेऊन देती ।
नानापरी पीडा करिती । या नांव आदिभूतिक ।७६।

स्वानप्रळये व्याघ्रप्रळये । भूतप्रळये सुसरीप्रळये ।
शस्त्रप्रळये विझप्रळये । या नांव आदिभूतिक ।७७।

सीरा वोढून घेती । टेंभें लाऊन भाजिती ।
ऐशा नाना विपत्ती । या नांव आदिभूतिक ।७८।

मनुष्यहानी वित्तहानी । वैभवहानी महत्त्वहानी ।
पशुहानी पदार्थहानी । या नांव आदिभूतिक ।७९।

बाळपणीं मरे माता । तारुण्यपणीं मरे कांता ।
वृद्धपणीं मृत्य सुता । या नांव आदिभूतिक ।८०।

दुःख दारिद्र आणी रुण । विदेशपळणी नागवण ।
आपदा अनुपती कदान्न । या नांव आदिभूतिक ।८१।

आकांत वाखाप्रळये । युध्य होतां पराजये ।
जिवलगांचा होये क्षये । या नांव आदिभूतिक ।८२।

कठीण काळ आणी दुष्काळ । साशंक आणि वोखटी वेळ ।
उद्वेग चिंतेचे हळाळ । या नांव आदिभूतिक ।८३।

घाणा चरखीं सिरकला । चाकाखालें सांपडला ।
नाना वन्हींत पडिला । या नांव आदिभूतिक ।८४।

नाना शस्त्रें भेदिला । नाना स्वापदीं भक्षिला ।
नाना बंदीं पडिला । या नांव आदिभूतिक ।८५।
नाना कुवासें निर्बुजे । नाना अपमानें लाजे ।
नाना शोकें प्राणी झिजे । या नांव आदिभूतिक ।८६।
ऐसें सांगतां अपार । आहेत दुःखाचे डोंगर ।
श्रोतीं जाणावा विचार । आदिभूतिकाचा ।८७।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आधिभौतिकतापनाम'
समास सातवा समाप्त.

❑❑

दशक ३ : समास ८

आदिदैविकताप

॥ श्रीराम ॥

मागां बोलिला आध्यात्मिक । त्याउपरी आदिभूतिक ।
आतां बोलिजेल आदिदैविक । तो सावध ऐका । १ ।

शुभाशुभेन कर्मणा देहांते यमयातना ।
स्वर्गनरकादि भोक्तव्यमिदं चैवाधिदैविकम् ॥

शुभाशुभ कर्मानें जना । देहांतीं येमयातना ।
स्वर्ग नर्क भोग नाना । या नांव आदिदैविक । २ ।
नाना दोष नाना पातकें । मदांधपणें अविवेकें ।
केलीं परी तें दुःखदायकें । येमयातना भोगविती । ३ ।
आंगबळें द्रव्यबळें । मनुष्यबळें राजबळें ।
नाना सामर्थ्याचेनि बळें । अकृत्य करिती । ४ ।

नीती सांडूनियां तत्वतां । करूं नये तेंचि करितां ।
येमयातना भोगितां । जीव जाये । ५ ।

डोळे झांकून स्वार्थबुद्धी । नाना अभिळाश कुबुद्धी ।
वृत्ति भूमिसिमा सांधी । द्रव्य दारा पदार्थ । ६ ।

मातलेपणें उन्मत्त । जीवघात कुटुंबघात ।
अप्रमाण क्रिया करीत । म्हणौन येमयातना । ७ ।

मर्यादा सांडूनि चालती । ग्रामा दंडी ग्रामाधिपती ।
देशा दंडी देशाधिपती । नीतिन्याय सांडितां । ८ ।

देशाधिपतीस दंडिता रावो । रायास दंडिता देवो ।
राजा न करितां नीतिन्यावो । म्हणौन येमयातना । ९ ।

अनीतीनें स्वार्थ पाहे । राजा पापी होऊन राहे ।
राज्याअंतीं नर्क आहे । म्हणौनियां ।१०।

राजा सांडितां राजनीति । तयास येम गांजिती ।
येम नीति सांडितां धावती । देवगण ।११।

ऐसी मर्यादा लाविली देवें । म्हणौनि नीतीनें वर्तावें ।
नीति न्याय सांडितां भोगावें । येमयातनेसी ।१२।

देवें प्रेरिले येम । म्हणौनि आदिदैविक नाम ।
तृतीय ताप दुर्गम । येमयातनेचा ।१३।

येमदंड येमयातना । शास्त्रीं बोलिले प्रकार नाना ।
तो भोग कदापि चुकेना । या नांव आदिदैविक ।१४।

येमयातनेचे खेद । शास्त्री बोलिले विशद ।
शेरीरीं घालून अप्रमाद । नाना प्रकारें ।१५।

पापपुण्याचीं शरीरें । स्वर्गीं असती कळीवरें ।
त्यांत घालून नाना प्रकारें । पापपुण्य भोगविती ।१६।

नाना पुण्यें नाना विळास । नाना दोषें यातना कर्कश ।
शास्त्रीं बोलिलें अविश्वास । मानूंच नये ।१७।

वेदाज्ञेनें न चालती । हरिभक्ती न करिती ।
त्यास येमयातना करिती । या नांव आदिदैविक ।१८।

अक्षोभ नर्कीं उदंड जीव । जुनाट किडें करिती रवरव ।
बांधोन टाकिती हातपाव । या नांव आदिदैविक ।१९।

उदंड पैस लाहान मुख । कुंभाकार कुंड येक ।
दुर्गंधी उकाडा कुंभपाक । या नांव आदिदैविक ।२०।

तप्त भूमिका तापविती । जळत स्तंभ पोटाळविती ।
नाना सांडस लाविती । या नाव आदिदैविक ।२१।

येमदंडाचे उदंड मार । यातनेची सामग्री अपार ।
भोग भोगिती पापी नर । या नांव आदिदैविक ।२२।

पृथ्वीमध्यें मार नाना । त्याहून कठीण येमयातना ।
मारितां उसंतचि असेना । या नांव आदिदैविक ।२३।

चौघे चौंकडे वोढिती । येक तें झोंकून पाडिती ।
ताणिती मारिती वोढूनि नेती । या नांव आदिदैविक ।२४।

उठवेना बैसवेना । रडवेना पडवेना ।
यातनेवरी यातना । या नांव आदिदैविक ।२५।

आक्रंदे रडे आणी फुंजे । धकाधकीनें निर्बुजे ।
झुर्झुरों पंजर होऊन झिजे । या नांव आदिदैविक ।२६।

कर्कश वचनें कर्कश मार । यातनेचे नाना प्रकार ।
त्रास पावती दोषी नर । या नांव आदिदैविक ।२७।

मागां बोलिला राजदंड । त्याहून येमदंड उदंड ।
तेथील यातना प्रचंड । भीमरूप दारुण ।२८।

आध्यात्मिक आदिभूतिक । त्याहूनि विशेष आदिदैविक ।
अल्पसंकेतें कांहींयेक । कळावया बोलिलें ।२९।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आधिदैविकतापनाम'
समास आठवा समाप्त.

❑❑

दशक ३ : समास ९

मृत्युनिरूपण

॥ श्रीराम ॥

संसार म्हणजे सवेंच स्वार । नाहीं मरणास उधार ।
मापीं लागलें शरीर । घडीनें घडी । १ ।

नित्य काळाची संगती । न कळे होणाराची गती ।
कर्मासारिखे प्राणी पडती । नाना देसीं विदेसीं । २ ।

सरतां संचिताचें शेष । नाहीं क्षणाचा अवकाश ।
भरतां न भरतां निमिष्य । जाणें लागे । ३ ।

अवचितें काळाचे म्हणियारे । मारित सुटती येकसरें ।
नेऊन घालिती पुढारे । मृत्युपंथें । ४ ।

होतां मृत्याची आटाटी । कोणी घालूं न सकती पाठीं ।
सर्वत्रांस कुटाकुटी । मागेंपुढें होतसे । ५ ।

मृत्यकाळ काठी निकी । बैसे बळियाचे मस्तकीं ।
माहाराजे बळिये लोकीं । राहों न सकती । ६ ।

मृत्य न म्हणे किं हा क्रूर । मृत्य न म्हणे हा जुंझार ।
मृत्य न म्हणे संग्रामशूर । समरंगणीं । ७ ।

मृत्य न म्हणे किं हा कोपी । मृत्य न म्हणे हा प्रतापी ।
मृत्य न म्हणे उग्ररूपी । माहाखळ । ८ ।

मृत्य न म्हणे बळाढ्य । मृत्य न म्हणे धनाढ्य ।
मृत्य न म्हणे आढ्य । सर्वगुणें ।९।

मृत्य न म्हणे हा विख्यात । मृत्य न म्हणे हा श्रीमंत ।
मृत्य न म्हणे हा अद्भुत । पराक्रमी ।१०।

मृत्य न म्हणे हा भूपती । मृत्य न म्हणे हा चक्रवर्ती ।
मृत्य न म्हणे हा करामती । कैवाड जाणे ।११।

मृत्य न म्हणे हयपती । मृत्य न म्हणे गजपती ।
मृत्य न म्हणे नरपती । विख्यात राजा ।१२।

मृत्य न म्हणे वरिष्ठ जनीं । मृत्य न म्हणे राजकारणी ।
मृत्य न म्हणे वेतनी । वेतनधर्ता ।१३।

मृत्य न म्हणे देसाई । मृत्य न म्हणे वेवसाई ।
मृत्य न म्हणे ठाईं ठाईं । पुंड राजे ।१४।

मृत्य न म्हणे मुद्राधारी । मृत्य न म्हणे व्यापारी ।
मृत्य न म्हणे परनारी । राजकन्या ।१५।

मृत्य न म्हणे कार्याकारण । मृत्य न म्हणे वर्णावर्ण ।
मृत्य न म्हणे हा ब्राह्मण । कर्मनिष्ठ ।१६।

मृत्य न म्हणे वित्पन्न । मृत्य न म्हणे संपन्न ।
मृत्य न म्हणे विद्वज्जन । समुदाई ।१७।

मृत्य न म्हणे हा धूर्त । मृत्य न म्हणे बहुश्रुत ।
मृत्य न म्हणे हा पंडित । माहाभला ।१८।

मृत्य न म्हणे पुराणिक । मृत्य न म्हणे हा वैदिक ।
मृत्य न म्हणे हा याज्ञिक । अथवा जोसी ।१९।

मृत्य न म्हणे अग्निहोत्री । मृत्य न म्हणे हा श्रोत्री ।
मृत्य न म्हणे मंत्रयंत्री । पूर्णागमी ।२०।

मृत्य न म्हणे शास्त्रज्ञ । मृत्य न म्हणे वेदज्ञ ।
मृत्य न म्हणे सर्वज्ञ । सर्व जाणे ।२१।

मृत्य न म्हणे ब्रह्महत्या । मृत्य न म्हणे गोहत्या ।
मृत्य न म्हणे नाना हत्या । स्त्रीबाळकादिक ।२२।

मृत्य न म्हणे रागज्ञानी । मृत्य न म्हणे ताळज्ञानी ।
मृत्य न म्हणे तत्वज्ञानी । तत्ववेत्ता ।२३।

मृत्य न म्हणे योगाभ्यासी । मृत्य न म्हणे संन्यासी ।
मृत्य न म्हणे काळासी । वंचूं जाणे ।२४।

मृत्य न म्हणे हा सावध । मृत्य न म्हणे हा सिद्ध ।
मृत्य न म्हणे वैद्य प्रसिद्ध । पंचाक्षरी ।२५।

मृत्य न म्हणे हा गोसावी । मृत्य न म्हणे हा तपस्वी ।
मृत्य न म्हणे हा मनस्वी । उदासीन ।२६।

मृत्य न म्हणे ऋषेश्वर । मृत्य न म्हणे कवेश्वर ।
मृत्य न म्हणे दिगंबर । समाधिस्थ ।२७।

मृत्य न म्हणे हठयोगी । मृत्य न म्हणे राजयोगी ।
मृत्य न म्हणे वीतरागी । निरंतर ।२८।

मृत्य न म्हणे ब्रह्मचारी । मृत्य न म्हणे जटाधारी ।
मृत्य न म्हणे निराहारी । योगेश्वर ।२९।

मृत्य न म्हणे हा संत । मृत्य न म्हणे हा महंत ।
मृत्य न म्हणे हा गुप्त । होत असे ।३०।

मृत्य न म्हणे स्वाधेन । मृत्य न म्हणे पराधेन ।
सकळ जीवांस प्राशन । मृत्यचि करी ।३१।

येक मृत्यमार्गीं लागले । येकीं आर्ध पंथ क्रमिले ।
येक ते सेवटास गेले । वृद्धपणीं ।३२।

मृत्य न म्हणे बाळ तारुण्य । मृत्य न म्हणे सुलक्षण ।
मृत्य न म्हणे विचक्षण । बहु बोलिका ।३३।

मृत्य न म्हणे हा आधार । मृत्य न म्हणे उदार ।
मृत्य न म्हणे हा सुंदर । चतुरांग जाणे ।३४।

मृत्य न म्हणे पुण्यपुरुष । मृत्य न म्हणे हरिदास ।
मृत्य न म्हणे विशेष । सुकृती नर ।३५।

आतां असो हें बोलणें । मृत्यापासून सुटिजे कोणें ।
मागें पुढें विश्वास जाणें । मृत्यपंथें ।३६।

च्यारी खाणी च्यारी वाणी । चौऱ्यांसी लक्ष जीवयोनी ।
जन्मा आले तितुके प्राणी । मृत्य पावती ।३७।

मृत्याभेणें पळों जातां । तरी मृत्य सोडिना सर्वथा ।
मृत्यास न ये चुकवितां । कांहीं केल्या ।३८।

मृत्य न म्हणे हा स्वदेसी । मृत्य न म्हणे हा विदेसी ।
मृत्य न म्हणे हा उपवासी । निरंतर ।३९।

मृत्य न म्हणे थोर थोर । मृत्य न म्हणे हरिहर ।
मृत्य न म्हणे अवतार । भगवंताचे ।४०।

श्रोतीं कोप न करावा । हा मृत्यलोक सकळांस ठावा ।
उपजला प्राणी जाईल बरवा । मृत्यपंथें ।४१।

येथें न मानावा किंत । हा मृत्यलोक विख्यात ।
प्रगट जाणती समस्त । लहान थोर ।४२।

तथापि किंत मानिजेल । तरी हा मृत्यलोक नव्हेल ।
याकारणें नासेल । उपजला प्राणी ।४३।

ऐसे जाणोनियां जीवें । याचें सार्थकचि करावें ।
जनीं मरोन उरवावें । कीर्तिरूपें ।४४।

येरवीं प्राणी लहान थोर । मृत्य पावती हा निर्धार ।
बोलिलें हें अन्यथा उत्तर । मानूंचि नये ।४५।

गेले बहुत वैभवाचे । गेले बहुत आयुष्याचे ।
गेले अगाध महिमेचे । मृत्यपंथें ।४६।

गेले बहुत पराक्रमी । गेले बहुत कपटकर्मी ।
गेले बहुत संग्रामी । संग्रामसौरे ।४७

गेले बहुतां बळांचे । गेले बहुतां काळांचे ।
गेले बहुतां कुळांचे । कुळवंत राजे ।४८।

गेले बहुतांचे पाळक । गेले बुद्धीचे चाळक ।
गेले युक्तीचे तार्किक । तर्कवादी ।४९।

गेले विद्येचे सागर । गेले बळाचे डोंगर ।
गेले धनाचे कुबेर । मृत्यपंथें ।५०।

गेले बहुत पुरुषार्थाचे । गेले बहुत विक्रमाचे ।
गेले बहुत आटोपाचे । कार्यकर्ते ।५१।

गेले बहुत शस्त्रधारी । गेले बहुत परोपकारी ।
गेले बहुत नानापरी । धर्मरक्षक ।५२।

गेले बहुत प्रतापाचे । गेले बहुत सत्कीर्तीचे ।
गेले बहुत नीतीचे । नीतिवंत राजे ।५३।

गेले बहुत मतवादी । गेले बहुत कार्यवादी ।
गेले बहुत वेवादी । बहुतांपरीचे ।५४।

गेलीं पंडितांचीं थाटें । गेलीं शब्दांचीं कचाटें ।
गेलीं वादकें अचाटें । नाना मतें ।५५।

गेले तापषांचे भार । गेले संन्यासी अपार ।
गेले विचारकर्ते सार । मृत्यपंथें ।५६।

गेले बहुत संसारी । गेले बहुत वेषधारी ।
गेले बहुत नानापरी । नाना छंद करूनी ।५७।
गेले ब्राह्मणसमुदाये । गेले बहुत आच्यार्ये ।
गेले बहुत सांगों काये । किती म्हणौनि ।५८।
असो ऐसे सकळहि गेले । परंतु येकचि राहिले ।
जे स्वरूपाकार जाले । आत्मज्ञानी ।५९।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मृत्युनिरूपणनाम' समास नववा समाप्त.

❑❑

दशक ३ : समास १०

वैराग्यनिरूपण

॥ श्रीराम ॥

संसार म्हणिजे माहापूर । माजीं जळचरें अपार ।
डंखूं धावती विखार । काळसर्प । १ ।
आशा ममता देहीं बेडी । सुसरी करिताती तडातोडी ।
नेऊन दुःखाचे सांकडी । माजीं घालिती । २ ।
अहंकारनक्रें उडविलें । नेऊनि पाताळीं बुडविलें ।
तेथुनियां सोडविलें । न वचे प्राणी । ३ ।
काममगरमिठी सुटेना । तिरस्कार लागला तुटेना ।
मद मत्सर वोहटेना । भूलि पडिली । ४ ।
वासनाधामिणी पडिली गळां । घालून वेंटाळें वमी गरळा ।
जिव्हा लाळी वेळोवेळां । भयानक । ५ ।

माथां प्रपंचाचें वोझें । घेऊन म्हणे माझें माझें ।
बुडतांहि न सोडी, फुंजे । कुळाभिमानें । ६ ।

पडिलें भ्रांतीचें अंधारें । नागविलें अभिमानचोरें ।
आलें अहंतेचें कावरें । भूतबाधा । ७ ।

बहुतेक आवर्तीं पडिले । प्राणी वाहातचि गेले ।
जेंहिं भगवंतासी बोभाइलें । भावार्थबळें । ८ ।

देव आपण घालूनि उडी । तयांसी नेलें पैलथडी ।
येर तें अभाविकें बापुडीं । वाहातचि गेलीं । ९ ।

भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोन भुलला ।
संकटीं पावे भाविकाला । रक्षितसे ।१०।

जयास भगवंत आवडे । तयाचें देवासीं सांकडें ।
संसारदुःख सकळ उडे । निज दासाचें ।११।

जे अंकित ईश्वराचे । तयांस सोहळे निजसुखाचे ।
धन्य तेचि दैवाचे । भाविक जन ।१२।

जैसा भाव जयापासीं । तैसा देव तथासी ।
जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणीमात्रांचा ।१३।

जरी भाव असिला माईक । तरी देव होये माहा ठक ।
नवल तयाचें कौतुक । जैशास तैसा ।१४।

जैसें जयाचें भजन । तैसेंचि दे समाधान ।
भाव होतां किंचित न्यून । आपणहि दुरावे ।१५।

दर्पणीं प्रतिबिंब दिसे । जैस्यास तैसें भासे ।
तयाचें सूत्र असे । आपणाच पासीं ।१६।

जैसें आपण करावें । तैसेंचि तेणें व्हावें ।
जरी डोळे पसरूनि पाहावें । तरी तेंहि टवकारे ।१७।

भृकुटीस घालून मिठी । पाहाता क्रोधें तेंहि उठी ।
आपण हास्य करितां पोटीं । तेंहि आनंदे ।१८।

जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचाचि देव जाला ।
जो जैसें भजे त्याला । तैसाचि वोळे ।१९।

भावें परमार्थाचिया वाटा । वाहाती भक्तीचिया पेठा ।
भरला मोक्षाचा चोहाटा । सज्जनसंगें ।२०।

भावें भजनीं जे लागले । ते ईश्वरीं पावन जाले ।
भावार्थबळें उद्धरिले । पूर्वज तेहीं ।२१।

आपण स्वयें तरले । जनासहि उपेगा आले ।
कीर्तिश्रवणें जाले । अभक्त भावार्थी ।२२।

धन्य तयांची जननी । जे लागले हरिभजनीं ।
तेहिंच येक जन्म जनीं । सार्थक केला ।२३।

तयांची वर्णूं काय थोरी । जयांचा भगवंत कैवारी ।
कासे लाऊन उतरी । पार दुःखाचा ।२४।

बहुतां जन्मांचे सेवटीं । जेणें चुके अटाटी ।
तो हा नरदेह भेटी । करी भगवंतीं ।२५।

म्हणौन धन्य ते भाविक जन । जेंहिं जोडिलें हरिनिधान ।
अनंत जन्मांतरीचें पुण्य । फळासि आलें ।२६।

आयुष्य हेचि रत्नपेटी । माजीं भजनरत्नें गोमटीं ।
ईश्वरीं अर्पूनिया, लुटी । आनंदाची करावी ।२७।

हरिभक्त वैभवें कनिष्ठ । परी तो ब्रह्मादिकां वरिष्ठ ।
सदा सर्वदा संतुष्ट । नैराशबोधें ।२८।

धरून ईश्वराची कास । केली संसाराची नैराश ।
तयां भाविकां जगदीश । सबाह्य सांभाळी ।२९।

जया संसाराचें दुःख । विवेकें वाटे परम सुख ।
संसारसुखाचेनि पढतमूर्ख । लोधोन पडती ।३०।

जयांचा ईश्वरीं जिव्हाळा । ते भोगिती स्वानंदसोहळा ।
जयांचा जनावेगळा । ठेवा आक्षै ।३१।

ते आक्षै सुखें सुखावले । संसारदुःखें विसरले ।
विषयेरंगीं वोरंगले । श्रीरंगरंगीं ।३२।

तयांस फावली नरदेह पेटी । केली ईश्वरेंसिं साटी ।
येरें अभाविकें करंटी । नरदेह गेला ।३३।

आवचटें निधान जोडलें । तें कवडिच्या बदल नेलें ।
तैसें आयुष्य निघोनि गेलें । अभाविकाचें ।३४।

बहुत तपाचा सांठा । तेणें लाधला परीस गोटा ।
परी तो ठाईचा करंटा । भोगूंच नेणे ।३५।

तैसा संसारास आला । मायाजाळीं गुंडाळला ।
अंती येकलाचि गेला । हात झाडुनी ।३६।

या नरदेहाचेनि संगती । बहुत पावले उत्तम गती ।
येकें बापुडीं यातायाती । वरपडीं जालीं ।३७।

या नरदेहाचेनि लागवेगें । सार्थक करावें संतसंगें ।
नीचयोनीं दुःख मागें । बहुत भोगिलें ।३८।

कोण समयो येईल कैसा । याचा न कळे किं भर्वसा ।
जैसे पक्षी दाही दिशा । उडोन जाती ।३९।

तैसें वैभव हें सकळ । कोण जाणें कैसी वेळ ।
पुत्रकळत्रादि सकळ । विघडोन जाती ।४०।

पाहिली घडी नव्हे आपुली । वयसा तरी निघोन गेली ।
देह पडतांच ठेविली । आहे नीच योनी ।४१।

स्वान शुकरादिक नीच याती । भोगणें घडे विपत्ती ।
तेथें कांहीं उत्तम गती । पाविजेत नाहीं ।४२।

मागां गर्भवासीं आटाटी । भोगितां जालासि रे हिंपुटी ।
तेथुनियां थोरा कष्टीं । सुटलासि दैवें ।४३।

दुःख भोगिलें आपुल्या जीवें । तेथें कैंचिं होतीं सर्वें ।
तैसेंचि पुढें येकलें जावें । लागेल बापा ।४४।

कैंची माता कैंचा पिता । कैंची बहिण कैंचा भ्राता ।
कैंचीं सुहृदें कैंची वनिता । पुत्रकळत्रादिक ।४५।

हे तूं जाण मावेचीं । आवघीं सोइरीं सुखाचीं ।
हे तुझ्या सुखदुःखाचीं । सांगाती नव्हेती ।४६।

कैंचा प्रपंच कैंचें कुळ । कासया होतोसी व्याकुळ ।
धन कण लक्ष्मी सकळ । जाइजणें ।४७।

कैंचें घर कैंचा संसार । कासया करिसी जोजार ।
जन्मवरी वाहोन भार । सेखीं सांडून जासी ।४८।

कैंचें तारुण्य कैंचें वैभव । कैंचे सोहळे हावभाव ।
हें सकळहि जाण माव । माईक माया ।४९।

येच क्षणीं मरोन जासी । तरी रघुनाथीं अंतरलासी ।
माझें माझें म्हणतोसी । म्हणौनियां ।५०।

तुवां भोगिल्या पुनरावृत्ती । ऐसीं मायबापें किती ।
स्त्री कन्या पुत्र होती । लक्षानलक्ष ।५१।

कर्मयोगें सकळ मिळालीं । येके स्थळीं जन्मास आलीं ।
ते तुवां आपुलीं मानिली । कैसीं रे पढतमूर्खा ।५२।

तुझें तुज नव्हे शरीर । तेथें इतरांचा कोण विचार ।
आतां येक भगवंत साचार । धरीं भावार्थबळें ।५३।

येका दुर्भराकारणें । नाना नीचांची सेवा करणें ।
नाना स्तुती आणी स्तवनें । मर्यादा धरावी ।५४।

जो अन्न देतो उदरासी । शेरीर विकावें लागे त्यासी ।
मां जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ।५५।

अहिर्निशीं ज्या भगवंता । सकळ जीवांची लागली चिंता ।
मेघ वरुषे जयाची सत्ता । सिंधु मर्यादा धरी ।५६।

भूमि धरिली धराधरें । प्रगट होईजे दिनकरें ।
ऐसी सृष्टी सत्तामात्रें । चालवी जो कां ।५७।

ऐसा कृपाळू देवाधिदेव । नेणवे जयाचें लाघव ।
जो सांभाळी सकळ जीव । कृपाळुपणें ।५८।

ऐसा सर्वात्मा श्रीराम । सांडून धरिती विषयकाम ।
ते प्राणी दुरात्मे अद्धम । केलें पावती ।५९।

रामेविण जे जे आस । तितुकी जाणीव नैराश ।
माझें माझें सावकाश । सीणचि उरे ।६०।

जयास वाटे सीण व्हावा । तेणें विषयो चिंतीत जावा ।
विषयो न मिळतां जीवा । तगबग सुटे ।६१।

सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन ।
त्यासी कैंचे समाधान । लोलंगतासी ।६२।

जयास वाटे सुखचि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें ।
स्वजन सकळहि त्यागावे । दुःखमूळ जे ।६३।

जेथें वासना झोंबोन पडे । तेणेंचि अपायें दुःख जडे ।
म्हणौनि विषयवासना मोडे । तो येक सुखी ।६४।

विषयजनित जें जें सुख । तेथेंचि होतें परमदुःख ।
पूर्वीं गोड अंतीं शोक । नेमस्त आहे ।६५।

गळ गिळितां सुख वाटे । वोढून घेतां घसा फाटे ।
कां तें बापुडें मृग आपटे । चारा घेऊन पळतां ।६६।

तैसी विषयेसुखाची गोडी । गोड वाटे परी ते कुडी ।
म्हणौनियां आवडी । रघुनाथीं धरावी ।६७।

ऐकोनि बोले भाविक । कैसेनि घडे जी सार्थक ।
सांगा स्वामी येमलोक । चुके जेणें ।६८।

देवासी वास्तव्य कोठें । तो मज कैसेंनि भेटे ।
दुःखमूळ संसार तुटे । कोणेपरी स्वामी ।६९।

धडपुडी भगवत्प्राप्ती । होऊन चुके अधोगती ।
ऐसा उपाये कृपामूर्ती । मज दीनास करावा ।७०।

वक्ता म्हणे हो येकभावें । भगवद्भजन करावें ।
तेणें होईल स्वभावें । समाधान ।७१।

कैसें करावें भगवद्भजन । कोठे ठेवावें हें मन ।
भगवद्भजनाचें लक्षण । मज निरोपावें ।७२।

ऐसा म्लानवदनें बोले । धरिले सदृढ पाऊलें ।
कंठ सद्गदित गळाले । अश्रुपात दुःखें ।७३।

देखोन शिष्याची अनन्यता । भावें वोळला सद्गुरु दाता ।
स्वानंद तुंबळेल आतां । पुढिले समासीं ।७४।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'वैराग्यनिरूपणनाम'
समास दहावा समाप्त.

❑❑

दशक तिसरा समाप्त

❑❑

दशक चौथा : नवविधा भक्ती

दशक ४ : समास १

श्रवणभक्ती

॥ श्रीराम ॥

जयजय जी गणनाथा । तू विद्यांवैभवें समर्था ।
अध्यात्मविद्येच्या परमार्था । मज बोलवावें । १ ।

नमूं शारदा वेदजननी । सकळ सिद्धि जयेचेनी ।
मानस प्रवर्तलें मननीं । स्फूर्तिरूपे । २ ।

आतां आठऊं सद्गुरु । जो पराचाहि परु ।
जयाचेनि ज्ञानविचारु । कळों लागे । ३ ।

श्रोतेन पुसिलें बरवें । भगवद्भजन कैसें करावें ।
म्हणौनि बोलिलें स्वभावें । ग्रन्थान्तरीं । ४ ।

सावध होऊन श्रोतेजन । ऐका नवविधा भजन ।
सत्शास्त्रीं बोलिलें पावन । होईजे येणें । ५ ।

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

नवविधा भजन बोलिलें । तेंचि पुढें प्रांजळ केलें ।
श्रोतीं अवधान दिधलें । पाहिजे आतां । ६ ।

प्रथम भजन ऐसें जाण । हरिकथापुराणश्रवण ।
नाना अध्यात्मनिरूपण । ऐकत जावे । ७ ।

कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग ।
योगमार्ग वैराग्यमार्ग । ऐकत जावे । ८ ।

नाना व्रतांचे महिमे । नाना तीर्थांचे महिमे ।
नाना दानांचे महिमे । ऐकत जावे । ९ ।

नाना माहात्में नाना स्थानें । नाना मंत्र नाना साधनें ।
नाना तपें पुरश्चरणें । ऐकत जावीं ।१०।

दुग्धाहारी निराहारी । फळाहारी पर्णाहारी ।
तृणाहारी नानाहारी । कैसे ते ऐकावे ।११।

उष्णवास जळवास । सीतवास आरण्यवास ।
भूगर्भ आणी आकाशवास । कैसे ते ऐकावे ।१२।

जपी तपी तामस योगी । नाना निग्रह हटयोगी ।
शाक्तआगम आघोरयोगी । कैसे ते ऐकावे ।१३।

नाना मुद्रा नाना आसनें । नाना देखणीं लक्षस्थानें ।
पिंडज्ञानें तत्त्वज्ञानें । कैसीं तें ऐकावीं ।१४।

नाना पिंडाची रचना । नाना भूगोळरचना ।
नाना सृष्टीची रचना । कैसी ती ऐकावी ।१५।

चंद्र, सूर्य तारामंडळें । ग्रहमंडळें मेघमंडळें ।
येकवीस स्वर्गें सप्तपाताळें । कैसीं तें ऐकावीं ।१६।

ब्रह्माविष्णु महेशस्थानें । इन्द्रदेवऋषीस्थानें ।
वायोवरुणकुबेरस्थानें । कैसीं ते ऐकावीं ।१७।

नव खंडें चौदा भुवनें । अष्ट दिग्पाळांचीं स्थानें ।
नाना वनें उपवनें गहनें । कैसीं ते ऐकावीं ।१८।

गण गंधर्व विद्याधर । येक्ष किन्नर नारद तुंबर ।
अष्ट नायका संगीतविचार । कैसा तो ऐकावा ।१९।

रागज्ञान ताळज्ञान । नृत्यज्ञान वाद्यज्ञान ।
अमृतवेळ प्रसंगज्ञान । कैसें तें ऐकावें ।२०।

चौदा विद्या चौसष्टी कळा । सामुद्रिक लक्षणें सकळ कळा ।
बत्तीस लक्षणें नाना कळा । कैशा त्या ऐकाव्या ।२१।

मंत्र मोहरे तोटके सिद्धी । नाना वल्ली नाना औषधी ।
धातु रसायण बुद्धी । नाडिज्ञानें ऐकावीं ।२२।

कोण्या दोषें कोण रोग । कोणा रोगास कोण प्रयोग ।
कोण्या प्रयोगास कोण योग । साधे तो ऐकावा ।२३।

रवरवादि कुंभपाक । नाना यातना येमलोक ।
सुखदुःखादि स्वर्गनर्क । कैसा तो ऐकावा ।२४।

कैशा नवविधा भक्ती । कैशा चतुर्विधा मुक्ती ।
कैसी पाविजे उत्तम गती । ऐसें हें ऐकावें ।२५।

पिंडब्रम्हांडाची रचना । नाना तत्त्वविवंचना ।
सारासारविचारणा । कैसी ते ऐकावी ।२६।

सायोज्यता मुक्ती कैसी होते । कैसें पाविजे मोक्षातें ।
याकारणें नाना मतें । शोधित जावीं ।२७।

वेदशास्त्रें आणि पुराणें । माहावाक्याचीं विवरणें ।
तनुचतुष्टयनिर्शनें । कैसीं तें ऐकावीं ।२८।

ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें ।
असार तें जाणोनि त्यागावें । या नांव श्रवणभक्ति ।२९।

सगुणाचीं चरित्रें ऐकावीं । कां तें निर्गुण अध्यात्में शोधावीं ।
श्रवणभक्तीचीं जाणावीं । लक्षणें ऐसीं ।३०।

सगुण देवांचीं चरित्रें । निर्गुणाचीं तत्त्वें यंत्रें ।
हे दोनी परम पवित्रें । ऐकत जावीं ।३१।

जयंत्या उपोषणें नाना साधनें । मंत्र यंत्र जप ध्यानें ।
कीर्ति स्तुती स्तवनें भजनें । नानाविधें ऐकावीं ।३२।

ऐसें श्रवण सगुणाचें । अध्यात्मनिरूपण निर्गुणाचें ।
विभक्ती सांडून भक्तीचें । मूळ शोधावें ।३३।
श्रवणभक्तीचें निरूपण । निरोपिलें असे जाण ।
पुढें कीर्तनभजनांचें लक्षण । बोलिलें असे ।३४।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'श्रवणभक्तिनाम'
समास पहिला समाप्त.

❑❑

दशक ४ : समास २
कीर्तनभक्ती

॥ श्रीराम ॥

श्रोतीं भगवद्भजन पुसिलें । तें नवविधा प्रकारें बोलिलें ।
त्यांत प्रथम श्रवण निरोपिलें । दुसरें कीर्तन ऐका ।१।
सगुण हरिकथा करावी । भगवत्कीर्ती वाढवावी ।
अखंड वैखरी वदवावी । येथायोग्य ।२।
बहुत करावें पाठांतर । कंठीं धरावें ग्रन्थांतर ।
भगवत्कथा निरंतर । करीत जावी ।३।
आपुलिया सुखस्वार्था । केलीच करावी हरिकथा ।
हरिकथेविण सर्वथा । राहोंचि नये ।४।
नित्य नवा हव्यास धरावा । साक्षेप अत्यंतचि करावा ।
हरिकीर्तनें भरावा । ब्रह्मगोळ अवघा ।५।
मनापासून आवडी । जीवापासून अत्यंत गोडी ।
सदा सर्वदा तांतडी । हरिकीर्तनाची ।६।

भगवंतास कीर्तन प्रिये । कीर्तनें समाधान होये ।
बहुत जनासी उपाये । हरिकीर्तनें कलयुगीं ।। ७ ।।

विविध विचित्रें ध्यानें । वर्णावीं आळंकार भूषणें ।
ध्यानमूर्ति अंतःकरणें । लक्षून कथा करावी ।। ८ ।।

येश कीर्ति प्रताप महिमा । आवडीं वर्णावा परमात्मा ।
जेणें भगवद्भक्तांचा आत्मा । संतुष्ट होये ।। ९ ।।

कथा अन्वय लापणिका । नामघोष करताळिका ।
प्रसंगें बोलाव्या अनेका । धात माता नेमस्त ।।१०।।

ताळ मृदांग हरिकीर्तन । संगीत नृत्य तान मान ।
नाना कथानुसंधान । तुटोंचि नेदावें ।।११।।

करुणाकीर्तनाच्या लोटें । कथा करावी घडघडाटें ।
श्रोतयांचीं श्रवणपुटें । आनंदें भरावीं ।।१२।।

कंप रोमांच स्फुराणें । प्रेमाश्रुसहित गाणें ।
देवद्वारीं लोटांगणें । नमस्कार घालावे ।।१३।।

पदें दोहडे श्लोक प्रबंद । धाटी मुद्रा अनेक छंद ।
बीरभाटिंव विनोद । प्रसंगें करावे ।।१४।।

नाना नवरसिक शृंधारिक । गद्यपद्याचें कौतुक ।
नाना वचनें प्रस्ताविक । शास्त्राधारें बोलावीं ।।१५।।

भक्तिज्ञान वैराग्यलक्षण । नीतिन्यायस्वधर्मरक्षण ।
साधनमार्ग अध्यात्मनिरूपण । प्रांजळ बोलावें ।।१६।।

प्रसंगें हरिकथा करावी । सगुणीं सगुणकीर्ति धरावी ।
निर्गुणप्रसंगें वाढवावी । अध्यात्मविद्या ।।१७।।

पूर्वपक्ष त्यागून सिद्धांत । निरूपण करावें नेमस्त ।
बहुधा बोलणें अव्यावेस्त । बोलोंचि नये ।।१८।।

करावें वेदपारायेण । सांगावें जनासी पुराण ।
मायाब्रह्मीचें विवरण । साकल्य वदावें ।१९।

ब्राह्मण्य रक्षावें आदरें । उपासनेचीं भजनद्वारें ।
गुरुपरंपरा निर्धारें । चळोंच नेदावी ।२०।

करावें वैराग्यरक्षण । रक्षावें ज्ञानाचें लक्षण ।
परम दक्ष विचक्षण । सर्वहि सांभाळी ।२१।

कीर्तन ऐकतां संदेह पडे । सत्य समाधान तें उडे ।
नीतिन्यायसाधन मोडे । ऐसें न बोलावें ।२२।

सगुणकथा या नांव कीर्तन । अद्वैत म्हणिजे निरूपण ।
सगुण रक्षून निर्गुण । बोलत जावें ।२३।

असो वगत्रुत्वाचा अधिकार । अल्पास न घडे सत्योत्तर ।
वक्ता पाहिजे साचार । अनुभवाचा ।२४।

सकळ रक्षून ज्ञान सांगे । जेणे वेदज्ञा न भंगे ।
उत्तम सन्मार्ग लागे । प्राणीमात्रांसी ।२५।

असो हें सकळ सांडून । करावें गुणानुवादकीर्तन ।
या नाव भगवद्भजन । दुसरी भक्ती ।२६।

कीर्तनें माहा दोष जाती । कीर्तनें होये उत्तम गती ।
कीर्तनें भगवत्प्राप्ती । येदर्थीं संदेह नाही ।२७।

कीर्तनें वाचा पवित्र । कीर्तनें होय सत्पात्र ।
हरिकीर्तनें प्राणीमात्र । सुसिळ होती ।२८।

कीर्तनें अवेग्रता घडे । कीर्तनें निश्चये सांपडे ।
कीर्तनें संदेह वुडे । श्रोतयांवक्त्यांचा ।२९।

सदा सर्वदा हरिकीर्तन । ब्रह्मसुत करी आपण ।
तेणें नारद तोचि नारायेण । बोलिजेत आहे ।३०।

म्हणोनि कीर्तनाचा अगाध महिमा । कीर्तनें संतोषे परमात्मा ।
सकळ तीर्थें आणी जगदात्मा । हरिकीर्तनीं वसे ।३१।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'कीर्तनभक्तिनाम'
समास दुसरा समाप्त.

❑❑

दशक ४ : समास ३
नामस्मरणभक्ती

॥ श्रीराम ॥

मागां निरोपिलें कीर्तन । जें सकळांस करी पावन ।
आतां ऐका विष्णोः स्मरण । तिसरी भक्ती । १ ।

स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ।
नामस्मरणें पावावें । समाधान । २ ।

नित्य नेम प्रातःकाळीं । माध्यानकाळीं सायंकाळीं ।
नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें । ३ ।

सुख दुःख उद्वेग चिंता । अथवा आनंदरूप असतां ।
नामस्मरणोंविण सर्वथा । राहोंच नये । ४ ।

हरुषकाळीं विषमकाळीं । पर्वकाळीं प्रस्तावकाळीं ।
विश्रांतिकाळीं निद्राकाळीं । नामस्मरण करावें । ५ ।

कोडें साकडें संकट । नाना संसारखटपट ।
आवस्ता लागतां चटपट । नामस्मरण करावें । ६ ।

चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां ।
नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये । ७ ।

संपत्ती अथवा विपत्ती । जैसी पडेल काळगती ।
नामस्मरणाची स्थिती । सांडूंच नये ।८।

वैभव सामर्थ्य आणी सत्ता । नाना पदार्थ चालता ।
उत्कट भाग्यश्री भोगितां । नामस्मरण सांडूं नये ।९।

आधीं आवदसा मग दसा । अथवा दसेउपरी आवदसा ।
प्रसंग असो भलतैसा । परंतु नाम सोडूं नये ।१०।

नामें संकटें नासती । नामें विघ्नें निवारती ।
नामस्मरणें पाविजेती । उत्तम पदें ।११।

भूत पिशाच्य नाना छंद । ब्रह्मगिऱ्हो ब्राह्मणसमंध ।
मंत्रचळ नाना खेद । नामनिष्ठें नासती ।१२।

नामें विषबाधा हरती । नामें चेडे चेटकें नासती ।
नामें होये उत्तम गती । अंतकाळीं ।१३।

बाळपणीं तारुण्यकाळीं । कठिणकाळीं वृधाप्यकाळीं ।
सर्वकाळीं अंतकाळीं । नामस्मरण असावें ।१४।

नामाचा महिमा जाणे शंकर । जना उपदेसी विश्वेश्वर ।
वाराणसी मुक्तिक्षेत्र । रामनामेंकरूनी ।१५।

उफराट्या नामासाठीं । वाल्मिक तरला उठाउठी ।
भविष्य वदला शतकोटी । चरित्र रघुनाथाचें ।१६।

हरिनामें प्रल्हाद तरला । नाना आघातांपासून सुटला ।
नारायणनामें पावन जाला । अजामेळ ।१७।

नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले ।
माहापापी तेचि जाले । परम पवित्र ।१८।

परमेश्वराची अनंत नामें । स्मरतां तरिजे नित्यनेमें ।
नामस्मरण करितां येमें । बाधिजेना ।१९।

सहस्रा नामामध्यें कोणी येक । म्हणतां होतसे सार्थक ।
नाम स्मरतां पुण्यश्लोक । होईजे स्वयें ।२०।

कांहींच न करूनि प्राणी । रामनाम जपे वाणी ।
तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तांलागीं सांभाळी ।२१।

नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्यशरीर ।
माहा दोषांचे गिरिवर । रामनामें नासती ।२२।

अगाध महिमा न वचे वदला । नामें बहुत जन उद्धरला ।
हळहळापासून सुटला । प्रत्यक्ष चंद्रमौळी ।२३।

चहुं वर्णां नामाधिकार । नामीं नाहीं लहानथोर ।
जड मूढ पैलपार । पावती नामें ।२४।

म्हणौन नाम अखंड स्मरावे । रूप मनीं आठवावें ।
तिसरी भक्ती स्वभावें । निरोपिली ।२५।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'नामस्मरणभक्तिनाम'
समास तिसरा समाप्त.

❑❑

दशक ४ : समास ४

पादसेवनभक्ती

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । नामस्मरणाचें लक्षण ।
आतां ऐका पादसेवन । चौथी भक्ती । १ ।

पादसेवन तेंचि जाणावें । कायावाचामनोभावें ।
सद्गुरूचे पाय सेवावे । सद्गतिकारणें । २ ।

या नांव पादसेवन । सद्गुरुपदीं अनन्यपण ।
निरसावया जन्ममरण । यातायाती । ३ ।

सद्गुरुकृपेविण कांहीं । भवतरणोपाव तों नाहीं ।
याकारणें लवलाहीं । सद्गुरुपाय सेवावे । ४ ।

सद्वस्तु दाखवी सद्गुरु । सकळ सारासारविचारु ।
परब्रह्माचा निर्धारु । अंतरीं बाणे । ५ ।

जे वस्तु दृष्टीस दिसेना । आणी मनास तेहि भासेना ।
संगत्यागेंविण ये ना । अनुभवासी । ६ ।

अनुभव घेतां संगत्याग नसे । संगत्यागें अनुभव न दिसे ।
हे अनुभवीयासीच भासे । येरां गथागोवी । ७ ।

संगत्याग आणी निवेदन । विदेहस्थिती अलिप्तपण ।
सहजस्थिती उन्मनी विज्ञान । हे सप्तहि येकरूप । ८ ।

याहिवेगळीं नामाभिधानें । समाधानाचीं संकेतवचनें ।
सकळ कांहीं पादसेवनें । उमजों लागे । ९ ।

वेद वेदगर्भ वेदांत । सिद्ध सिद्धभावगर्भ सिद्धांत ।
अनुभव अनुर्वाच्य धादांत । सत्य वस्तु ।१०।

बहुधा अनुभवाचीं आंगें । सकळ कळती संतसंगें ।
चौथे भक्तीचे प्रसंगें । गौप्य तें प्रगटे ।११।

प्रगट वसोनि नसे । गोप्य असोनि भासे ।
भासाअभासाहून अनारिसे । गुरुगम्य मार्ग ।१२।

मार्ग होये परी अंतरिक्ष । जेथें सर्वहि पूर्वपक्ष ।
पाहों जातां अलक्ष । लक्षवेना ।१३।

लक्षें जयासी लक्षावें । ध्यानें जयासी ध्यावें ।
तें गे तेंचि आपण व्हावें । त्रिविधा प्रचिती ।१४।

असो हीं अनुभवाचीं द्वारें । कळती सारासारविचारें ।
सत्संगें करून सत्योत्तरें । प्रत्ययासि येतीं ।१५।

सत्य पाहातां नाहीं असत्य । असत्य पाहातां नाहीं सत्य ।
सत्याअसत्याचें कृत्य । पाहाणारापासीं ।१६।

पाहाणार पाहाणें जया लागलें । तें तद्रूपत्वें प्राप्त जालें ।
तरी मग जाणावें बाणलें । समाधान ।१७।

नाना समाधानें पाहतां । बाणतीं सद्गुरुकरितां ।
सद्गुरुविण सर्वथा । सन्मार्ग नसे ।१८।

प्रयोग साधनें सायास । नाना साक्षेपें विद्याअभ्यास ।
अभ्यासें कांहीं गुरुगम्यास । पाविजेत नाहीं ।१९।

जें अभ्यासें अभ्यासितां न ये । जें साधनें असाध्य होये ।
तें हें सद्गुरुविण काये । उमजों जाणे ।२०।

याकारणें ज्ञानमार्ग । कळाया धरावा सत्संग ।
सत्संगेंविण प्रसंग । बोलोंचि नये ।२१।

सेवावे सद्गुरूचे चरण । या नांव पादसेवन ।
चौथे भक्तीचें लक्षण । तें हें निरोपिलें ।२२।

देव ब्राह्मण माहानुभाव । सत्पात्र भजनाचें ठाव ।
ऐसिये ठाईं सद्भाव । दृढ धरावा ।२३।

हें प्रवृत्तीचें बोलणें । बोलिलें रक्षाया कारणें ।
परंतु सद्गुरुपाय सेवणें । या नांव पादसेवन ।२४।

पादसेवन चौथी भक्ती । पावन करितसे त्रिजगतीं ।
जयेकरितां सायोज्यमुक्ती । साधकास होये ।२५।

म्हणौनि थोराहूनि थोर । चौथे भक्तीचा निर्धार ।
जयेकरितां पैलपार । बहुत प्राणी पावती ।२६।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'पादसेवनभक्तिनाम'
समास चौथा समाप्त.

❑❑

दशक ४ : समास ५

अर्चनभक्ती

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । चौथे भक्तीचें लक्षण ।
आतां ऐका सावधान । पांचवी भक्ती । १ ।

पाचवी भक्ती तें आर्चन । आर्चन म्हणिजे देवतार्चन ।
शास्त्रोक्त पूजाविधान । केलें पाहिजे । २ ।

नाना आसनें उपकर्णें । वस्त्रें आळंकार भूषणें ।
मानसपूजा मूर्तिध्यानें । या नांव पांचवी भक्ती । ३ ।

देवब्राह्मण अग्नीपूजन । साधुसंत अतीतपूजन ।
इतिमहानुभावगाइत्रीपूजन । या नांव पांचवी भक्ती । ४ ।

धातुपाषाणमृत्तिकापूजन । चित्रलेप सत्पात्रपूजन ।
आपले गृहींचें देवतार्चन । या नांव पांचवी भक्ती । ५ ।

सीळा सप्तांकित नवांकित । शालिग्राम शकलें चक्रांकित ।
लिंगें सूर्यकांत सोमकांत । बाण तांदळे नर्बदे । ६ ।

भैरव भगवती मल्लारी । मुंज्या नृसिंह बनशंकरी ।
नाग नाणी नानापरी । पंचायेतपूजा । ७ ।

गणेशशारदाविठलमूर्ती । रंगनाथजगन्नाथतांडवमूर्ती ।
श्रीरंगहनुमंतगरुडमूर्ती । देवतार्चनीं पूजाव्या । ८ ।

मत्छकूर्मवऱ्हावमूर्ती । नृसिंहवामनभार्गवमूर्ती ।
रामकृष्णहयग्रीवमूर्ती । देवतार्चनीं पूजाव्या । ९ ।

केशवनारायणमाधवमूर्ती । गोविंदविष्णुमदसूदनमूर्ती ।
त्रिविक्रमवामनश्रीधरमूर्ती । रुषीकेश पद्मनाभि । १० ।

दामोदरसंकर्षणवासुदेवमूर्ती । प्रद्युम्नअनुरधपुरुषोत्तम मूर्ती ।
अधोक्षजनारसिंहअच्युतमूर्ती । जनार्दन आणि उपेंद्र ।११।

हरिहरांच्या अनंत मूर्ती । भगवंत जगदात्मा जगदीशमूर्ती ।
शिवशक्तीच्या बहुधा मूर्ती । देवतार्चनीं पूजाव्या ।१२।

अश्वत्थनारायेण सूर्यनारायेण । लक्ष्मीनारायेण त्रिमल्लनारायेण ।
श्रीहरीनारायण आदिनारायण । शेषशाई परमात्मा ।१३।

ऐश्या परमेश्वराच्या मूर्ती । पाहों जातां उदंड असती ।
त्यांचे आर्चन करावें भक्ती । पांचवी ऐसी ।१४।

याहि वेगळे कुळधर्म । सोडूं नये अनुक्रम ।
उत्तम अथवा मध्यम । करीत जावें ।१५।

जाखमाता मायराणी । बाळा बगुळा मानविणी ।
पूजा मांगिणी जोगिणी । कुळधर्मे करावीं ।१६।

नाना तीर्थां क्षेत्रांस जावें । तेथें त्या देवांचें पूजन करावें ।
नाना उपचारीं आर्चावें । परमेश्वरासी ।१७।

पंचामृतें गंधाक्षतें । पुष्पें परिमळद्रव्यें बहुतें ।
धूपदीप असंख्यातें । नीरांजनें कर्पुराचीं ।१८।

नाना खाद्य नैवेद्य सुंदर । नाना फळें तांबोलप्रकार ।
दक्षणा नाना आळंकार । दिव्यांबरें वनमाळा ।१९।

सिबिका छत्रें सुखासनें । माहि मेघडंब्रें सूर्यापानें ।
दिंड्या पताका निशाणें । टाळ घोळ मृदंग ।२०।

नाना वाद्यें नाना उत्साव । नाना भक्तसमुदाव ।
गाती हरिदास सद्भाव । लागला भगवंतीं ।२१।

वापी कूप सरोवरें । नाना देवाळयें सिखरें ।
राजांगणें मनोहरें । वृंदावनें भुयरीं ।२२।

मठ मंड्या धर्मशाळा । देवद्वारीं पडशाळा ।
नाना उपकर्णें नक्षत्रमाळा । नाना वस्त्र सामग्री ।२३।

नाना पडदे मंडप चांदोवे । नाना रत्नघोष लोंबती बरवे ।
नाना देवाळईं समर्पावे । हस्थी घोडे शक्कटें ।२४।

आळंकार आणी आळंकारपात्रें । द्रव्य आणी द्रव्यपात्रें ।
अन्नोदक आणी अन्नोदकपात्रे । नाना प्रकारीचीं ।२५।

वनें उपवनें पुष्पवाटिका । तापस्यांच्या पर्णकुटिका ।
ऐसी पूजा जगन्नायका । येथासांग समर्पावी ।२६।

शुक शारिका मयोरें । बदकें चक्रवाकें चकोरें ।
कोकिळा चितळें सामरें । देवाळईं समर्पावीं ।२७।

सुगंधमृगें आणी माजरिं । गाई म्हैसी वृषभ वानरें ।
नाना पदार्थ आणी लेंकुरें । देवाळईं समर्पावीं ।२८।

काया वाचा मनें । चित्तें वित्तें जीवें प्राणें ।
सद्भावें भगवंत आर्चनें । या नाव आर्चनभक्ती ।२९।

ऐसेंचि सद्गुरूचें भजन । करून असावें अनन्य ।
या नाव भगवद्भजन । पांचवी भक्ती ।३०।

ऐसी पूजा न घडे बरवी । तरी मानसपूजा करावी ।
मानसपूजा अगत्य व्हावी । परमेश्वरासी ।३१।

मनें भगवंतास पूजावें । कल्पून सर्वही समर्पावें ।
मानसपूजेचें जाणावें । लक्षण ऐसें ।३२।

जें जें आपणांस पाहिजे । तें तें कल्पून वाहिजे ।
येणें प्रकारें कीजे । मानसपूजा ।३३।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'अर्चनभक्तिनाम'
समास पाचवा समाप्त.

❑❑

दशक ४ : समास ६

वंदनभक्ती

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । पांचवे भक्तीचें लक्षण ।
आतां ऐका सावधान । साहावी भक्ती । १ ।

साहावी भक्ती तें वंदन । करावें देवासी नमन ।
संत साधु आणी सज्जन । नमस्कारीत जावे । २ ।

सूर्यासि करावे नमस्कार । देवासि करावे नमस्कार ।
सद्गुरूस करावे नमस्कार । साष्टांग भावें । ३ ।

साष्टांग नमस्कारास अधिकारु । नाना प्रतिमा देवगुरु ।
अन्यत्र नमनाचा विचारु । अधिकारें करावा । ४ ।

छपन्न कोटी वसुमती । मधें विष्णूमूर्ती असती ।
तयांस नमस्कार प्रीती । साष्टांग घालावे । ५ ।

पशुपति श्रीपति आणी गभस्ती । यांच्या दर्शनें दोष जाती ।
तैसाचि नमावा मारुती । नित्य नेमें विशेष । ६ ।

शंकरः शेषशायी च मार्तंडो मारुतिस्तथा ।
एतेषां दर्शनं पुण्यं नित्यनेमे विशेषतः ॥

भक्त ज्ञानी आणी वीतरागी । माहानुभाव तापसी योगी ।
सत्पात्रें देखोनि वेगी । नमस्कार घालावे । ७ ।

वेदज्ञ शास्त्रज्ञ आणी सर्वज्ञ । पंडित पुराणिक आणी विद्वज्जन ।
याज्ञिक वैदिक पवित्रजन । नमस्कारीत जावे । ८ ।

जेथे दिसती विशेष गुण । तें सद्गुरुचें अधिष्ठान ।
याकारणें तयासी नमन । अत्यादरें करावें ।९।

गणेश शारदा नाना शक्ती । हरिहरांच्या अवतारमूर्ती ।
नाना देव सांगों किती । पृथकाकारें ।१०।

सर्व देवांस नमस्कारिलें । तें येका भगवंतास पावलें ।
येदर्थी येक वचन बोलिलें । आहे, तें ऐका ।११।

आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्वदेवनमस्कार: केशवं प्रति गच्छति ।।

याकारणें सर्व देवांसीं । नमस्कारावें अत्यादरेंसीं ।
अधिष्ठान मानितां, देवांसी । परम सौख्य वाटे ।१२।

देव देवाचीं अधिष्ठानें । सत्पात्रें सद्गुरुंचीं स्थानें ।
याकारणें नमस्कार करणें । उभय मार्गीं ।१३।

नमस्कारें लीनता घडे । नमस्कारें विकल्प मोडे ।
नमस्कारें सख्य घडे । नाना सत्पात्रासीं ।१४।

नमस्कारें दोष जाती । नमस्कारें अन्याय क्षमतीं ।
नमस्कारें मोडलीं जडतीं । समाधानें ।१५।

सिसापरता नाहीं दंड । ऐसें बोलती उदंड ।
याकारणें अखंड । देव भक्त वंदावे ।१६।

नमस्कारें कृपा उचंबळे । नमस्कारें प्रसन्नता प्रबळे ।
नमस्कारे गुरुदेव वोळे । साधकांवरी ।१७।

निशेष करितां नमस्कार । नासती दोषांचे गिरिवर ।
आणी मुख्य परमेश्वर । कृपा करी ।१८।

नमस्कारें पतित पावन । नमस्कारें संतांसी शरण ।
नमस्कारें जन्ममरण । दुरी दुऱ्हावे ।१९।

परम अन्याय करूनि आला । आणी साष्टांग नमस्कार घातला ।
तरी तो अन्याये क्षमा केला । पाहिजे श्रेष्ठीं ।२०।
याकारणें नमस्कारापरतें । आणीक नाहीं अनुसरतें ।
नमस्कारें प्राणीयातें । सद्बुद्धि लागे ।२१।
नमस्कारास वेचावें नलगे । नमस्कारास कष्टावें नलगे ।
नमस्कारास कांहींच नलगे । उपकर्ण सामग्री ।२२।
नमस्काराऐसें नाहीं सोपें । नमस्कार करावा अनन्यरूपें ।
नाना साधनीं साक्षपें । कासया सिणावें ।२३।
साधक भावें नमस्कार घाली । त्याची चिंता साधूस लागली ।
सुगम पंथें नेऊन घाली । जेथील तेथें ।२४।
याकारणें नमस्कार श्रेष्ठ । नमस्कारें वोळती वरिष्ठ ।
येथे सांगितली पष्ट । साहावी भक्ती ।२५।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'वंदनभक्तिनाम'
समास सहावा समाप्त.

❑❑

दशक ४ : समास ७

दास्यभक्ती

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । साहवें भक्तीचें लक्षण ।
आतां ऐका सावधान । सातवी भक्ती । १ ।
सातवें भजन तें दास्य जाणावें । पडिलें कार्य तितुकें करावें ।
सदा सन्निधचि असावें । देवद्वारीं । २ ।

देवांचे वैभव सांभाळावें । न्यूनपूर्ण पडोंचि नेदावें ।
चढतें वाढतें वाढवावें । भजन देवाचें । ३ ।

भंगलीं देवाळयें करावीं । मोडलीं सरोवरें बांधावीं ।
सोफे धर्मशाळा चालवावीं । नूतनचि कार्यें । ४ ।

नाना रचना जीर्ण जर्जर । त्यांचे करावे जीर्णोद्धार ।
पडिलें कार्य तें सत्वर । चालवित जावें । ५ ।

गज रथ तुरंग सिंहासनें । चौकिया सिबिका सुखासनें ।
मंचक डोल्हारे विमानें । नूतन चि करावीं । ६ ।

मेघडंब्रे छत्रें चामरें । सूर्यापानें निशाणें अपारें ।
नित्य नूतन अत्यादरें । सांभाळित जावीं । ७ ।

नाना प्रकारीचीं यानें । बैसावयाची उत्तम स्थानें ।
बहुविध सुवर्णासनें । येत्लें करीत जावीं । ८ ।

भुवनें कोठड्या पेट्या मांदुसा । रांझण कोहळीं घागरी बहुवसा ।
संपूर्ण द्रव्यांश ऐसा । अति येत्लें करावा । ९ ।

भुयेरीं तळघरें आणी विवरें । नाना स्थळें गुप्त द्वारें ।
अनर्घ्यें वस्तूंचीं भांडारें । येत्लें करीत जावीं ।१०।

आळंकार भूषणें दिव्यांबरें । नाना रत्लें मनोहरें ।
नाना धातु सुवर्णपात्रें । येत्लें करीत जावीं ।११।

पुष्पवाटिका नाना वनें । नाना तरुवरांची बनें ।
पावतीं करावीं जीवनें । तया वृक्षांसी ।१२।

नाना पशूंचिया शाळा । नाना पक्षी चित्रशाळा ।
नाना वाद्यें नाट्यशाळा । गुणी गायेक बहुसाल ।१३।

स्वयंपाकगृहें भोजनशाळा । सामग्रीगृहें धर्मशाळा ।
निद्रिस्तांकारणें पडशाळा । विशाळ स्थळें ।१४।

नाना परिमळद्रव्यांची स्थळें । नाना खाद्यफळांचीं स्थळें ।
नाना रसांचीं नाना स्थळें । येतें करीत जावीं ।१५।

नाना वस्तांची नाना स्थानें । भंगलीं करावीं नूतनें ।
देवाचें वैभव वचनें । किती म्हणौनि बोलावें ।१६।

सर्वां ठाईं अति सादर । आणी दास्यत्वास हि तत्पर ।
कार्यभागाचा विसर । पडणार नाहीं ।१७।

जयंत्या पर्वें मोहोत्साव । असंभाव्य चालवी वैभव ।
जें देखतां स्वर्गींचे देव । तटस्त होती ।१८।

ऐसें वैभव चालवावें । आणी नीच दास्यत्वहि करावें ।
पडिले प्रसंगीं सावध असावें । सर्वकाळ ।१९।

जें जें कांहीं पाहिजे । तें तें तत्काळचि देजे ।
अत्यंत आवडीं कीजे । सकळ सेवा ।२०।

चरण क्षाळणें स्नानें आचमनें । गंधाक्षतें वसनें भूषणें ।
आसनें जीवनें नाना सुमनें । धूप दीप नैवेद्य ।२१।

शयेनाकारणें उत्तम स्थळें । जळें ठेवावीं सुसीतळें ।
तांबोल गायनें रसाळें । रागरंगें करावीं ।२२।

परिमळद्रव्यें आणी फुलेलें । नाना सुगंधेल तेलें ।
खाद्य फळें बहुसालें । सन्निधचि असावीं ।२३।

सडे संमार्जनें करावीं । उदकपात्रें उदकें भरावीं ।
वसनें प्रक्षालून आणावीं । उत्तमोत्तमें ।२४।

सकळांचें करावें पारपत्य । आलयाचें करावें आतित्य ।
ऐसी हे जाणावी सत्य । सातवी भक्ती ।२५।

वचनें बोलावीं करुणेचीं । नाना प्रकारें स्तुतीचीं ।
अंतरें निवती सकळांचीं । ऐसें वदावें ।२६।

ऐसी हे सातवी भक्ती । निरोपिली येथामती ।
प्रत्यक्ष न घडे तरी चित्तीं । मानसपूजा करावी ।२७।
ऐसें दास्य करावें देवाचें । येणेंचि प्रकारें सद्गुरूचें ।
प्रत्यक्ष न घडे तरी मानसपूजेचें । करित जावें ।२८।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'दास्यभक्तिनाम'
समास सातवा समाप्त.

❑❑

दशक ४ : समास ८
सख्यभक्ती

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । सातवे भक्तीचें लक्षण ।
आतां ऐका सावधान । आठवी भक्ती । १ ।
देवासी परम सख्य करावें । प्रेम प्रीतीनें बांधावें ।
आठवें भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें । २ ।
देवास जयाची अत्यंत प्रीती । आपण वर्तावें तेणें रीतीं ।
येणें करितां भगवंतीं । सख्य घडे नेमस्त । ३ ।
भक्ति भाव आणी भजन । निरूपण आणी कथाकीर्तन ।
प्रेमळ भक्तांचें गायन । आवडे देवा । ४ ।
आपण तैसेंचि वर्तावें । आपणासि तेंच आवडावें ।
मनासारिखें होतां स्वभावें । सख्य घडे नेमस्त । ५ ।
देवाच्या सख्यत्वाकारणें । आपलें सौख्य सोडून देणें ।
अनन्यभावें जीवें प्राणें । शरीर तेंहि वेंचावें । ६ ।

सांडून आपली संसारवेथा । करित जावी देवाची चिंता ।
निरूपण कीर्तन कथा वार्ता । देवाच्याचि सांगाव्या ।७।

देवाच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्व अर्पावें सेवटीं । प्राण तोहि वेचावा ।८।

आपुले आवघेंचि जावें । परी देवासी सख्य रहावें ।
ऐसी प्रीती जिवें भावें । भगवंतीं लागावी ।९।

देव म्हणिजे आपुला प्राण । प्राणासी न करावें निर्वाण ।
परम प्रीतीचें लक्षण । तें हें ऐसे असें ।१०।

ऐसें परम सख्य धरितां । देवास लागे भक्ताची चिंता ।
पांडव लाखाजोहरीं जळतां । विवरद्वारें काढिले ।११।

देव सख्यत्वें राहे आपणांसी । तें तों वर्म आपणाचि पासीं ।
आपण वचनें बोलावीं जैसीं । तैसीं येती पडसादें ।१२।

आपण असतां अनन्यभावें । देव तत्काळचि पावे ।
आपण त्रास घेतां जीवें । देवहि त्रासे ।१३।

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।

जैसें जयाचें भजन । तैसाचि देवहि आपण ।
म्हणौन हें आवघें जाण । आपणाचि पासीं ।१४।

आपुल्या मनासारिखें न घडे । तेणें गुणें निष्ठा मोडे ।
तरी गोष्टी आपणांकडे । सहजचि आली ।१५।

मेघ चातकावरी वोळेना । तरी चातक पालटेना ।
चंद्र वेळेसि उगवेना । तऱ्ही चकोर अनन्य ।१६।

ऐसें असावें सख्यत्व । विवेकें धरावें सत्व ।
भगवंतावरील ममत्व । सांडूचि नये ।१७।

सखा मानावा भगवंत । माता पिता गण गोत ।
विद्या लक्ष्मी धन वित्त । सकळ परमात्मा ।१८।

देवावेगळें कोणी नाहीं । ऐसें बोलती सर्वहि ।
परंतु त्यांची निष्ठा कांहीं । तैसीच नसे ।१९।

म्हणौनि ऐसें न करावें । सख्य तरी खरेंचि करावें ।
अंतरीं सुदृढ धरावें । परमेश्वरासी ।२०।

आपुलिया मनोगताकारणें । देवावरी क्रोधास येणें ।
ऐसीं नव्हेत किं लक्षणें । सख्यभक्तीचीं ।२१।

देवाचें जें मनोगत । तेंचि आपुलें उचित ।
इच्छेसाठीं भगवंत । अंतरूं नये कीं ।२२।

देवाचे इच्छेनें वर्तावें । देव करील तें मानावें ।
मग सहजचि स्वभावें । कृपाळु देव ।२३।

पाहतां देवाचे कृपेसी । मातेची कृपा कायेसी ।
माता वधी बाळकासी । विपत्तिकाळीं ।२४।

देवें भक्त कोण वधिला । कधीं देखिला ना ऐकिला ।
शरणागतांस देव जाला । वज्रपंजरु ।२५।

देव भक्तांचा कैवारी । देव पतितांसी तारी ।
देव होये साहाकारी । अनाथांचा ।२६।

देव अनाथांचा कैपक्षी । नाना संकटांपासून रक्षी ।
धांवित्रला अंतरसाक्षी । गजेंद्राकारणें ।२७।

देव कृपेचा सागरु । देव करुणेचा जळधरु ।
देवासि भक्तांचा विसरु । पडणार नाहीं ।२८।

देव प्रीती राखों जाणे । देवासी करावें साजणें ।
जिवलगें आवघीं पिसुणें । कामा न येती ।२९।

सख्य देवाचें तुटेना । प्रीति देवाची विटेना ।
देव कदा पालटेना । शरणागतांसी ।३०।

म्हणौनि सख्य देवासी करावें । हितगुज तयासी सांगावें ।
आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ।३१।

जैसा देव तैसा गुरु । शास्त्रीं बोलिला हा विचारु ।
म्हणौन सख्यत्वाचा प्रकारु । सद्गुरुसीं असावा ।३२।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'सख्यभक्तिनाम'
समास आठवा समाप्त.

❑❑

दशक ४ : समास ९
आत्मनिवेदनभक्ती

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । आठवे भक्तीचें लक्षण ।
आतां ऐका सावधान । भक्ति नवमी ।१।

नवमी निवेदन जाणावें । आत्मनिवेदन करावें ।
तेहि सांगिजेल स्वभावें । प्रांजळ करूनि ।२।

ऐका निवेदनाचें लक्षण । देवासि वाहावें आपण ।
करावें तत्त्वविवरण । म्हणिजे कळे ।३।

मी भक्त ऐसें म्हणावें । आणी विभक्तपणेंचि भजावें ।
हें आवघेंचि जाणावें । विलक्षण ।४।

लक्षण असोन विलक्षण । ज्ञान असोन अज्ञान ।
भक्त असोन विभक्तपण । तें हें ऐसें ।५।

भक्त म्हणिजे विभक्त नव्हे । आणि विभक्त म्हणिजे भक्त नव्हे ।
विचारेंविण कांहींच नव्हे । समाधान । ६ ।

तस्मात् विचार करावा । देव कोण तो वोळखावा ।
आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं । ७ ।

मी कोण ऐसा निवाडा । पाहों जातां तत्वझाडा ।
विचार करितां उघडा । आपण नाहीं । ८ ।

तत्वें तत्व जेव्हां सरे । तेव्हां आपण कैंचा उरे ।
आत्मनिवेदन येणें प्रकारें । सहजचि जालें । ९ ।

तत्त्वरूप सकळ भासे । विवेक पाहातां निरसे ।
प्रकृतिनिरासें आत्मा असे । आपण कैंचा ।१०।

येक मुख्य परमेश्वरु । दुसरी प्रकृति जगदाकारु ।
तिसरा आपण कैंचा चोरु । आणिला मधें ।११।

ऐसें हें सिद्धचि असतां । नाथिली लागे देहअहंता ।
परंतु विचारें पाहों जातां । कांहींच नसे ।१२।

पाहाता तत्वविवंचना । पिंडब्रह्मांडतत्वरचना ।
विश्वाकारें वेक्ती नाना । तत्वें विस्तारलीं ।१३।

तत्वें साक्षत्वें वोसरतीं । साक्षत्व नुरे आत्मप्रचिती ।
आत्मा असे आदिअंतीं । आपण कैंचा ।१४।

आत्मा एक स्वानंदघन । आणी अहमात्मा हे वचन ।
तरी मग आपण कैंचा भिन्न । उरला तेथें ।१५।

सोहं हंसा हें उत्तर । याचें पहावें अर्थांतर ।
पाहतां आत्मयाचा विचार । आपण कैंचा तेथें ।१६।

आत्मा निर्गुण निरंजन । तयासी असावें अनन्य ।
अनन्य म्हणिजे नाहीं अन्य । आपण कैंचा तेथें ।१७।

आत्मा म्हणिजे तो अद्वैत । जेथें नाहीं द्वैताद्वैत ।
तेथें मीपणाचा हेत । उरेल कैंचा ।१८।

आत्मा पूर्णत्वें परिपूर्ण । जेथें नाहीं गुणागुण ।
निखळ निर्गुणीं आपण । कोण कैंचा ।१९।

त्वंपद तत्पद असिपद । निरसुनि सकळ भेदाभेद ।
वस्तु ठाईंची अभेद । आपण कैंचा ।२०।

निरसितां जीवशिवउपाधी । जीवशिवचि कैंचे आधीं ।
स्वरूपीं होतां दृढबुद्धी । आपण कैंचा ।२१।

आपण मिथ्या साच देव । देव भक्त अनन्यभाव ।
या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती ।२२।

या नांव आत्मनिवेदन । ज्ञानियांचे समाधान ।
नवमे भक्तीचें लक्षण । निरोपिलें ।२३।

पंचभूतांमध्यें आकाश । सकळ देवांमध्यें जगदीश ।
नवविधा भक्तीमध्यें विशेष । भक्ति नवमी ।२४।

नवमी भक्ती आत्मनिवेदन । न होतां न चुके जन्ममरण ।
हें वचन सत्य प्रमाण । अन्यथा नव्हे ।२५।

ऐसी हे नवविधा भक्ती । केल्यां पाविजे सायोज्यमुक्ती ।
सायोज्यमुक्तीस कल्पांती । चळण नाहीं ।२६।

तिहीं मुक्तींस आहे चळण । सायोज्यमुक्ती अचळ जाण ।
त्रैलोक्यास होतां निर्वाण । सायोज्यमुक्ती चळेना ।२७।

आवघीया चत्वार मुक्ती । वेदशास्त्रें बोलती ।
तयांमध्ये तीन नासती । चौथी ते अविनाश ।२८।

पहिली मुक्ती ते स्वलोकता । दुसरी ते समीपता ।
तिसरी ते स्वरूपता । चौथी सायोज्यमुक्ती ।२९।

ऐसिया चत्वार मुक्ती । भगवद्भजनें प्राणी पावती ।
हेंचि निरूपण प्रांजळ श्रोतीं । सावध पुढें परिसावें ।३०।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'आत्मनिवेदनभक्तिनाम'
समास नववा समाप्त.

❑❑

दशक ४ : समास १०

मुक्तिचतुष्टय

॥ श्रीराम ॥

मुळी ब्रह्म निराकार । तेथें स्फूर्तिरूप अहंकार ।
तो पंचभूतांचा विचार । ज्ञानदशकीं बोलिला । १ ।

तो अहंकार वायोरूप । तयावरी तेजाचें स्वरूप ।
तया तेजाच्या आधारें आप । आवर्णोदक दाटलें । २ ।

तया आवर्णोदकाच्या आधारें । धरा धरिली फणिवरें ।
वरती छपन्न कोटी विस्तारें । वसुंधरा हे । ३ ।

इयेवरी परिघ सप्त सागर । मध्य मेरु माहां थोर ।
अष्ट दिग्पाळ तो परिवार । अंतरें वेष्टित राहिला । ४ ।

तो सुवर्णांचा माहां मेरु । पृथ्वीस तयाचा आधारु ।
चौऱ्यांसी सहस्र विस्तारु । रुंदी तयाची । ५ ।

उंच तरी मर्यादेवेगळा । भूमीमधें सहस्र सोळा ।
तया भोवता वेष्टित पाळा । लोकालोक पर्वताचा । ६ ।

तया ऐलिकडे हिमाचळ । जेथें पांडव गळाले सकळ ।
धर्म आणि तमाळनीळ । पुढें गेले । ७ ।

जेथें जावया मार्ग नाहीं । मार्गीं पसरले माहा अही ।
सितसुखें सुखावले तें हि । पर्वतरूप भासती । ८ ।

तया ऐलिकडे सेवटीं जाण । बद्रिकाश्रम बद्रिनारायण ।
तेथें माहां तापसी निर्वाण । देहत्यागार्थ जाती ।९।

तया ऐलिकडे बद्रिकेदार । पाहोन येती लाहानथोर ।
ऐसा हा अवघा विस्तार । मेरुपर्वताचा ।१०।

तया मेरुपर्वतापाठारीं । तीन शृंगें विषमहारी ।
परिवारें राहिले तयावरी । ब्रह्मा विष्णु महेश ।११।

ब्रह्मशृंग तो पर्वताचा । विष्णुशृंग तो मर्गजाचा ।
शिवशृंग तो स्फटिकाचा । कैळास नाम त्याचें ।१२।

वैकुंठ नाम विष्णुशृंगाचें । सत्यलोक नाम ब्रह्मशृंगाचें ।
अमरावती इंद्राचें । स्थळ खालतें ।१३।

तेथें गण गंधर्व लोकपाळ । तेतिसकोटी देव सकळ ।
चौदा लोक सुवर्णाचळ । वेष्टित राहिले ।१४।

तेथें कामधेनूचीं खिलारें । कल्पतरूचीं बनें अपारें ।
अमृताचीं सरोवरें । ठाईं ठाईं उचंबळतीं ।१५।

तेथें उदंड चिंतामणी । हिरे परिसांचियां खाणी ।
तेथें सुवर्णमये धरणी । लखलखायमान ।१६।

परम रमणीये फांकती किळा । नवरत्नाचिया पाषाणसिळा ।
तेथे अखंड हरुषवेळा । आनंदमये ।१७।

तेथें अमृताचीं भोजनें । दिव्य गंधें दिव्य सुमनें ।
अष्ट नायका गंधर्वगायनें । निरंतर ।१८।

तेथें तारुण्य वोसरेना । रोगव्याधीहि असेना ।
वृधाप्य आणी मरण येना । कदाकाळीं ।१९।

तेथें येकाहूनि येक सुंदर । तेथें येकाहूनि येक चतुर ।
धीर उदार आणी शूर । मर्यादेवेगळे ।२०।

तेथें दिव्यदेह ज्योतिरूपें । विद्युल्यतेसारिखीं स्वरूपें ।
तेथें येश कीर्ति प्रतापें । सिमा सांडिली ।२१।

ऐसें तें स्वर्गभुवन । सकळ देवांचें वस्तें स्थान ।
तयां स्थळाचें महिमान । बोलिजे तितुकें थोडें ।२२।

येथें ज्या देवाचें भजन करावें । तेथें ते देवलोकीं राहावें ।
स्वलोकता मुक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ।२३।

लोकीं राहावें ते स्वलोकता । समीप असावें ते समीपता ।
स्वरूपचि व्हावें ते स्वरूपता । तिसरी मुक्ती ।२४।

देवस्वरूप जाला देही । श्रीवत्स कौस्तुभ लक्ष्मी नाहीं ।
स्वरूपतेचे लक्षण पाहीं । ऐसें असे ।२५।

सुकृत आहे तों भोगिती । सुकृत सरतांच ढकलून देती ।
आपण देव ते असती । जैसे तैसे ।२६।

म्हणोनि तिनी मुक्ति नासिवंत । सायोज्यमुक्ति ते शाश्वत ।
तेंहि निरोपिजेल सावचित्त । ऐक आतां ।२७।

ब्रह्मांड नासेल कल्पांतीं । पर्वतासहित जळेल क्षिती ।
तेव्हां अवघेच देव जाती । मां मुक्ति कैंच्या तेथें ।२८।

तेव्हां निर्गुण परमात्मा निश्चळ । निर्गुण भक्ति तेहि अचळ ।
सायोज्यमुक्ती ते केवळ । जाणिजे ऐसी ।२९।

निर्गुणीं अनन्य असतां । तेणें होये सायोज्यता ।
सायोज्यता म्हणिजे स्वरूपता । निर्गुण भक्ती ।३०।

सगुण भक्ति ते चळे । निर्गुण भक्ति ते न चळे ।
हें अवघें प्रांजळ कळे । सद्गुरु केलियां ।३१।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'मुक्तिचतुष्टयनाम'
समास दहावा समाप्त.

❑❑

दशक चौथा समाप्त

❑❑

दशक पाचवा : मंत्रांचा

दशक ५ : समास १

गुरुनिश्चय

॥ श्रीराम ॥

जय जय जी सद्गुरु पूर्णकामा । परमपुरुषा आत्मयारामा ।
अनुर्वाच्य तुमचा महिमा । वर्णिला नवचे । १ ।

जें वेदांस सांकडें । जें शब्दांसि कानडें ।
तें सत्शिष्यास रोकडें । अलभ्य लाभे । २ ।

जें योगियांचें निजवर्म । जें शंकराचें निजधाम ।
जें विश्रांतीचें निजविश्राम । परम गुह्य अगाध । ३ ।

तें ब्रह्म तुमचेनि योगें । स्वयें आपणचि होईजे आंगें ।
दुर्घट संसाराचेनि पांगें । पांगिजेना सर्वथा । ४ ।

आतां स्वामिचेनि लडिवाळपणें । गुरुशिष्यांचीं लक्षणें ।
सांगिजेती तेणें प्रमाणें । मुमुक्षें शरण जावें । ५ ।

गुरु तों सकळांसी ब्राह्मण । जऱ्हीं तो जाला क्रियाहीन ।
तरी तयासीच शरण । अनन्यभावें असावें । ६ ।

अहो या ब्राह्मणाकारणें । आवतार घेतला नारायेणें ।
विष्णूने श्रीवत्स मिरवणें । तेथें इतर ते किती ।७।

ब्राह्मणवचनें प्रमाण । होती शूद्रांचे ब्राह्मण ।
धातुपाषाणीं देवपण । ब्राह्मणाचेनि मंत्रें । ८ ।

मुंजीबंधनेंविरहित । तो शूद्रचि निश्चिंत ।
द्विजन्मी म्हणोनि सतंत । द्विज ऐसें नाम त्याचें । ९ ।

सकळांसि पूज्य ब्राह्मण । हे मुख्य वेदाज्ञा प्रमाण ।
वेदविरहित तें अप्रमाण । अप्रिये भगवंता ।१०।

ब्राह्मणीं योग याग व्रतें दानें । ब्राह्मणीं सकळ तीर्थाटणें ।
कर्ममार्ग ब्राह्मणाविणें । होणार नाहीं ।११।

ब्राह्मण वेद मूर्तिमंत । ब्राह्मण तोचि भगवंत ।
पूर्ण होती मनोरथ । विप्रवाक्येंकरूनी ।१२।

ब्राह्मणपूजनें शुद्ध वृत्ती । होऊन, जडे भगवंतीं ।
ब्राह्मणतीर्थें उत्तम गती । पावती प्राणी ।१३।

लक्षभोजनीं पूज्य ब्राह्मण । आन यातिसी पुसे कोण ।
तरी भगवंतासि भाव प्रमाण । येरा चाड नाहीं ।१४।

असो ब्राह्मणा सुरवर वंदिती । तेथें मानव बापुडें किती ।
जरी ब्राह्मण मूढमती । तरी तो जगद्वंद्य ।१५।

अंत्येज शब्दज्ञाता बरवा । परी तो नेऊन काये करावा ।
ब्राह्मणासन्निध पुजावा । हें तों न घडे कीं ।१६।

जें जनावेगळें केलें । ते वेदें अव्हेरिले ।
म्हणोनि तयासी नाम ठेविलें । पाषांडमत ।१७।

असो जे हरिहरदास । तयास ब्राह्मणीं विस्वास ।
ब्राह्मणभजनें बहुतांस । पावन केलें ।१८।

ब्राह्मणें पाविजे देवाधिदेवा । तरी किमर्थ सद्गुरु करावा ।
ऐसें म्हणाल तरी निजठेवा । सद्गुरुविण नाहीं ।१९।

स्वधर्मकर्मीं पूज्य ब्राह्मण । परी ज्ञान नव्हे सद्गुरुविण ।
ब्रह्मज्ञान नस्तां सीण । जन्ममृत्य चुकेना ।२०।

सद्गुरुविण ज्ञान कांहीं । सर्वथा होणार नाहीं ।
अज्ञान प्राणी प्रवाहीं । वाहातचि गेले ।२१।

ज्ञानविरहित जें जें केलें । तें तें जन्मासि मूळ जालें ।
म्हणौनि सद्गुरूचीं पाऊलें । सुदृढ धरावीं ।।२२।
जयास वाटे देव पाहावा । तेणें सत्संग धरावा ।
सत्संगेंविण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ।।२३।
नाना साधनें बापुडीं । सद्गुरुविण करिती वेडीं ।
गुरुकृपेविण कुडकुडीं । वेर्थचि होती ।।२४।
कार्तिकस्नानें माघस्नानें । व्रतें उद्यापनें दानें ।
गोरांजनें धूम्रपानें । साधिती पंचाग्नी ।।२५।
हरिकथा पुराणश्रवण । आदरें करिती निरूपण ।
सर्व तीर्थें परम कठिण । फिरती प्राणी ।।२६।
झळफळित देवतार्चनें । स्नानें संध्या दर्भासनें ।
टिळे माळा गोपीचंदने । ठसे श्रीमुद्रांचे ।।२७।
अर्घ्यपात्रें संपुष्ट गोकर्णें । मंत्रयंत्रांची तांब्रपर्णें ।
नाना प्रकारींचीं उपकर्णें । साहित्यशोभा ।।२८।
घंटा घणाघणा वाजती । स्तोत्रें स्तवनें आणि स्तुती ।
आसनें मुद्रा ध्यानें करिती । प्रदक्षणा नमस्कार ।।२९।
पंचायेत्न पूजा केली । मृत्तिकेचीं लिंगें लाखोली ।
बेले नारिकेळें भरिली । संपूर्ण सांग पूजा ।।३०।
उपोषणें निष्ठा नेम । परम सायासी केलें कर्म ।
फळचि पावती, वर्म । चुकले प्राणी ।।३१।
येज्ञादिकें कर्में केलीं । हृदईं फळाशा कल्पिली ।
आपले इछेनें घेतली । सूति जन्मांची ।।३२।
करूनि नाना सायास । केला चौदा विद्यांचा अभ्यास ।
रिद्धिसिद्धि सावकास । वोळल्या जरी ।।३३।

तरी सद्गुरुकृपेविरहित । सर्वथा न घडे स्वहित ।
येमपुरीचा अनर्थ । चुकेना येणें ।३४।

जंव नाहीं ज्ञानप्राप्ती । तंव चुकेना यातायाती ।
गुरुकृपेविण अधोगती । गर्भवास चुकेना ।३५।

ध्यान धारणा मुद्रा आसन । भक्ती भाव आणी भजन ।
सकळहि फोल, ब्रह्मज्ञान । जंव तें प्राप्त नाहीं ।३६।

सद्गुरुकृपा न जोडे । आणी भलतीच कडे वावडे ।
जैसें आंधळें चाचरोन पडे । गारीं आणि गडधरा ।३७।

जैसें नेत्रीं घालितां अंजन । पडे दृष्टीस निधान ।
तैसें सद्गुरुवचनें ज्ञान– । प्रकाश होये ।३८।

सद्गुरुविण जन्म निर्फळ । सद्गुरुविण दुःख सकळ ।
सद्गुरुविण तळमळ । जाणार नाहीं ।३९।

सद्गुरुचेनि अभयंकरें । प्रगट होईजे ईश्वरें ।
संसारदुःखें अपारें । नासोन जाती ।४०।

मागें जाले थोर थोर । संत महंत मुनेश्वर ।
तयांसहि ज्ञानविज्ञानविचार । सद्गुरुचेनी ।४१।

श्रीरामकृष्ण आदिकरूनी । अतितत्पर गुरुभजनीं ।
सिद्ध साधु आणी संतजनीं । गुरुदास्य केलें ।४२।

सकळ सृष्टीचे चाळक । हरिहरब्रह्मादिक ।
तेहि सद्गुरुपदीं रंक । महत्त्वा न चढेती ।४३।

असो जयासि मोक्ष व्हावा । तेणें सद्गुरु करावा ।
सद्गुरुविण मोक्ष पावावा । हें कल्पांती न घडे ।४४।

आतां सद्गुरु ते कैसे । नव्हेति इतरां गुरु ऐसे ।
जयांचे कृपेनें प्रकाशे । शुद्ध ज्ञान ।४५।

त्या सद्गुरूची वोळखण । पुढिले समासीं निरूपण ।
बोलिलें असे श्रोतीं श्रवण । अनुक्रमें करावें ।४६।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'गुरुनिश्चयनाम'
समास पहिला समाप्त.

❑❑

दशक ५ : समास २

गुरुलक्षण

॥ श्रीराम ॥

जे करामती दाखविती । ते हि गुरु म्हणिजेती ।
परंतु सद्गुरु नव्हेती । मोक्षदाते । १ ।

सभामोहन भुररीं चेटकें । साबरमंत्र कौटालें अनेकें ।
नाना चमत्कार कौतुकें । असंभाव्य सांगती । २ ।

सांगती औषधीप्रयोग । कां सुवर्णधातूचा मार्ग ।
दृष्टिबंधनें लागवेग । अभिळाषाचा । ३ ।

साहित संगीत रागज्ञान । गीत नृत्य तान मान ।
नाना वाद्यें सिकविती जन । तेहि येक गुरु । ४ ।

विद्या सिकविती पंचाक्षरी । ताडेतोडे नानापरी ।
कां पोट भरे जयावरी । ते विद्या सिकविती । ५ ।

यातीचा जो व्यापार । सिकविती भरावया उदर ।
तेहि गुरु परी साचार । सद्गुरु नव्हेती । ६ ।

आपली माता आणी पिता । तेहि गुरुचि तत्वतां ।
परी पैलपार पाविता । तो सद्गुरु वेगळा । ७ ।

गाईत्रीमंत्राचा उचारु । सांगे तो साचार कुळगुरु ।
परी ज्ञानेंविण पैलपारु । पाविजेत नाहीं ।८।
जो ब्रह्मज्ञान उपदेसी । अज्ञानअंधारें निरसी ।
जीवात्मयां परमात्मयांसी । ऐक्यता करी ।९।
विघडले देव आणी भक्त । जीवशिवपणें द्वैत ।
तया देवभक्तां येकांत । करी तो सद्गुरु ।१०।
भवव्याघ्रें घालूनि उडी । गोवत्सास तडातोडी ।
केली देखोनि सीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा ।११।
प्राणी मायाजाळीं पडिलें । संसारदुःखें दुःखवलें ।
ऐसें जेणें मुक्त केलें । तो सद्गुरु जाणावा ।१२।
वासनानदीमाहांपुरीं । प्राणी बुडतां ग्लांती करी ।
तेथें उडीं घालूनि तारी । तो सद्गुरु जाणावा ।१३।
गर्भवास अति सांकडी । इछाबंधनाची बेडी ।
ज्ञान देऊन सीघ्र सोडी । तो सद्गुरु स्वामी ।१४।
फोडूनि शब्दाचें अंतर । वस्तु दाखवि निजसार ।
तोचि गुरु माहेर । अनाथांचें ।१५।
जीव येकदेसी बापुडें । तयास ब्रह्मचि करी रोकडें ।
फेडी संसारसांकडें । वचनमात्रें ।१६।
जें वेदांचे अभ्यांतरीं । तें काढून अपत्यापरी ।
शिष्य श्रवणीं कवळ भरी । उद्गारवचनें ।१७।
वेद शास्त्र माहानुभाव । पाहातां येकचि अनुभव ।
तोचि येक गुरुराव । ऐक्यरूपें ।१८।
संदेह निःशेष जाळी । स्वधर्म आदरें प्रतिपाळी ।
वेदविरहित टवाळी । करूंच नेणे ।१९।

जें जें मन आंगिकारी । तें तें स्वयें मुक्त करी ।
तो गुरु नव्हे भिकारी । झडे आला ।२०।

शिष्यास न लविती साधन । न करविती इंद्रियेंदमन ।
ऐसे गुरु आडक्याचे तीन । मिळाले तरी त्यजावे ।२१।

जो कोणी ज्ञान बोधी । समूळ अविद्या छेदी ।
इंद्रियेंदमन प्रतिपादी । तो सद्गुरु जाणावा ।२२।

येक द्रव्याचे विकिले । येक शिष्याचे आखिले ।
अति दुराशेनें केले । दीनरूप ।२३।

जें जें रुचे शिष्यामनीं । तैसीच करी मनधरणी ।
ऐसी कामना पापिणी । पडली गळां ।२४।

जो गुरु भीडसारु । तो अद्धमाहून अद्धम थोरु ।
चोरटा मैंद पामरु । द्रव्यभोंदु ।२५।

जैसा वैद्य दुराचारी । केली सर्वस्वें बोहरी ।
आणी सेखी भीड करी । घातघेणा ।२६।

तैसा गुरु नसावा । जेणें अंतर पडे देवा ।
भीड करूनियां गोवा । घाली बंधनाचा ।२७।

जेथें शुद्ध ब्रह्मज्ञान । आणी स्थूळ क्रियेचें साधन ।
तोचि सद्गुरु निधान । दाखवी डोळां ।२८।

देखणें दाखविती आदरें । मंत्र फुंकती कर्णद्वारें ।
इतुकेंच ज्ञान तें पामरें । अंतरलीं भगवंता ।२९।

बाणे तिहींची खूण । तोचि गुरु सुलक्षण ।
तेथेंचि रिघावें शरण । अत्यादरें मुमुक्षें ।३०।

अद्वैत निरूपणें अगाध वक्ता । परी विषईं लोलंगता ।
ऐसिया गुरूचेनि सार्थकता । होणार नाहीं ।३१।

जैसा निरूपणसमयो । तैसेंचि मनहि करी वायो ।
कृतबुद्धीचा जयो । जालाच नाहीं ।३२।

निरूपणीं सामर्थ्य सिद्धी । श्रवण होतां दुराशा बाधी ।
नाना चमत्कारें बुद्धी । दंडळूं लागे ।३३।

पूर्वीं ज्ञाते विरक्त भक्त । तयांसि सादृश्य भगवंत ।
आणि सामर्थ्यहि अद्भुत । सिद्धीचेनि योगें ।३४।

ऐसें तयांचें सामर्थ्य । आमुचें ज्ञानचि नुसदें वेर्थ ।
ऐसा सामर्थ्याचा स्वार्थ । अंतरीं वसे ।३५।

निशेष दुराशा तुटे । तरीच भगवंत भेटे ।
दुराशा धरिती ते वोखटे । शब्दज्ञाते कामिक ।३६।

बहुत ज्ञातीं नागवलीं । कामनेनें वेडीं केलीं ।
कामना इच्छितांच मेलीं । बापुडीं मूर्खें ।३७।

निशेष कामनारहित । ऐसा तो विरुळा संत ।
अवघ्यां वेगळें मत । अक्षै ज्याचें ।३८।

अक्षै ठेवा सकळांचा । परी पांगडा फिटेना शरीराचा ।
तेणें मार्ग ईश्वराचा । चुकोनि जाती ।३९।

सिद्धि आणि सामर्थ्य जालें । सामर्थ्यें देहास महत्त्व आलें ।
तेणें बेंचाड बळकावलें । देहबुद्धीचें ।४०।

सांडूनि अक्षै सुख । सामर्थ्य इछिती ते मूर्ख ।
कामनेसारिखें दुःख । आणीक कांहींच नाहीं ।४१।

ईश्वरेंविण जे कामना । तेणेंचि गुणें नाना यातना ।
पावती होती पतना । वरपडे प्राणी ।४२।

होतां शरीरासी अंत । सामर्थ्यहि निघोन जात ।
सेखीं अंतरला भगवंत । कामनागुणें ।४३।

म्हणोनि निःकामताविचारु । दृढबुद्धीचा निर्धारु ।
तोचि सद्गुरु पैलपारु । पाववी भवाचा ।४४।

मुख्य सद्गुरूचें लक्षण । आधीं पाहिजे विमळ ज्ञान ।
निश्चयाचें समाधान । स्वरूपस्थिती ।४५।

याहिवरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदास केवळ ।
विशेष आचारें निर्मळ । स्वधर्मविषईं ।४६।

याहिवरी अध्यात्मश्रवण । हरिकथानिरूपण ।
जेथे परमार्थविवरण । निरंतर ।४७।

जेथें सारासारविचार । तेथें होये जगोद्धार ।
नवविधा भक्तीचा आधार । बहुत जनासी ।४८।

म्हणोनि नवविधा भजन । जेथें प्रतिष्ठलें साधन ।
हें सद्गुरूचें लक्षण । श्रोतीं वोळखावें ।४९।

अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजन ।
तेथें बहु भक्त जन । विश्रांति पावती ।५०।

नाहीं उपासनेचा आधार । तो परमार्थ निराधार ।
कर्मेविण अनाचार । भ्रष्ट होती ।५१।

म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्मकर्म आणि साधन ।
कथा निरूपण श्रवण मनन । नीति न्याये मर्यादा ।५२।

यामधें येक उणें असे । तेणें तें विलक्षण दिसे ।
म्हणौन सर्व हि विलसे । सद्गुरुपासीं ।५३।

तो बहुतांचें पाळणकर्ता । त्यास बहुतांची असे चिंता ।
नाना साधनें समर्था । सद्गुरुपासीं ।५४।

साधनेंविण परमार्थ प्रतिष्ठे । तो मागुतां सवेंच भ्रष्टे ।
याकारणें दुरीद्रष्टे । माहानुभाव ।५५।

आचार उपासना सोडिती । ते भ्रष्ट अभक्त दिसती ।
जळो तयांची महंती । कोण पुसे ।५६।

कर्म उपासनेचा अभाव । तेथें भकाधेसि जाला ठाव ।
तो कानकोंडा समुदाव । प्रपंची हांसती ।५७।

नीच यातीचा गुरु । तोहि कानकोंडा विचारु ।
ब्रह्मसभेस जैसा चोरु । तैसा दडे ।५८।

ब्रह्मसभे देखतां । त्याचे तीर्थ नये घेतां ।
अथवा प्रसाद सेवितां । प्राश्चित पडे ।५९।

तीर्थप्रसादाची सांडी केली । तेथें नीचता दिसोन आली ।
गुरुभक्ति ते सटवली । येकायेकी ।६०।

गुरूची मर्यादा राखतां । ब्राह्मण क्षोभती तत्वतां ।
तेथें ब्राह्मण्य रक्षूं जाता । गुरुक्षोभ घडे ।६१।

ऐसीं सांकडीं दोहींकडे । तेथें प्रस्तावा घडे ।
नीच यातीस गुरुत्व न घडे । याकारणें ।६२।

तथापि आवडी घेतली जीवें । तरी आपणचि भ्रष्टावें ।
बहुत जनांसी भ्रष्टवावें । हें तों दूषणचि कीं ।६३।

आतां असो हा विचारु । स्वयातीचा पाहिजे गुरु ।
नाहीं तरी भ्रष्टाकारु । नेमस्त घडे ।६४।

जे जे कांहीं उत्तम गुण । तें तें सद्गुरूचें लक्षण ।
तथापि सांगों वोळखण । होये जेणें ।६५।

येक गुरु येक मंत्रगुरु । येक यंत्रगुरु येक तांत्रगुरु ।
येक वस्तादगुरु येक राजगुरु । म्हणती जनीं ।६६।

येक कुळगुरु येक मानिला गुरु । येक विद्यागुरु येक कुविद्यागुरु ।
येक असद्गुरु येक यातिगुरु । दंडकर्ते ।६७।

येक मातागुरु येक पितागुरु । येक राजागुरु येक देवगुरु ।
येक बोलिजे जगद्गुरु । सकळकळा ।६८।

ऐसे हे सत्रा गुरु । याहिवेगळे आणीक गुरु ।
ऐक तयांचा विचारु । सांगिजेल ।६९।

येक स्वप्नगुरु येक दीक्षागुरु । येक म्हणती प्रतिमागुरु ।
येक म्हणती स्वयें गुरु । आपला आपण ।७०।

जे जे यातीचा जो व्यापारु । ते ते त्याचे तितुके गुरु ।
याचा पाहातां विचारु । उदंड आहे ।७१।

असो ऐसे उदंड गुरु । नाना मतांचा विचारु ।
परी जो मोक्षदाता सद्गुरु । तो वेगळाचि असे ।७२।

नाना सद्विद्येचे गुण । याहिवरी कृपाळूपण ।
हें सद्गुरूचें लक्षण । जाणिजे श्रोतीं ।७३।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'गुरुलक्षणनाम'
समास दुसरा समाप्त.

❑❑

दशक ५ : समास ३

शिष्य लक्षण

॥ श्रीराम ॥

मागां सद्गुरूचें लक्षण । विशद केलें निरूपण ।
आतां सच्छिष्याची वोळखण । सावध ऐका । १ ।

सद्गुरुविण सच्छिष्य । तो वायां जाय निशेष ।
कां सच्छिष्यांविण विशेष । सद्गुरु सिणे । २ ।

उत्तम भूमि शोधिली शुद्ध । तेथें बीज पेरिलें किडखाद ।
कां तें उत्तम बीज परि संमंध । खडकेंसि पडिला । ३ ।

तैसा सच्छिष्य तें सत्पात्र । परंतु गुरु सांगे मंत्र तंत्र ।
तेथें अरत्र ना परत्र । कांहींच नाहीं । ४ ।

अथवा गुरु पूर्ण कृपा करी । परी शिष्य अनाधिकारी ।
भाग्यपुरुषाचा भिकारी । पुत्र जैसा । ५ ।

तैसें येकाविण येक । होत असे निरार्थक ।
परलोकीचें सार्थक । तें दुर्‍हावे । ६ ।

म्हणौनि सद्गुरु आणी सच्छिष्य । तेथें न लगती सायास ।
त्यां उभयतांचा हव्यास । पुरे येकसरा । ७ ।

सुभूमि आणी उत्तम कण । उगवेना प्रजन्येंविण ।
तैसें अध्यात्मनिरूपण । नस्तां होये । ८ ।

सेत पेरिलें आणी उगवलें । परंतु निगेविण गेलें ।
साधनेंविण तैसें जालें । साधकांसी । ९ ।

जंवरी पीक आपणास भोगे । तंवरी अवघेंचि करणें लागे ।
पीक आलियां हि उगें । राहोचि नये ।१०।

तैसें आत्मज्ञान जालें । परी साधन पाहिजे केलें ।
येक वेळ उदंड जेविलें । तर्‍हीं सामग्री पाहिजे ।११।

म्हणौन साधन अभ्यास आणी सद्गुरु । सच्छिष्य आणी सच्छास्त्रविचारु ।
सत्कर्म सद्वासना पारु । पाववी भवाचा ।१२।

सदुपासना सत्कर्म । सत्क्रिया आणी स्वधर्म ।
सत्संग आणी नित्य नेम । निरंतर ।१३।

ऐसें हें अवघेंचि मिळे । तरी च विमळ ज्ञान निवळे ।
नाहीं तरी पाषांड संचरे बळें । समुदाईं ।१४।

येथे शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरुपासीं ।
सद्गुरु पालटी अवगुणासी । नाना येतेकरूनी ।१५।

सद्गुरुचेनि असच्छिष्य पालटे । परंतु सच्छिष्यें असद्गुरु न पालटे ।
कां जें थोरपण तुटे । म्हणौनिया ।१६।

याकारणें सद्गुरु पाहिजे । तरीच सन्मार्ग लाहिजे ।
नाहीं तरी होईजे । पाषांडा वरपडे ।१७।

येथें सद्गुरुचि कारण । येर सर्व निःकारण ।
तथापि सांगों वोळखण । सच्छिष्याची ।१८।

मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण ।
अनन्यभावें शरण । त्या नांव सच्छिष्य ।१९।

शिष्य पाहिजे निर्मळ । शिष्य पाहिजे आचारसीळ ।
शिष्य पाहिजे केवळ । विरक्त अनुतापी ।२०।

शिष्य पाहिजे निष्ठावंत । शिष्य पाहिजे सुचिष्मंत ।
शिष्य पाहिजे नेमस्त । सर्वप्रकारीं ।२१।

शिष्य पाहिजे साक्षपी विशेष । शिष्य पाहिजे परम दक्ष ।
शिष्य पाहिजे अलक्ष । लक्षी ऐसा ।२२।

शिष्य पाहिजे अति धीर । शिष्य पाहिजे अति उदार ।
शिष्य पाहिजे अति तत्पर । परमार्थविषईं ।२३।

शिष्य पाहिजे परोपकारी । शिष्य पाहिजे निर्मत्सरी ।
शिष्य पाहिजे अर्थांतरीं । प्रवेशकर्ता ।२४।

शिष्य पाहिजे परम शुद्ध । शिष्य पाहिजे परम सावध ।
शिष्य पाहिजे अगाध । उत्तम गुणाचा ।२५।

शिष्य पाहिजे प्रज्ञावंत । शिष्य पाहिजे प्रेमळ भक्त ।
शिष्य पाहिजे नीतिवंत । मर्यादेचा ।२६।

शिष्य पाहिजे युक्तिवंत । शिष्य पाहिजे बुद्धिवंत ।
शिष्य पाहिजे संतासंत । विचार घेता ।२७।

शिष्य पाहिजे धारिष्टाचा । शिष्य पाहिजे दृढ व्रताचा ।
शिष्य पाहिजे उत्तम कुळीचा । पुण्यसीळ ।२८।

शिष्य असावा सात्विक । शिष्य असावा भजक ।
शिष्य असावा साधक । साधनकर्ता ।२९।

शिष्य असावा विश्वासी । शिष्य असावा कायाक्लेशी ।
शिष्य असावा परमार्थासी । वाढऊं जाणे ।३०।

शिष्य असावा स्वतंत्र । शिष्य असावा जगमित्र ।
शिष्य असावा सत्पात्र । सर्व गुणें ।३१।

शिष्य असावा सद्विद्येचा । शिष्य असावा सद्भावाचा ।
शिष्य असावा अंतरींचा । परम शुद्ध ।३२।

शिष्य नसावा अविवेकी । शिष्य नसावा गर्भसुखी ।
शिष्य असावा संसारदुःखी । संतप्तदेही ।३३।

जो संसारदुःखे दुःखावला । जो त्रिविधतापें पोळला ।
तोचि अधिकारी जाला । परमार्थाविषीं ।३४।

बहु दुःख भोगिलें जेणें । तयासीच परमार्थ बाणे ।
संसारदुःखाचेनि गुणें । वैराग्य उपजे ।३५।

जया संसाराचा त्रास । तयासीच उपजे विश्वास ।
विस्वासबळें दृढ कास । धरिली सद्गुरुची ।३६।

अविस्वासें कास सोडिली । ऐंसी बहुतेक भवीं बुडालीं ।
नाना जळचरीं तोडिलीं । मध्येंचि सुखदुःखें ।३७।

याकारणें दृढ विस्वास । तोचि जाणावा सच्छिष्य ।
मोक्षाधिकारी विशेष । आग्रगण्यु ।३८।

जो सद्गुरुवचनें निवाला । तो सायोज्यतेचा आंखिला ।
संसारपांगें पांगिला । न वचे कदा ।३९।

सद्गुरुहून देव मोठा । जयास वाटे तो करंटा ।
सुटला वैभवाचा फांटा । सामर्थ्यपिसें ।४०।

सद्गुरुस्वरूप तें संत । आणी देवांस मांडेल कल्पान्त ।
तेथे कैंचे उरेल सामर्थ्य । हरिहरांचें ।४१।

म्हणौन सद्गुरुसामर्थ्य आधीक । जेथें आटती ब्रह्मादिक ।
अल्पबुद्धी मानवी रंक । तयांसि हें कळेना ।४२।

गुरुदेवास बराबरी । करी तो शिष्य दुराचारी ।
भ्रांति बैसली अभ्यांतरीं । सिद्धांत नेणवे ।४३।

देव मनुषीं भाविला । मंत्रीं देवपणासी आला ।
सद्गुरु न वचे कल्पिला । ईश्वराचेनि ।४४।

म्हणोनि सद्गुरु पूर्णपणें । देवाहून आधीक कोटिगुणें ।
जयासि वर्णितां भांडणें । वेदशास्त्रीं लागलीं ।४५।

असो सद्गुरुपदापुढें । दुजें कांहींच न चढे ।
देवसामर्थ्य तें केवढें । मायाजनित ।४६।

अहो सद्गुरुकृपा जयासी । सामर्थ्य न चले तयापासीं ।
ज्ञानबळें वैभवासी । तृणतुछ केलें ।४७।

सद्गुरुकृपेचेनि बळें । अपरोक्षज्ञानाचेनि उसाळें ।
मायेसहित ब्रह्मांड सगळें । दृष्टीस न ये ।४८।

ऐसें सच्छिष्याचें वैभव । सद्गुरुवचनीं दृढ भाव ।
तेणें गुणें देवराव । स्वयेंचि होती ।४९।

अंतरीं अनुतापें तापले । तेणें अंतर शुद्ध जालें ।
पुढें सद्गुरुवचनें निवाले । सच्छिष्य ऐसे ।५०।

लागतां सद्गुरुवचनपंथें । जालें ब्रह्मांड पालथें ।
तरी जयाच्या शुद्ध भावार्थें । पालट न धरिजे ।५१।

शरण सद्गुरूस गेले । सच्छिष्य ऐसे निवडले ।
क्रियापालटें जाले । पावन ईश्वरीं ।५२।

ऐसा सद्भाव अंतरीं । तेचि मुक्तीचे वाटेकरी ।
येर माईक वेषधारी । असच्छिष्य ।५३।

वाटे विषयांचें सुख । परमार्थ संपादणें लौकिक ।
देखोवेखीं पढतमूर्ख । शरण गेले ।५४।

जाली विषईं वृत्ति अनावर । दृढ धरिला संसार ।
परमार्थचर्चेचा विचार । मळिण जाला ।५५।

मोड घेतला परमार्थाचा । हव्यास धरिला प्रपंचाचा ।
भार वाहिला कुटुंबाचा । काबाडी जाला ।५६।

मानिला प्रपंचीं आनंद । केला परमार्थें विनोद ।
भ्रांत मूढ मतिमंद । लोधला कामीं ।५७।

सूकर पूजिलें विलेपनें । म्हैसा मर्दिला चंदनें ।
तैसा विषई ब्रह्मज्ञानें । विवेकें बोधिला ।५८।

रासभ उकरडां लोळे । तयासि परिमळसोहळे ।
उलूक अंधारीं पळे । तया केवी हंसपंगती ।५९।

तैसा विषयदारींचा बराडी । घाली अधःपतनीं उडी ।
तयास भगवंत आवडी । सत्संग कैंचा ।६०।

वर्ती करून दांताळीं । स्वानपुत्र हाडें चगळी ।
तैसा विषई तळमळी । विषयसुखाकारणें ।६१।

तया स्वानमुखीं परमान्न । कीं मर्कटास सिंहासन ।
तैसें विषयशक्तां ज्ञान । जिरेल कैचें ।६२।

रासभें राखतां जन्म गेला । तो पंडितांमध्ये प्रतिष्ठिला ।
न वचे तैसा आशक्ताला । परमार्थ नाहीं ।६३।

मिळाला राजहंसांचा मेळा । तेथें आला डोंबकावळा ।
लक्षून विष्ठेचा गोळा । हंस म्हणवी ।६४।

तैसे सज्जनांचे संगती । विषई सज्जन म्हणविती ।
विषय आमेद्य चित्तीं । गोळा लक्षिला ।६५।

काखे घेऊनियां दारा । म्हणे मज संन्यासी करा ।
तैसा विषई सैरावैरा । ज्ञान बडबडी ।६६।

असो ऐसे पढतमूर्ख । ते काय जाणती अद्वैतसुख ।
नारकी प्राणी नर्क । भोगती स्वइच्छा ।६७।

वैषेची करील सेवा । तो कैसा मंत्री म्हणावा ।
तैसा विषयदास मानावा । भक्तराज केवी ।६८।

तैसे विषई बापुडे । त्यांस ज्ञान कोणीकडे ।
वाचाळ शाब्दिक बडबडे । वरपडे जाले ।६९।

ऐसे शिष्य परमनष्ट । कनिष्ठांमध्यें कनिष्ठ ।
हीन अविवेकी आणी दृष्ट । खळ खोटे दुर्जन ।७०।

ऐसे जे पापरूप । दीर्घदोषी वज्रलेप ।
तयांस प्राश्नीत अनुताप । उद्भवतां आहे ।७१।

तेंहि पुन्हां शरण जावें । सद्गुरूस संतोषवावें ।
कृपादृष्टी जालियां व्हावें । पुन्हां शुद्ध ।७२।

स्वामीद्रोह जया घडे । तो यावश्चंद्र नरकीं पडे ।
तयास उपावचि न घडे । स्वामी तुष्टल्यावांचुनी ।७३।

स्मशानवैराग्य आलें । म्हणोन लोटांगण घातलें ।
तेणें गुणें उपतिष्ठलें । नाहीं ज्ञान ।७४।

भाव आणिला जायाचा । मंत्र घेतला गुरूचा ।
शिष्य जाला दो दिसांचा । मंत्राकारणें ।७५।

ऐसे केले गुरु उदंड । शब्द सिकला पाषांड ।
जाला तोंडाळ तर्मुंड । माहापाषांडी ।७६।

घडी येक रडे आणी पडे । घडी येक वैराग्य चढे ।
घडी येक अहंभाव जडे । ज्ञातेपणाचा ।७७।

घडी येक विस्वास धरी । सवेंच घडी येक गुर्गुरी ।
ऐसे नाना छंद करी । पिसाट जैसा ।७८।

काम क्रोध मद मत्सर । लोभ मोह नाना विकार ।
अभिमान कापट्य तिरस्कार । हृदई नांदती ।७९।

अहंकार आणी देहपांग । अनाचार आणी विषयसंग ।
संसार प्रपंच उद्वेग । अंतरीं वसे ।८०।

दीर्घसूत्री कृतघ्न पापी । कुकर्मी कुतर्की विकल्पी ।
अभक्त अभाव सीघ्रकोपी । निष्ठुर परघातक ।८१।

हृदयेंसुन्य आणी आळसी । अविवेकी आणी अविस्वासी ।
अधीर अविचार संदेहासी । दृढ धर्ता ।८२।

आशा ममता तृष्णा कल्पना । कुबुद्धी दुर्वृत्ति दुर्वासना ।
अल्पबुद्धि विषयकामना । हृदई वसे ।८३।

ईषणा असूया तिरस्कारें । निंदेस प्रवर्ते आदरें ।
देहाभिमानें हुंबरे । जाणपणें ।८४।

क्षुधा तृष्णा आवरेना । निद्रा सहसा धरेना ।
कुटुंबचिंता वोसरेना । भ्रांति पडिली ।८५।

शाब्दिक बोले उदंड वाचा । लेश नाहीं वैराग्याचा ।
अनुताप धारिष्ट साधनाचा । मार्ग न धरी ।८६।

भक्ति विरक्ति ना शांती । सद्वृत्ति लीनता ना दांती ।
कृपा दया ना तृप्ती । सुबुद्धि असेच ना ।८७।

कायाक्लेसीं शेरीरहीन । धर्मविषईं परम कृपण ।
क्रिया पालटेना कठिण । हृदय जयाचें ।८८।

आर्जव नाहीं जनासी । जो अप्रिये सज्जनासी ।
जयाचे जिवीं आहिर्णेसीं । परन्यून वसे ।८९।

सदा सर्वकाळ लटिका । बोले माईक लापणिका ।
क्रिया विचार पाहातां येका । वचनीं सत्य नाहीं ।९०।

परपीडेविषईं तत्पर । जैसें विंचु आणि विखार ।
तैसा कुशब्दें जिव्हार । भेदी सकळांचें ।९१।

आपले झांकी अवगुण । पुढिलांस बोले कठिण ।
मिथ्या गुणदोषेंविण । गुणदोष लावी ।९२।

स्वयें पापात्मा अंतरीं । पुढिलांचि कणव न करी ।
जैसा हिंसक दुराचारी । परदुःखें शिणेना ।९३।

दुःख पराव्याचे नेणती । दुर्जन गांजिलेची गांजिती ।
श्रम पावतां आनंदती । आपुले मनीं ।९४।

स्वदुःखें झुरे अंतरीं । आणी परदुःखें हास्य करी ।
तयास प्राप्त येमपुरी । राजदूत ताडिती ।९५।

असो ऐसें मदांध बापुडें । तयांसि भगवंत कैंचा जोडे ।
जयांस सुबुद्धि नावडे । पूर्वपातकेंकरूनी ।९६।

तयास देहाचा अंतीं । गात्रें क्षीणता पावती ।
जिवलगें वोसंडिती । जाणवेल तेव्हां ।९७।

असो ऐसे गुणावेगळे । ते सच्छिष्य आगळे ।
दृढ भावार्थें सोहळे । भोगिती स्वानंदाचे ।९८।

जये स्थळीं विकल्प जागे । कुळाभिमान पाठीं लागे ।
ते प्राणी प्रपंचसंगें । हिंपुटी होती ।९९।

जेणेंकरितां दुःख जालें । तेंचि मनीं दृढ धरिलें ।
तेणें गुणें प्राप्त जालें । पुन्हां दुःख ।१००।

संसारसंगें सुख जालें । ऐसें देखिलें ना ऐकिलें ।
ऐसें जाणोन अनहित केलें । ते दुःखी होती स्वयें ।१०१।

संसारीं सुख मानिती । ते प्राणी मूढमती ।
जाणोन डोळे झांकिती । पढतमूर्ख ।१०२।

प्रपंच सुखें करावा । परी कांहीं परमार्थ वाढवावा ।
परमार्थ अवघाचि बुडवावा । हें विहित नव्हे ।१०३।

मागां जालें निरूपण । गुरुशिष्यांची वोळखण ।
आतां उपदेशाचें लक्षण । सांगिजेल ।१०४।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'शिष्यलक्षणनाम'
समास तिसरा समाप्त.

❑❑

दशक ५ : समास ४

उपदेशलक्षण

॥ श्रीराम ॥

ऐका उपदेशाचीं लक्षणें । बहुविधें कोण कोणें ।
सांगतां तें असाधारणें । परी कांही येक सांगों ।१।

बहुत मंत्र उपदेशिती । कोणी नाम मात्र सांगती ।
येक ते जप करविती । वोंकाराचा ।२।

शिवमंत्र भवानीमंत्र । विष्णुमंत्र माहालक्ष्मीमंत्र ।
अवधूतमंत्र गणेशमंत्र । मार्तंडमंत्र सांगती । ३ ।

मछकूर्मवऱ्हावमंत्र । नृसिंहमंत्र वामनमंत्र ।
भार्गवमंत्र रघुनाथमंत्र । कृष्णमंत्र सांगती । ४ ।

भैरवमंत्र मल्लारिमंत्र । हनुमंतमंत्र येक्षिणीमंत्र ।
नारायेणमंत्र पांडुरंगमंत्र । अघोरमंत्र सांगती । ५ ।

शेषमंत्र गरुडमंत्र । वायोमंत्र वेताळमंत्र ।
झोटिंगमंत्र बहुधा मंत्र । किती म्हणौनि सांगावे । ६ ।

बाळामंत्र बगुळामंत्र । काळिमंत्र कंकाळिमंत्र ।
बटुकमंत्र नाना मंत्र । नाना शक्तींचे । ७ ।

पृथकाकारें स्वतंत्र । जितुके देव तितुके मंत्र ।
सोपे अवघड विचित्र । खेचर दारुण बीजाचे । ८ ।

पाहों जातां पृथ्वीवरी । देवांची गणना कोण करी ।
तितुके मंत्र वैखरी । किती म्हणौन वदवावी । ९ ।

असंख्यात मंत्रमाळा । येकाहूनि येक आगळा ।
विचित्र मायेची कळा । कोण जाणे ।१०।

कित्येक मंत्रीं भूतें जाती । कित्येक मंत्रीं वेथा नासती ।
कित्येक मंत्रीं उतरती । सितें विंचू विखार ।११।

ऐसे नाना परीचे मंत्री । उपदेशिती कर्णपात्रीं ।
जप ध्यान पूजा यंत्री । विधानयुक्त सांगती ।१२।

येक शिव शिव सांगती । येक हरि हरि म्हणविती ।
येक उपदेशिती । विठल विठल म्हणोनि ।१३।

येक सांगती कृष्ण कृष्ण । येक सांगती विष्ण विष्ण ।
येक नारायण नारायण । म्हणौन उपदेशिती ।१४।

येक म्हणती अच्युत अच्युत । येक म्हणती अनंत अनंत ।
येक सांगती दत्त दत्त । म्हणत जावें ।१५।

येक सांगती राम राम । येक सांगती ॐ ॐ म ।
येक म्हणती मेघशाम । बहुतां नामीं स्मरावा ।१६।

येक सांगती गुरु गुरु । येक म्हणती परमेश्वरु ।
येक म्हणती विघ्नहरु । चिंतीत जावा ।१७।

येक सांगती शामराज । येक सांगती गरुडध्वज ।
येक सांगती अधोक्षज । म्हणत जावें ।१८।

येक सांगती देव देव । येक म्हणती केशव केशव ।
येक म्हणती भार्गव भार्गव । म्हणत जावें ।१९।

येक विश्वनाथ म्हणविती । येक मल्लारि सांगती ।
येक ते जप करविती । तुकाई तुकाई म्हणौनी ।२०।

हें किती म्हणौनि सांगावें । शिवशक्तीचीं अनंत नांवें ।
इछेसारिखीं स्वभावें । उपदेशिती ।२१।

येक सांगती मुद्रा च्यारी । खेचरी भूचरी चाचरी अगोचरी ।
येक आसनें परोपरी । उपदेशिती ।२२।

येक दाखविती देखणी । येक अनुहातध्वनी ।
येक गुरु पिंडज्ञानी । पिंडज्ञान सांगती ।२३।

येक सांगती कर्ममार्ग । येक उपासना मार्ग ।
येक सांगती अष्टांग योग । नाना चक्रें ।२४।

येक तपें सांगती । येक अजपा निरोपिती ।
येक तत्वें विस्तारिती । तत्वज्ञानी ।२५।

येक सांगती सगुण । येक निरोपिती निर्गुण ।
येक उपदेशिती तीर्थाटण । फिरावें म्हणूनी ।।२६।।
येक माहावाक्यें सांगती । त्यांचा जप करावा म्हणती ।
येक उपदेश करिती । सर्व ब्रह्म म्हणोनी ।।२७।।
येक शाक्तमार्ग सांगती । येक मुक्तमार्ग प्रतिष्ठिती ।
येक इंद्रियें पूजन करविती । येका भावें ।।२८।।
येक सांगती वशीकर्ण । स्तंबन मोहन उच्चाटण ।
नाना चेटकें आपण । स्वयें निरोपिती ।।२९।।
ऐसी उपदेशांची स्थिती । पुरे आतां सांगों किती ।
ऐसे हे उपदेश असती । असंख्यात ।।३०।।
ऐसे उपदेश अनेक । परी ज्ञानेंविण निरार्थक ।
येविषईं असे येक । भगवद्वचन ।।३१।।

नानाशास्त्रं पठेल्लोको नानादैवतपूजनम् ।
आत्मज्ञानं विना पार्थ सर्वकर्म निरर्थकम् ।।
शैवशाक्तागमाद्या ये अन्ये च बहवो मता: ।
अपभ्रंशसमास्तेऽपि जीवानां भ्रांतचेतसाम् ।।
न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिदमुत्तमम् ।

याकारणें ज्ञानासमान । पवित्र उत्तम न दिसे अन्य ।
म्हणौन आधीं आत्मज्ञान । साधिलें पाहिजे ।।३२।।
सकळ उपदेशीं विशेष । आत्मज्ञानाचा उपदेश ।
येविषईं जगदीश । बहुतां ठाईं बोलिला ।।३३।।

यस्य कस्य च वर्णस्य ज्ञानं देहे प्रतिष्ठितम् ।
तस्य दासस्य दासोऽहं भवे जन्मनि जन्मनि ॥

आत्मज्ञानाचा महिमा । नेणे चतुर्मुख ब्रह्मा ।
प्राणी बापुडा जीवात्मा । काये जाणे ।३४।

सकळ तीर्थांची संगती । स्नानदानाची फळश्रुती ।
त्याहूनि ज्ञानाची स्थिती । विशेष कोटिगुणें ।३५।

पृथिव्यां यानि तीर्थानि स्नानदानेषु यत्फलम् ।
तत्फलं कोटिगुणितं ब्रह्मज्ञानसमोपमम् ॥

म्हणौनि जें आत्मज्ञान । तें गहनाहूनि गहन ।
ऐक तयाचें लक्षण । सांगिजेल ।३६।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'उपदेशलक्षणनाम'
समास चौथा समाप्त.

❑❑

दशक ५ : समास ५

बहुधाज्ञान

॥ श्रीराम ॥

जंव तें ज्ञान नाहीं प्रांजळ । तंव सर्व कांहीं निर्फळ ।
ज्ञानरहित तळमळ । जाणार नाहीं । १ ।

ज्ञान म्हणतां वाटे भरम । काये रे बा असेल वर्म ।
म्हणोनि हा अनुक्रम । सांगिजेल आतां । २ ।

भूत भविष्य वर्तमान । ठाउकें आहे परिछिन्न ।
यासीहि म्हणिजेत ज्ञान । परी तें ज्ञान नव्हे । ३ ।

बहुत केलें विद्यापठण । संगीतशास्त्र रागज्ञान ।
वैदिक शास्त्र वेदाध्येन । हेंहि ज्ञान नव्हे । ४ ।

नाना वेवसायाचें ज्ञान । नाना दीक्षेचें ज्ञान ।
नाना परीक्षेचें ज्ञान । हें ज्ञान नव्हे । ५ ।

नाना वनितांची परीक्षा । नाना मनुष्यांची परीक्षा ।
नाना नरांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे । ६ ।

नाना अश्वांची परीक्षा । नाना गजांची परीक्षा ।
नाना स्वापदांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे । ७ ।

नाना पशूंची परीक्षा । नाना पक्षांची परीक्षा ।
नाना भूतांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे । ८ ।

नाना यानांची परीक्षा । नाना वस्त्रांची परीक्षा ।
नाना शस्त्रांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे । ९ ।

नाना धातूंची परीक्षा । नाना नाण्यांची परीक्षा ।
नाना रत्नांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।१०।

नाना पाषाण परीक्षा । नाना काष्ठांची परीक्षा ।
नाना वाद्यांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।११।

नाना भूमींची परीक्षा । नाना जळांची परीक्षा ।
नाना सतेज परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।१२।

नाना रसांची परीक्षा । नाना बीजांची परीक्षा ।
नाना अंकुरपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ।१३।

नाना पुष्पांची परीक्षा । नाना फळांची परीक्षा ।
नाना वल्लींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।१४।

नाना दुःखांची परीक्षा । नाना रोगांची परीक्षा ।
नाना चिन्हांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।१५।

नाना मंत्रांची परीक्षा । नाना यंत्रांची परीक्षा ।
नाना मूर्तींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।१६।

नाना क्षत्रांची परीक्षा । नाना गृहांची परीक्षा ।
नाना पात्रांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।१७।

नाना होणार परीक्षा । नाना समयांची परीक्षा ।
नाना तर्कांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।१८।

नाना अनुमान परीक्षा । नाना नेमस्त परीक्षा ।
नाना प्रकार परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।१९।

नाना विद्येची परीक्षा । नाना कळेची परीक्षा ।
नाना चातुर्यपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ।२०।

नाना शब्दांची परीक्षा । नाना अर्थांची परीक्षा ।
नाना भाषांची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।२१।

नाना स्वरांची परीक्षा । नाना वर्णांची परीक्षा ।
नाना लेखनपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ।२२।

नाना मतांची परीक्षा । नाना ज्ञानांची परीक्षा ।
नाना वृत्तींची परीक्षा । हें ज्ञान नव्हे ।२३।

नाना रूपांची परीक्षा । नाना रसनेची परीक्षा ।
नाना सुगंधपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ।२४।

नाना सृष्टींची परीक्षा । नाना विस्तारपरीक्षा ।
नाना पदार्थपरीक्षा । हें ज्ञान नव्हे ।२५।

नेमकचि बोलणें । तत्काळचि प्रतिवचन देणें ।
सीघ्रचि कवित्व करणें । हें ज्ञान नव्हे ।२६।

नेत्रपालवी नादकळा । करपालवी भेदकळा ।
स्वरपालवी संकेतकळा । हें ज्ञान नव्हे ।२७।

काव्यकुशळ संगीतकळा । गीत प्रबंद नृत्यकळा ।
सभाच्यातुर्य शब्दकळा । हें ज्ञान नव्हे ।२८।

वाग्विळास मोहनकळा । रम्य रसाळ गायनकळा ।
हास्य विनोद कामकळा । हें ज्ञान नव्हे ।२९।

नाना लाघवें चित्रकळा । नाना वाद्यें संगीतकळा ।
नाना प्रकारें विचित्र कळा । हें ज्ञान नव्हे ।३०।

आदिकरूनि चौसष्टि कळा । याहिवेगळ्या नाना कळा ।
चौदा विद्या सिद्धि सकळा । हें ज्ञान नव्हे ।३१।

असो सकळ कळाप्रवीण । विद्यामात्र परिपूर्ण ।
तरी ते कौशल्यता, परी ज्ञान । म्हणों चि नये ।३२।

हें ज्ञान होयेसें भासे । परंतु मुख्य ज्ञान तें अनारिसें ।
जेथें प्रकृतीचें पिसें । समूळ वाव ।३३।

जाणावें दुसऱ्याचें जीवीचें । हें ज्ञान वाटे साचें ।
परंतु हें आत्मज्ञानाचें । लक्षण नव्हे ।३४।

माहानुभाव माहाभला । मानसपूजा करितां चुकला ।
कोणी येकें पाचारिला । ऐसें नव्हे म्हणोनी ।३५।

ऐसी जाणे अंतरस्थिती । तयासि परम ज्ञाता म्हणती ।
परंतु जेणें मोक्षप्राप्ती । तें हें ज्ञान नव्हे ।३६।

बहुत प्रकारींचीं ज्ञानें । सांगों जातां असाधारणें ।
सायोज्यप्राप्ती होये जेणें । तें ज्ञान वेगळें ।३७।

तरी तें कैसें आहे ज्ञान । समाधानाचें लक्षण ।
ऐसें हें विशद करून । मज निरोपावें ।३८।

ऐसें शुद्ध ज्ञान पुसिलें । तें पुढिले समासीं निरोपिलें ।
श्रोतां अवधान दिधलें । पाहिजे पुढें ।३९।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'बहुधाज्ञाननाम'
समास पाचवा समाप्त.

❑❑

दशक ५ : समास ६

शुद्धज्ञान

॥ श्रीराम ॥

ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान ।
पाहावें आपणासि आपण । या नांव ज्ञान । १ ।

मुख्य देवास जाणावें । सत्य स्वरूप वोळखावें ।
नित्यानित्य विचारावें । या नांव ज्ञान । २ ।

जेथें दृश्य प्रकृति सरे । पंचभूतिक वोसरे ।
समूळ द्वैत निवारे । या नांव ज्ञान । ३ ।

मनबुद्धि अगोचर । न चले तर्काचा विचार ।
उल्लेख परेहूनि पर । या नांव ज्ञान । ४ ।

जेथें नाही दृश्यभान । जेथें जाणीव हें अज्ञान ।
विमळ शुद्ध स्वरूपज्ञान । यासि बोलिजे । ५ ।

सर्वसाक्षी अवस्ता तुर्या । ज्ञान ऐसें म्हणती तया ।
परी तें जाणिजे वायां । पदार्थज्ञान । ६ ।

दृश्य पदार्थ जाणिजे । त्यास पदार्थज्ञान बोलिजे ।
शुद्ध स्वरूप जाणिजे । या नांव स्वरूपज्ञान । ७ ।

जेथें सर्वचि नाहीं ठाईंचें । तेथें सर्वसाक्षत्व कैंचें ।
म्हणौनि शुद्ध ज्ञान तुर्येचें । मानूंचि नये ।८।

ज्ञान म्हणिजे अद्वैत । तुर्या प्रत्यक्ष द्वैत ।
म्हणौनि शुद्ध ज्ञान ते सतंत । वेगळेंचि असे ।९।

ऐक शुद्ध ज्ञानाचें लक्षण । शुद्ध स्वरूपचि आपण ।
या नांव शुद्ध स्वरूपज्ञान । जाणिजे श्रोतीं ।१०।

माहावाक्य उपदेश भला । परी त्याचा जप नाहीं बोलिला ।
तेथीचा तो विचारचि केला । पाहिजे साधकें ।११।

माहावाक्यउपदेश सार । परी घेतला पाहिजे विचार ।
त्याच्या जपें अंधकार । न फिटे भ्रांतीचा ।१२।

माहावाक्याचा अर्थ घेतां । आपण वस्तुचि तत्वतां ।
त्याचा जप करितां वृथा । सीणचि होये ।१३।

माहावाक्याचें विवरण । हें मुख्य ज्ञानाचें लक्षण ।
शुद्ध लक्ष्यांशें आपण । वस्तुच आहे ।१४।

आपला आपणासि लाभ । हें ज्ञान परम दुल्लभ ।
जें आदिअंतीं स्वयंभ । स्वरूपचि स्वयें ।१५।

जेथून हें सर्वही प्रगटे । आणी सकळही जेथें आटे ।
तें ज्ञान जालियां फिटे । भ्रांति बंधनाची ।१६।

मतें आणी मतांतरें । जेथें होतीं निर्विकारें ।
अतिसूक्ष्म विचारें । पाहातां ऐक्य ।१७।

जें या चराचराचें मूळ । शुद्ध स्वरूप निर्मळ ।
या नांव ज्ञान केवळ । वेदांतमतें ।१८।

शोधितां आपलें मूळ स्थान । सहजचि उडे अज्ञान ।
या नांव म्हणिजे ब्रह्मज्ञान । मोक्षदायेक ।१९।

आपणासि वोळखों जातां । आंगीं बाणे सर्वज्ञता ।
तेणें येकदेसी वार्ता । निशेष उडे ।२०।

मी कोण ऐसा हेत । धरून पाहातां देहातीत ।
आवलोकितां नेमस्त । स्वरूपचि होये ।२१।

असो पूर्वी थोर थोर । जेणें ज्ञानें पैलपार ।
पावले ते साचार । ऐक आतां ।२२।

व्यास वसिष्ठ माहामुनी । शुक नारद समाधानी ।
जनकादिक माहांज्ञानी । येणेंचि ज्ञानें ।२३।

वामदेवादिक योगेश्वर । वाल्मीक अत्रि ऋषेश्वर ।
शोनिकादि अध्यात्मसार । वेदांतमतें ।२४।

सनकादिक मुख्यकरूनी । आदिनाथ मीन गोरक्षमुनी ।
आणीक बोलतां वचनी । अगाध असती ।२५।

सिद्ध मुनी माहानुभाव । सकळांचा जो अंतर्भाव ।
जेणें सुखें माहादेव । डुल्लत सदा ।२६।

जें वेदशास्त्रांचे सार । सिद्धांत धादांत विचार ।
ज्याची प्राप्ती भाग्यानुसार । भाविकांस होये ।२७।

साधु संत आणी सज्जन । भूत भविष्य वर्तमान ।
सर्वत्रांचें गुह्य ज्ञान । तें सांगिजेल आतां ।२८।

तीर्थें व्रतें तपें दानें । जें न जोडे धूम्रपानें ।
पंचाग्नी गोरांजनें । जें प्राप्त नव्हे ।२९।

सकळ साधनाचें फळ । ज्ञानाची सिगचि केवळ ।
जेणें संशयाचें मूळ । निशेष तुटे ।३०।

छपन्न भाषा तितुके ग्रन्थ । आदिकरून वेदांत ।
या इतुकियांचा गहनार्थ । येकचि आहे ।३१।

जें नेणवे पुराणीं । जेथे सिणल्या वेदवाणी ।
तेंचि आतां येचि क्षणीं । बोधीन गुरुकृपें ।।३२।
पाहिलें नस्तां संस्कृतीं । रीग नाहीं मऱ्हाष्ट ग्रन्थीं ।
हृदईं वसल्या कृपामूर्ती । सद्गुरुस्वामी ।।३३।
आतां नलगे संस्कृत । अथवा ग्रंथ प्राकृत ।
माझा स्वामी कृपेसहित । हृदईं वसे ।।३४।
न करितां वेदाभ्यास । अथवा श्रवणसायास ।
प्रेत्नेंविण सौरस । सद्गुरुकृपा ।।३५।
ग्रन्थ मात्र मऱ्हाष्ट । त्याहून संस्कृत श्रेष्ठ ।
त्या संस्कृतामधें पष्ट । थोर तो वेदांत ।।३६।
त्या वेदांतापरतें कांहीं । सर्वथा श्रेष्ठ नाहीं ।
जेथें वेदगर्भ सर्वही । प्रगट जाला ।।३७।
असो ऐसा जो वेदांत । त्या वेदांचाहि मथितार्थ ।
अतिगहन जो परमार्थ । तो तूं ऐक आतां ।।३८।
अरे गहनाचेंही गहन । तें तूं जाण सद्गुरुवचन ।
सद्गुरुवचनें समाधान । नेमस्त आहे ।।३९।
सद्गुरुवचन तोचि वेदांत । सद्गुरुवचन तोचि सिद्धांत ।
सद्गुरुवचन तोचि धादांत । सप्रचीत आतां ।।४०।
जें अत्यंत गहन । माझ्या स्वामीचें वचन ।
जेणें माझें समाधान । अत्यंत जालें ।।४१।
तें हें माझें जीवीचें गुज । मी सांगैन म्हणतों तुज ।
जरी अवधान देसी मज । तरी आतां येच क्षणीं ।।४२।
शिष्य म्लान्वदनें बोले । धरिले सदृढ पाउले ।
मग बोलों आरंभिलें । गुरुदेवें ।।४३।

अहं ब्रह्मास्मि माहांवाक्य । येथीचा अर्थ अतर्क्य ।
तो ही सांगतो ऐक्य । गुरुशिष्य जेथें ।४४।

ऐक शिष्या येथीचें वर्म । स्वयें तूंचि आहेसि ब्रह्म ।
ये विषईं संदेह भ्रम । धरूंचि नको ।४५।

नवविधा प्रकारें भजन । त्यांत मुख्य तें आत्मनिवेदन ।
तें समग्र प्रकारें कथन । कीजेल आतां ।४६।

निर्माण पंचभूतें यीयें । कल्पांतीं नासतीं येथान्वयें ।
प्रकृति पुरुष जीयें । तेही ब्रह्म होती ।४७।

दृश्य पदार्थ आटतां । आपणहि नुरे तत्वतां ।
ऐक्यरूपें ऐक्यता । मुळींच आहे ।४८।

सृष्टीची नाहीं वार्ता । तेथें मुळींच ऐक्यता ।
पिंड ब्रह्मांड पाहों जातां । दिसेल कोठें ।४९।

ज्ञानवन्ही प्रगटे । तेणें दृश्य केर आटे ।
तदाकारें मूळ तुटे । भिन्नत्वाचें ।५०।

मिथ्यत्वें वृत्ति फिरे । तो दृश्य असतांच वोसरे ।
सहजचि येणें प्रकारें । जालें आत्मनिवेदन ।५१।

असो गुरूचे ठाईं अनन्यता । तरी तुज कायेसी रे चिंता ।
वेगळेपणें अभक्ता । उरोंचि नको ।५२।

आता हेंचि दृढीकर्ण । व्हावया करीं सद्गुरुभजन ।
सद्गुरुभजनें समाधान । नेमस्त आहे ।५३।

या नांव शिष्या आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान ।
भवभयाचें बंधन । समूळ मिथ्या ।५४।

देह मी वाटे ज्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा ।
देहाभिमानें येरझारा । भोगिल्याच भोगी ।५५।

असो चहूं देहावेगळा । जन्मकर्मासी निराळा ।
सकळ आबाळगोबळा । सबाह्य तू ।५६।

कोणासीच नाहीं बंधन । भ्रांतिस्तव भुलले जन ।
दृढ घेतला देहाभिमान । म्हणौनियां ।५७।

शिष्या येकांतीं बैसावें । स्वरूपीं विश्रांतीस जावें ।
तेणें गुणें दृढावें । परमार्थ हा ।५८।

अखंड घडे श्रवण मनन । तरीच पाविजे समाधान ।
पूर्ण जालियां ब्रह्मज्ञान । वैराग्य भरे आंगीं ।५९।

शिष्या मुक्तपणें अनर्गळ । करिसी इंद्रियें बाष्कळ ।
तेणें तुझी तळमळ । जाणार नाहीं ।६०।

विषईं वैराग्य उपजलें । तयासीच पूर्ण ज्ञान जालें ।
मणी टाकितांचि लाधले । राज्य जेवीं ।६१।

मणी होता सीगटाचा । लोभ धरूनिया तयाचा ।
मूर्खपणें राज्याचा । अव्हेर केला ।६२।

ऐक शिष्या सावधान । आतां भविष्य मी सांगेन ।
जया पुरुषास जें ध्यान । तयासि तेंचि प्राप्त ।६३।

म्हणोनी जे अविद्या– । सांडून, धरावी सुविद्या ।
तेणें गुणें जगद्वंद्या । पाविजे सीघ्र ।६४।

सन्यपाताचेनि दुःखें । भयानक दृष्टीस देखे ।
औषध घेतांचि सुखें । आनंद पावे ।६५।

तैसें अज्ञानसन्यपातें । मिथ्या दृष्टीस दिसतें ।
ज्ञानऔषध घेतां तें । मुळींच नाहीं ।६६।

मिथ्या स्वप्ने वोसणाला । तो जागृतीस आणिला ।
तेणें पूर्वदशा पावला । निर्भय जे ।६७।

मिथ्याच परी सत्य वाटलें । तेणें गुणें दुःख जालें ।
मिथ्या आणी निरसलें । हें तों घडेना ।६८।

मिथ्या आहे जागृतासी । परी वेढा लाविलें निद्रिस्तांसी ।
जागा जालियां तयासी । भयेंचि नाहीं ।६९।

परी अविद्याझोंप येते भरें । भरे सर्वांगीं काविरें ।
पूर्ण जागृती श्रवणद्वारें । मननें करावी ।७०।

जागृतीची वोळखण । ऐक तयाचें लक्षण ।
जो विषईं विरक्त पूर्ण । अंतरापासुनी ।७१।

जेणें विरक्तीस न यावें । तो साधक ऐसें जाणावें ।
तेणें साधन करावें । थोरीव सांडुनी ।७२।

साधन न मने जयाला । तो सिद्धपणें बद्ध जाला ।
त्याहूनि मुमुक्षु भला । ज्ञानाधिकारी ।७३।

तंव शिष्यें केला प्रश्न । कैसें बद्धमुमुक्षाचें लक्षण ।
साधक सिद्ध वोळखण । कैसी जाणावी ।७४।

याचें उत्तर श्रोतयांसी । दिधलें पुढिलीये समासी ।
सावध श्रोतीं कथेसी । अवधान द्यावें ।७५।

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे 'शुद्धज्ञाननाम'
समास सहावा समाप्त.

❑❑

दशक ५ : समास ७

बद्धलक्षण

॥ श्रीराम ॥

सृष्टी जे कां चराचर । जीव दाटले अपार ।
परी ते अवघे चत्वार । बोलिजेती । १ ।

ऐक तयांचें लक्षण । चत्वार ते कोण कोण ।
बद्ध मुमुक्ष साधक जाण । चौथा सिद्ध । २ ।
या चौघांविरहित कांहीं । सचराचरीं पांचवा नाहीं ।
आतां असो हें सर्वही । विशद करूं । ३ ।
बद्ध म्हणिजे तो कोण । कैसें मुमुक्षाचें लक्षण ।
साधक सिद्ध वोळखण । कैसी जाणावी । ४ ।
श्रोतीं व्हावें सावध । प्रस्तुत ऐका बद्ध ।
मुमुक्ष साधक आणि सिद्ध । पुढें निरोपिलें । ५ ।
आतां बद्ध तो जाणिजे ऐसा । अंधारींचा अंध जैसा ।
चक्षुविण दाही दिशा । सुन्याकार । ६ ।
भक्त ज्ञाते तापसी । योगी वीतरागी संन्यासी ।
पुढें देखतां दृष्टीसी । येणार नाहीं । ७ ।
न दिसे नेणे कर्माकर्म । न दिसे नेणे धर्माधर्म ।
न दिसे नेणे सुगम । परमार्थपंथ । ८ ।
तयास न दिसे सच्छास्त्र । सत्संगति सत्पात्र ।
सन्मार्ग जो कां पवित्र । तोही न दिसे । ९ ।
न कळे सारासार विचार । न कळे स्वधर्म आचार ।
न कळे कैसा परोपकार । दान पुण्य ।१०।
नाहीं पोटीं भूतदया । नाहीं सुचिष्मंत काया ।
नाहीं जनासि निववावया । वचन मृद ।११।
न कळे भक्ति न कळे ज्ञान । न कळे वैराग्य न कळे ध्यान ।
न कळे मोक्ष न कळे साधन । या नांव बद्ध ।१२।
न कळे देव निश्चयात्मक । न कळे संतांचा विवेक ।
न कळे मायेचें कौतुक । या नांव बद्ध ।१३।

न कळे परमार्थाची खूण । न कळे अध्यात्मनिरूपण ।
न कळे आपणासि आपण । या नांव बद्ध ।१४।

न कळे जीवाचें जन्ममूळ । न कळे साधनाचें फळ ।
न कळे तत्वतां केवळ । या नांव बद्ध ।१५।

न कळे कैसें तें बंधन । न कळे मुक्तीचें लक्षण ।
न कळे वस्तु विलक्षण । या नांव बद्ध ।१६।

न कळे शास्त्रार्थ बोलिला । न कळे निजस्वार्थ आपुला ।
न कळे संकल्पें बांधला । या नाव बद्ध ।१७।

जयासि नाहीं आत्मज्ञान । हें मुख्य बद्धाचें लक्षण ।
तीर्थ व्रत दान पुण्य । कांहींच नाहीं ।१८।

दया नाहीं करुणा नाहीं । आर्जव नाहीं मित्रि नाहीं ।
शांति नाहीं क्षमा नाहीं । या नांव बद्ध ।१९।

जे ज्ञानविशिं उणें । तेथें कैचीं ज्ञानाचीं लक्षणें ।
बहुसाल कुलक्षणें । या नांव बद्ध ।२०।

नाना प्रकारीचे दोष । करितां वाटे परम संतोष ।
बाष्कळपणाचा हव्यास । या नांव बद्ध ।२१।

बहु काम बहु क्रोध । बहु गर्व बहु मद ।
बहु द्वंद बहु खेद । या नांव बद्ध ।२२।

बहु दर्प बहु दंभ । बहु विषये बहु लोभ ।
बहु कर्कश बहु अशुभ । या नांव बद्ध ।२३।

बहु ग्रामणी बहु मत्सर । बहु असूया तिरस्कार ।
बहु पापी बहु विकार । या नांव बद्ध ।२४।

बहु अभिमान बहु ताठा । बहु अहंकार बहु फांटा ।
बहु कुकर्माचा सांठा । या नांव बद्ध ।२५।